Manoharbhai Shikshan Prasarak Mandal Armori's

**MAHATMA GANDHI ARTS, SCIENCE &**
**LATE NASARUDDINBHAI PANJWANI COMMERCE COLLEGE, ARMORI**

Dist. Gadchiroli (Maharashtra) 441 208

Affiliated to Gondwana University, Gadchiroli.

Re-accredited by NAAC 'A' with 3.24 CGPA

---

# ANNUAL QUALITY ASSURANCE REPORT

## AQAR : 2023-2024

---

# CRITERION – I

# CURRICULAR ASPECTS

**METRIC NO: - 1.3.3.**

**METRIC NAME: -Number of students undertaking project work / field work/ internships.**




Web: - mgcollegearmori.ac.in
e-mail: - mgcollege.armori@gmail.com
Phone: - 07137-266558

# Project Work Reports/ Field Visit Reports of M.A.

MANOHARBHAI SHIKSHAN PRASARAK MANDAL ARMORI'S
MAHATMA GANDHI ARTS, SCIENCE &
LATE NASARUDDINBHAI PANJWANI COMMERCE COLLEGE
ARMORI Dist. Gadchiroli (M.S.) 441 208
Affiliated to Gondwana University, Gadchiroli
Re-accredited by NAAC 'A' with 3.24 CGPA (2022)
Web: mgcollegearmori.ac.in

Dr. Lalsingh H. Khalsa
Principal & IQAC Chairman
Mob. No. 9422153197
E-mail:lalsinghkhalsa@yahoo.com

Dr. Satish. S. Kola
IQAC Coordinator
Mob. 9595982057
E-mail: satish.kolawar@gmail.com

# Certificate of Verification

The document herewith is a testimonial of the following specifics;

- AQAR 2023-24
- Criterion - **I (Curricular Aspects)**
- Metric no. – **1.3.3**
- Metric Particular – **Number of students undertaking project work / field work/ internships.**

It is affirmed that the attached document pertinent to the above cited specifics are duly verified and approved by the IQAC.

Criterion Head

IQAC Coordinator
IQAC-Co-ordinator

IQAC Chairperson
PRINCIPAL
M.G. Arts, Science &
Late N.P. Commerce College
ARMORI, Dist. Gadchiroli

M.G. Art's, Science & Late N.P. Commerce College * Armori *

# Field Project Report

on

# देशी कॉंकलर पक्षी पालन व व्यवसाय : एक अध्ययन




**SUBMITED BY**

**M A I YEAR, SEM. II**

GUIDED BY

**Prof. MOHANLAL K. RAMTEKE**

Department of Econimcs

Mahatma . Gandh. Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist. Gadchiroli -441208

**2023-2024**

# Field Project Report

**on**

# देशी कॉकलर पक्षी पालन व व्यवसाय : एक अध्ययन

**Submitted By**

**M A. SEM. II**

**Name of Students**

1. Prashant Prabhakar Ghodmare ( Group Leader)
2. Payal Ramdas Mohanda
3. Urvashi Dipak Chaudhari
4. Pranali Dinkar Tulavi
5. Dimpal Kalidas Meshram
6. Shubham Sudhakar Naitam

**GUIDE**

**PROF. MOHANLAL K. RAMTEKE**

Department of Econimcs

**Mahatma . Gandh. Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist. Gadchiroli -441208**

**2023-2024**

**M A ,SEM II**

| Sr. No | Name Of Student | Signature |
|---|---|---|
| 1 | Prashant Prabhakar Ghodmare | Ghodmare |
| 2 | Payal Ramdas Mohanda | Mohanda |
| 3 | Urvashi Dipak Chaudhari | Chedhari |
| 4 | Pranali Dinkar Tulavi | Tulavi |
| 5 | Dimpal Kalidas Meshram | [illegible] |
| 6 | Shubham Sudhakar Naitam | S.S.Naitam |

# CERTIFICATE

This is to certify that student of M A Semester II Department of Economics. Mahatma Gandhi Arts, Science and Late N.P. Commerce College Armori have been successfully completed the field project on **देशी कॉकलर पक्षी पालन व व्यवसाय : एक अध्ययन** under the supervision of Department of Economics of the College in the academic session 2023-2024

| Sr. No. | Name of Student |
|---|---|
| 1 | Prashant Prabhakar Ghodmare |
| 2 | Payal Ramdas Mohanda |
| 3 | Urvashi Dipak Chaudhari |
| 4 | Pranali Dinkar Tulavi |
| 5 | Dimpal kalidas Meshram |
| 6 | Shubham Sudhakar Naitam |

# ACKNOWLEDGMENT

We express our sincere gratitude towards Dr.L.H.Khalsa, the principle Mahatma Gandhi Arts, Science and Late N.P. Commerce College, Armori for his support and encouragement. We are also thankful to Prof. Mohanlal k. Ramteke Head, Department of Economics for Guidance & encouragement. We are also thankful to "SATYA POULTRY FORM ARMORI" Proprietor and supervision for their Help, Support & cooperation. We are also thankful to faculty members of the college for their kind cooperation during the field work. Thanks are due to our friends, family members who encouraged and helped us.

Member of Project


External Expert
प्रा. निहार बोदेले

# देशी कॉकलर पक्षी पालन व व्यवसाय : एक अध्ययन



# देशी कॉकलर पक्षी पालन व व्यवसाय एक अध्ययन

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| I | प्रस्तावना | ८ |
| II | उद्देश | १० |
| III | गृहिते | ११ |
| IV | माहितीचे संकलन | १२ |
| अ} | प्राथमिक स्त्रोताव्दारे माहितीचे संकलन | १३ |
| ब} | व्दितीय स्त्रोताव्दारे माहितीचे संकलन | १६ |
| V | देशी कॉकलर पक्षी पालन व व्यवसायाचा अभ्यास | १८ |
| VI | काळजी व्यवस्थापन | २८ |
| VII | देशी कॉकलर पक्षी पालन व व्यवसायासाठी शासनाकडून मिळणाऱ्या योजना व अनुदान | ३५ |
| VIII | उपाययोजना | ४१ |
| IX | निष्कर्ष | ४२ |

# देशी कॉकलर पक्षी पालन व  व्यवसाय:एक अध्ययन

## I. प्रस्तावना :-

आपल्या भारतामध्ये अनेक प्रकारच्या कोंबड्यांच्या जाती आहेत. त्यामध्ये बायलर, कॉकलर,देशी कॉकलर,  पॅरेट, गावरान, इत्यादी. अशा अनेक प्रकारच्या कोंबड्यांचा व्यवसाय भारतातील लोक करतात. व त्यापासून मोठ्या प्रमाणावर उत्पादन मिळवतात. त्याच कोंबड्यांच्या प्रजातीतील एक प्रजाती म्हणजे "देशी कॉकलर " ही आहे. या कोंबडीचे वैशिष्ट्य हे आहे की, या कोंबडीमध्ये मोठ्या प्रमाणात पौष्टिक गुणधर्म आढळले जाते. म्हणून या कोंबडीचे मागणी ही हळूहळू वाढत चाललेली आहे.

भारतामध्ये देशी कॉकलर कोंबडी हेद्राबाद मध्ये  पाहायला मिळतात. या कोंबडीचे मांस लाल रंगाचे असते. त्याच्या अंड्याचे

रंग पांढरा असतो. या जातीचे मासे पांढरे असले तरी ते खायला चविष्ट त्याचबरोबर पौष्टिकयुक्त

असल्याचे मानले जाते. देशी कॉकलर ही प्रजाती घरगुती कोंबडी म्हणून ओळखली जाते. देशी कॉकलर वैशिष्ट्ये म्हणजे ही कोबडी ४५°C तापमानात सुद्धा राहू शकतात. म्हणून या कोंबडीला लागणारा देखभालीचा खर्च इतर कोंबड्यां सारखी लागते. यात तिला राहायला जागा म्हणजे एका कोंबडीला १ चौ.फूट जागा लागते. हा उद्योग आपण कुटीर उद्योग म्हणून किंवा लघु उद्योग म्हणून सुद्धा करू शकतो. याच्या व्यवसाय करण्यासाठी आपल्याला सरकारकडून कोणत्या योजनेचा लाभ घेता येतो व कशाप्रकारे हा व्यवसाय करायचा हा अभ्यास आपण करणार आहोत.

विशेष म्हणजे या कोंबडीच्या मासांमध्ये पौष्टिक गुणधर्म आहेत त्यामुळे या परिसरातील बाजारपेठेत देशी कॉकलर कोंबडी ला कायम मागणी असते. परंतु पारंपरिक पद्धतीनुसार किंमत जास्त असल्यामुळे मागणी चे प्रमाण कमी आहे. पण चवीला जास्त चविष्ट आहे. हे प्रजाती २०१७ पासून सत्या पोल्ट्री फार्म मध्ये उपलब्ध असून सत्या पोल्ट्री फार्मला एक नवीन आर्थिक उत्पनाचे स्त्रोत निर्माण झाले.

## II.उद्देश :-

- देशी कॉकलर पक्षीपालन आणि व्यवसायाचा सखोल अभ्यास करणे.

- देशी कॉकलर कोंबडीपालनातून रोजगाराच्या संधी चा अभ्यास करणे.

- देशी कॉकलर पक्षीपालन व व्यवसायासाठी शासनाकडून मिळणाऱ्या योजना व अनुदान यांचा अभ्यास करणे.



## III गृहिते

1) देशी कॉकलर च्या उत्पादन व व्यवसाय व्यवस्थापन सोपी असते.
2) देशी कॉकलर व्यवसायात मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध असतात.

## IV माहितीचे संकलन :-

"देशी कॉकलर पक्षी पालन आणि व्यवसाय" या विषयावर माहिती गोळा करण्यासाठी खालील पद्धतीचा अवलंब केला गेला आहे.



## अ} प्राथमिक स्त्रोताव्दारे माहितीचे संकलन

देशी कॉंकलर पक्षी पालन व व्यवसाय आणि उत्पादन याचा सखोल अभ्यास करण्यासाठी आणि आमच्या गटांनी **आरमोरी** येथे असलेल्या **सत्या देशी कॉंकलर पक्षी पालन केंद्राला भेट दिली.** आणि तेथील व्यवस्थापक **श्री.सत्यवान** यांची प्रत्यक्षरीत्या मुलाखत घेतली आणि तेथील परिसराची माहिती गोळा केली. या व्यवसायातून रोजगाराच्या संधी व या व्यवसायांचे व्यवस्थापन कशा प्रकारे करतात याची माहिती घेतली व यासाठी कोणत्या गोष्टीची गरज आहे याची पुर्ण माहिती गोळा केली.

- आरमोरी येथील पोल्ट्री फार्म साठी पिल्ले हे हेद्राबाद मधून आणले जाते .

- कोणत्याही सर्वसाधारण पोल्ट्री फार्म साठी १०० फूट लांबी व ३० फूट रुंदीचा व १० फूट उंचीचा असतो. त्यांचा प्रकल्प मोठा असल्याने या पोल्ट्री फार्म ची ३५ फूट रुंदी व १८ फूट उंची आहे व ५०० फूट लांबी आहे.

- ज्या ठिकाणी आपण पिलांची वाढ करणार आहोत ती जागा ही मजबूत पाहिजे, जेणेकरून उंदीर, घूस त्यांच्या हल्ल्यात पिल्ले मारले जाणार नाही.
- पोल्ट्री फार्म दोन्ही बाजूंनी खुला असायला पाहिजे जेणेकरून मोकळी हवेचे आगमन होईल.
- या कोंबडीचा चारा खास प्रक्रियेतून बनवलेला असतो. यात मुख्य गोष्ट म्हणजे मक्याचा उपयोग होतो. तसेच गहू, तांदूळ आणि यामध्ये सोडियम टाकला जातो. कारण यामुळे त्यांच्यातील प्रोटीनची कमतरता पूर्ण करण्यास मदत होते. त्यांना चारा हा फिडरव्दारे दिला जातो.

- एका देशी कॉकलर  कोंबडीला राहण्यासाठी १ चौ.फूट तर जागा लागते. ही गावटी प्रजाती असल्याने जास्त जागा लागते.
- देशी कॉकलर  गव्हर्मेंट ४०० रुपये प्रति किलो आहे व अंडा ४० रुपये प्रति नग आहे. आरमोरी मध्ये या कोंबडीची किंमत २०० रुपये प्रति किलो आहे.

- पोल्ट्रीफार्मच्या सभोवताल ताडपत्री लावलेली असते. कारण पावसाचा पाणी आणि वेगाच्या हवेमुळे नुकसान होणार नाही. पाणी आत आल्यावर विषाणू निर्माण होण्याची शक्यता असते.

➢ यात बाहेरील व्यक्तींना प्रवेश मनाई असते कारण बाहेरील रोग किंवा विषाणूंची लागण होणार नाही याची काळजी घेतली जाते.

➢ आरमोरी तालुक्यात मानापुर, देलनवाडी, पिसेवडधा या गावात देशी कॉकलर मागणी जास्त आहे.

➢ देशी कॉकलर या कोंबड्यांचे लहान पिल्लांना 2 Vaccine दिल्या जातात आणि हे लहान पिल्लू तीन महिन्यात मोठा होतात

➢ यांच्या देखभालीसाठी फक्त तीन श्रमिकांची गरज असते.

वरील प्रमाणे माहिती आम्हांला आरमोरी येथील सत्या देशी कॉकलर पक्षी पालन केंद्रा मधील व्यवस्थापक श्री. सत्यवान यांनी दिलेली आहे.



## ब} व्दितीय स्त्रोताव्दारे माहितीचे संकलन

देशी कॉकलर पक्षी पालन व्यवसायाबद्दल माहिती मिळण्यासाठी आम्ही विविध घटकांचा आधार घेतला. ज्यामध्ये संबंधित पुस्तके, इंटरनेट अशा अनेक गोष्टींची मदत आम्ही घेतली आहे.

## ➢ देशी कॉकलर पक्षी पालन व्यवसाय बद्दल माहिती

आम्हाला माहित आहे की, कुक्कूटपालन हा सर्वात जुना व्यवसाय आहे आणि सध्याच्या काळात अधिक फायदेशीर ठरतो. देशी कॉकलर कोंबडीची जात मध्य प्रदेशातील धार व हेद्राबाद जिल्ह्यातील गावरानी जमातीची आहे. ही प्रजाती पटर्या रंगाच्या आणि लाल मासाच्या कोंबडीसाठी प्रसिद्ध असल्याने देशी कॉकलर कोंबडीची व्यवसायिक शेती केली जाते.

देशी कॉकलर  पक्षी पालन हा व्यवसाय पूर्णपणे अंडी आणि मासा वर आधारित आहे कारण या व्यवसायात कमी कालावधीत उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. यशस्वी व्यवसायासाठी आणि मोठ्या उत्पन्नाच्या नफ्यासाठी एखाद्याला काही छोट्या जमिनीचे काही मूलभूत प्रशिक्षण असले पाहिजे. जरी तो एक लहान शेती किंवा शेतीचा व्यवसाय असला तरीही योग्य देशी कॉकलर  पक्षीपालन व्यवसाय योजना तयार केली जाणे आवश्यक आहे. ज्यामध्ये आहार, घर, देखभाल, श्रमीक, भांडवली गुंतवणूक आणि विपणन योजनेचा समावेश असणे आवश्यक आहे.

## V. देशी कॉकलर  पक्षी पालन व व्यवसायाचा अभ्यास

❖ **देशी कॉकलर पक्षीपालन व्यवसाय :-**

भारतात अनेक प्रकारच्या प्रजातीचे कोंबडीचे पालन म्हणून व्यवसाय केले जाते. कारण कुक्कुटपालन हा सर्वात जुना व्यवसाय आहे आणि तो आता ही सुरु आहे. त्यापैकी दुर्मिळ अशा प्रजातीचे पालन व व्यवसाय यावर आपण अभ्यास करणार आहोत.

देशी कॉकलर  कोंबडीची जात हेद्राबाद मध्ये गावरानी  जमातीची आहे. देशी कॉकलर  कोंबडीचे उत्पादन असे लाल  मास, पाटरे  अंडे आणि देशी कॉकलर  पिल्लाना जास्त  प्रमाणात मागणी नफ्याची आहे.

❖ **देशी कॉकलर पक्षी पालनाचे फायदे**

➢ देशी कॉकलर कोंबडीच्या जातीची मागणी नफा असलेल्या मार्जिनसह जास्त आहे कारण बाजारात याच्या उत्पादनाची किंमत उच्च दराने विकली जाते.

➢ या प्रजातीच्या मास आणि अंडीमध्ये बरेच आवश्यक जीवनसत्वे, खनिजे, प्रथिने, अमिनो ॲसिड असतात.

➢ कोंबड्यांपासून अंडी मास तर मिळतेच त्याचबरोबर कोंबड्यांचे खत शेतीसाठी अतिशय उपयुक्त म्हणून मोठ्या प्रमाणावर त्याला मागणी असते.

➢ देशी कॉकलर मासामध्ये असलेल्या पौष्टिक गुणामुळे मानवी शरीरात रक्ताची पातळी आणि हिमोग्लोबिनची पातळी वाढू शकते.

➢ आपल्या व्यापारी शेतीला चालना देण्यासाठी अनेक राज्य सरकार देशी कॉकलर  शेतीला चालना देण्यासाठी विविध योजना व अनुदान देऊन शेतकऱ्यांना मदत करते.

➢ इतर पोल्ट्री पक्षाच्या तुलनेत फिडच्या वापर मध्यम आहे. कमी किमतीच्या खाद्य वस्तीत पक्षी सहज वाढतात आणि जगू शकतात.

➢ देशी कॉकलर  कोंबड्या इतर कोंबड्यांच्या तुलनेत पिल्ले अत्याधिक रोगप्रतिरोधक म्हणून त्यांच्या आजारवरील खर्च कमी येतो.

➢ देशी कॉकलर पिल्ले चटकन वाढतात आणि मोठी होतात.

➢ इतर कोंबडी प्रगतीच्या तुलनेत यात प्रोटीन सामग्रीचे प्रमाण सर्वाधिक असते. (२५% पेक्षा जास्त)

## ❖ देशी कॉकलर पक्षी पालन व्यवसाय का ?

देशी कॉकलर कोंबडीच्या मांसामध्ये इतर मासाच्या तुलनेत पौष्टीक गुणधर्म असते. ही जाती त्याच्या परिस्थितीशी जोडून घेण्यायोग्य रोगप्रतिकारशक्ती आणि त्याच्या विशीष्ट मास चविसाठी खूप लोकप्रिय आहे. पक्षाचे मास वासोडी लेटर म्हणून कार्य करते. जे मानवी शरीरात रक्त प्रवाह नियमित करण्यास आणि या त्याद्वारे कामोत्तेजना आणण्यास मदत करते. देशी कॉकलर कोंबडीची जात हेद्राबाद मध्ये गावरानी जमातीची आहे. देशी कॉकलर कोंबडीचे उत्पादन असे लाल मास, पाटरे अंडे आणि देशी कॉकलर पिल्लाना जास्त प्रमाणात मागणी नफ्याची आहे. या कोंबडीचे मास होमिओपॅथीमध्ये एखाद्या विशिष्ट चिंताग्रस्त डिसऑर्डरवर उपचार करण्यासाठी देखील वापरले जाते. देशी कॉकलर मास महिलांवर उपचार करण्यासाठी प्रभावी आहे. वंधत्व, असामान्य मासिक धर्म आणि नेहमीच्या गर्भपात करण्यास मदत करते. या पक्षाचे मास अंडी, प्रथिने समृध्द असतात आणि उच्च पौष्टीक विशेषता उच्च रक्तदाब ग्रस्त मुलांसाठी आणि कोलेस्ट्रॉलची पातळी इतर पक्षाच्या मासाच्या तुलनेत अगदी नगण्य आहे.

## ❖ व्यवसायाची सुरुवात

देशी कॉकलर  पक्षी पालन व व्यवसाय पूर्णपणे अंडी आणि माणसावर आधारित आहे कारण या व्यवसायात कमी कालावधीत उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. या व्यवसायासाठी आणि मोठ्या उत्पन्नाच्या नफ्यासाठी एखाद्याला काही छोट्याचा जमिनीचे काही मूलभूत प्रशिक्षण असले पाहिजे. जरी तो एक लहान शेती किंवा मोठा शेतीचा व्यवसाय असला तरीही योग्य देशी कॉकलर कोंबडी पालन व्यवसाय योजना तयार केली जाणे आवश्यक आहे.

## ❖ देशी कॉकलर चारा व्यवस्थापन

व्यवसायिक प्रजनन आणि शेतीत ब्रॉयलर फीड सोबत मक्का पहिल्या दोन महिन्याच्या कालावधीत दिला जातो. पक्षांनी दोन महिन्यानंतर त्यांना २० टक्के प्रथिने आहार दिला जातो. त्याच्या शरीराच्या वजन आणि वयानुसार नियमित खाद्य नंतर ब्रॉयलर स्टार्टर फिड सह पक्ष्यांना खायला सुरुवात करता येते. ते बाजारातील पालेभाज्या, गवत इत्यादी निरनिराळे पदार्थ खातात. खुल्या रेंज शेतीत त्यांना काय हवे ते माहिती माहीत असते. आणि लहान कीटक, बियाने, गवत आणि इतर गोष्टी खायला लागतात.

| साहित्य | ब्रुडर मॅश (०-८आठवडे) ग्रॅममध्ये | ग्रॅममध्ये मॅश (९-१९आठवडे) उत्पादक करा | ग्रॅममध्ये लेअर मॅश (२०-७२ आठवडे) |
|---|---|---|---|
| मका | ५९.०० | ४०.०० | ५७.०० |
| बाजरी | - | १०.०० | - |
| DORB | ४.०० | २७.८० | ५.०० |
| सोया जेवण | २४.५० | १०.७० | १४.०० |
| सूर्यफूल जेवण | - | ७.०० | ७.०० |
| मत्स्याहार | १०.०० | ६.०० | ९.०० |
| खनिज मिश्रण | २.०० | २.०० | २.०० |
| शेल ग्रिट | - | - | ५.०० |
| मीठ | ०.५० | ०.५० | ०.५० |
| मेथिनिन | - | - | ०.५० |

# ड्रिंकर

ड्रिंकरद्वारे देशी कॉकलर  कोंबड्यांना पाणी दिल्या जाते.




# फिडर

फिडर द्वारे देशी कॉकलर  कोंबड्यांना योग्य प्रकारे खाद्य दिले जाते.



## ❖ देशी कॉकलर पक्षी पालन पक्षीगृहाचे व्यवस्थापन

सर्वोत्कृष्ट देशी कॉकलर प्रजनन आणि नफ्यासाठी देशी कॉकलर पक्षीगृहाचे, खोलीचे तापमान २० अंश सेल्सिअस ते २६ अंश सेल्सिअस पर्यंत असणे आवश्यक आहे. आणि ५० टक्के ते ७० टक्के आद्रता असणे आवश्यक आहे. पक्षी १६ ते ३५ अंश सेल्सिअस तापमानात चांगली जगू शकतात. देशी कॉकलर कोंबडी कचरा कुंडीत किंवा पिंजऱ्यात ठेवलेले किंवा पाळले जाते. पक्षीगृह, मांजरी, कुत्री, शिकारी पक्षी आणि उंदीर यासारख्या नैसर्गिक शिकारी पासून मुक्त असणे आवश्यक आहे. पक्षीगृह व आसपासचे विभाग उडणे व डासांपासून मुक्त असले पाहिजे. सर्व हंगामात पक्षिगृहात पुरेसा प्रकाश असणे आवश्यक आहे. तीक्ष्ण बाहेरील किंवा खडकांसह जागा सपाट असणे आवश्यक आहे. पक्षीगृहाची लांबी १०० फुटापेक्षा जास्त व ३० फूट रुंद व १० ते २० फूट उंच असू शकते. घराची किंवा शेडची जागा ही सिमेंट काँक्रीटची असणे आवश्यक आहे. त्यामुळे रोगाची समस्या कमी होईल आणि निर्जंतुकीकरण, देखभाल आणि साफसफाईची मदत होईल. शेतकरी आपल्या इच्छेनुसार पक्षिगृहाची छत पेंढा, नारळाचे पान किंवा पालमीरा पाने, प्लास्टिक किंवा फायबर ग्लास इत्यादी पासून बनवू शकते.

## ❖ उत्पादक हाऊस

९ ते २० आठवड्याच्या वयोगटातील अंडी घालणाऱ्या प्रकारचे पक्षी ठेवण्यासाठी वापरला जातो. जागा स्वच्छ करून आणि निर्जंतुकीकरण करून उत्पादक तयार करा. पक्षांचा परिचय देण्यापूर्वी घर स्वच्छ व कोरडे असणे आवश्यक आहे. फ्लोरिंग सुमारे ४ इंच कचरा सामग्रीसह पसरविणे आवश्यक आहे. पक्ष्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी देणारे आणि खाद्य देणारे ग्रोवर हाऊस मध्ये पुरेशी जागा फिडिंग स्पेस आणि पाण्याची जागा असणे आवश्यक आहे. कोकीडीओसिसारख्या रोग टाळण्यासाठी चांगल्या कचरा व्यवस्थापनाचे अनुकरण करावे लागते. सुमारे १२ तासाची योग्य नैसर्गिक प्रकाश प्रदान केले जाणे आवश्यक आहे आणि कृतीने प्रकाश आवश्यक नाही.

## ❖ ब्रुडर हाऊस

पिलांची साठवणूक करण्याआधी निर्जंतुकीकरण करून ब्रुडर हाऊस तयार करावा लागतो. १६ इंचाची उंची आणि ६ फूट व्यासाचा पुठ्ठा ठेवावा लागतो आणि पिलांना आतमध्ये राहण्यासाठी एक लहान क्षेत्र बनवावा लागतो. अंडी फोडण्याच्या ठिकाणापासुन आतील बाजूस अनेक इंच कोरडे भुसा किंवा पीठ मॉस घालावा लागतो. उष्मयान क्षेत्र किंवा ब्रुडर हाऊस थेट सूर्यप्रकाशापासून संरक्षण केले पाहिजे. प्रत्येक १०० पिल्यांसाठी पिल्ले गरम ठेवण्यासाठी २५०V इन्फ्रारेड दिवे आवश्यक असतात. प्रत्येक दिवे अशा प्रकारे विभाजित करा की प्रत्येक घरात एक लाईट बल्ब असेल. हवा किंवा खोलीचे तापमान गरम करणे टाळा. परंतू जीथे पिल्ले राहतात तेथे फक्त उष्मयान क्षेत्र १ ते ८ दिवसाच्या जुना प्रत्येक पिलासाठी ब्रुडींग हाऊस मध्ये ६ ते ७ इंच मोकळी जागा असणे आवश्यक आहे.

## VI. काळजी व्यवस्थापन :-

### ❖ नवजात पिल्लांची काळजी

उरलेल्या पिलांना स्वच्छ आणि कोरड्या ब्रुडरमध्ये ठेवणे आवश्यक आहे. उष्मयान क्षेत्र पूर्णपणे पंख होईपर्यंत ३५ ते ३६.५ अंश सेल्सिअस तापमानात राखले जाणे आवश्यक आहे. एका महिन्याच्या होईपर्यंत दर आठवड्याला हळूहळू २.५ तापमान कमी करावा लागतो.

### ❖ देशी कॉकलर कोंबडी मधील आजार

ही प्रजाती उन्हाळ्यातील उष्णता आणि थंड हिवाळ्यातील तणाव सहन करू शकते आणि अन्नधान्याच्या मर्यादित स्त्रोतामुळे आणि व्यवस्थापनाच्या अतिउत्तम परिस्थितीत चांगले वाढते. हे पक्षी कठोर आहेत आणि इतर कुक्कुट पक्षी आणि विदेशी पक्षी यांच्या तुलनेत रोगाचे प्रतिकार करण्यास योग्य प्रमाणात दर्शवतात. कोकिडोऑसिस पक्षी रोग टाळण्यासाठी ब्रुडर शेडमध्ये पिल्ले किंवा पक्ष्यांची जास्त गर्दी टाळावी.

## ❖ देशी कॉकलर पक्षी पालन व्यवसायातील विक्री पद्धती

आपला देशी कॉकलर कोंबडी पालन व्यवसाय यशस्वी होण्यासाठी व नफा चांगला मिळवण्यासाठी योग्य विपणन धोरण असले पाहिजे. या व्यवसायात जाहिरात हा महत्त्वाची भूमिका बजावते

- स्थानिक ग्राहकांना आरोग्यविषयक फायदे आणि देशी कॉकलर अंडी उत्पादनाच्या वापराचे महत्त्व याबद्दल अधिक माहिती दिली पाहिजे.

- किरकोळ विक्रीसाठी विक्रीसाठी स्टोरमध्ये पत्रके किंवा बॅनरद्वारे प्रचार केला पाहिजे.

- ऑनलाइन व्यवसायाद्वारे आपला उत्पादनाचा प्रचार आणि सोशल मिडीयाद्वारे जनजागृती केली पाहिजे.

मध्यप्रदेश सरकारने पक्षी विक्रीसाठी एक खास **मोबाईल ॲप एम. पी. देशी कॉकलर** हा बाजारात आणला आहे. आणि देशातील इतर भागांनी कुक्कुटपालनाची जोडले

आहेत. आपण सुद्धा आपल्या कोंबडीचे विक्री याद्वारे करू शकतो. व्यक्ती आणि व्यवसायिक शेतकरी कुठूनही देशी कॉकलर कोंबडीसाठी आर्डर देऊ शकतात.

सुरुवातीचे महिने स्थनिक प्रांतांमधील उत्पादनाच्या प्रचार आणि विपणन करण्यासाठी खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला व्यवसाय आणि ग्राहकांचा विस्तार होईल.

## ❖ ४०० देशी कॉकलर कोंबड्यांचे युनिट ची किंमत आणि नफा विश्लेषण

➢ **भांडवली खर्च** (Capital Cost)

शेडचे बांधकाम = ३ शेड्स (६० x ३०)

= ५०,००० रु.

(किमान साहित्य वापरून)

➢ **वारंवार येणारे खर्च** (Recurring Cost)

४०० पिल्ले (एका आठवड्याचे) ४५ रु.१ पिल्ला

= १८,००० रु.

कंपनीकडून चारा (१४ क्विंटल)

= २०,००० रु.

पौष्टिक = २,००० रु.

एकूण वारंवार येणारे खर्च = ६६,००० रु.

❖ उत्पन्न

**अ. कोंबड्यांपासून उत्पन्न** (मृत्युसंख्या २० कोंबड्या)

५ महिन्यानंतर ३५ कोंबड्यांची विक्री २०० रु. प्रति कोंबडी = ७,००० रु.

६ महिन्यानंतर १२० कोंबड्यांची विक्री २०० रु. प्रति कोंबडी = २४,००० रु.

७ महिन्यानंतर १८० कोंबड्यांची विक्री २०० रु. प्रति कोंबडी = ३६,००० रु.

८ महिन्यानंतर १५० कोंबड्यांची विक्री २०० रु. प्रति कोंबडी = ३०,००० रु.

**ब. अंड्यांपासुन उत्पन्न** (प्रत्येक कोंबडी वर्षाला 100 अंडी देते)



एकूण अंड्यांचे उत्पादन = ५००

अंडे उबवण्यासाठी २०० = ९,००० रु.

२५० अंड्यांची विक्री १५ रु. प्रति अंडा = ३,७५० रु.

➢**एकूण उत्पन्न = (अ + ब)**

= २,३८,००० + २०,२५०

= २,५८,२५० रु

➢**शुध्द नफा** = एकूण उत्पन्न - एकूण खर्च

= २,५८,२५० – ६६,०००

= १,९२,२५० रु.

(शेतकरी देशी कॉकलर कोंबडी पालन करून सरासरी दर महिन्याला ६०,००० रुपये नफा मिळू शकतो. शेतकरी हा घाऊक बाजारात किरकोळ विक्री मध्ये दुप्पट नफा मिळू शकतो आणि सणासुदीच्या हंगामात देशी कॉकलर २०० ते २५० रुपये प्रति किलो पर्यंत विकली जाते).

## VII. देशी कॉकलर पक्षी पालन व व्यवसायासाठी शासनाकडून मिळणाऱ्या योजना व अनुदान

भारतात अनेक प्रकारच्या प्रजातीच्या कोंबडीचे व्यवसाय केले जाते. त्याचा विस्तार व्हावा म्हणून केंद्र सरकार व राज्य सरकार विविध प्रकारच्या योजना राबवित असते. अशाच प्रकारच्या योजना काही याचा अभ्यास करणार आहोत.

### १. नाविन्यपूर्ण योजना १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करणे.

ही योजना सर्वसाधारण प्रवर्गातील तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांसाठी आहे.

**त्यांना खालील प्राधान्य क्रमाने करण्यात येते**

१. ० ते १ हेक्टर अत्यल्पभूधारक

२. १ ते २ हेक्टर अल्पभूधारक

३. रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नावे असलेले सुशिक्षित बेरोजगार

४. अनुक्रमांक १ ते ३ मधील महिला बचत गटातील शेतकरी

५. ३०% महिलांना प्राधान्य

६. ३% अपंगांना प्राधान्य

या योजनेसाठी सर्वसाधारण प्रवर्गातील तसेच अनुसूचित जाती-जमातीतील लाभार्थ्यांच्या

❖ **निवडीची पात्रता**

- अर्जदाराकडे पशुपालनासाठी आवश्यक पुरेशी जागा असावी.
- एका कुटुंबातील एका व्यक्तीला लाभ देण्यात येईल
- अर्जदाराला १ मे २००१ पूर्वी व त्यानंतर जन्माला आलेली दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये नसावी.
- अर्जदार किंवा त्याच्या वैवाहिक जोडीदार शासकीय/निमशासकीय/स्थनिक स्वराज्य संस्थेत नोकरी करत नसावा अथवा निवृत्त नसावा.

## ❖ योजनेचे स्वरुप

| बाबी | किंमत रुपये |
|---|---|
| जमीन | लाभार्थीची/भाडेपट्टीवर घेतलेली |
| पक्षीगृह (१,००० चौ.फूट), भांडार खोली, पाण्याची टाकी, निवासाची सोय, विद्युतीकरण | २,००,०००/- |
| उपकरणे, खाद्याची/पाण्याची भांडी, ब्रुडर इत्यादी | २५,०००/- |
| **एकूण** | **२,२५,०००/-** |

## ❖ अनुदान

| प्रवर्ग | अनुदान (रुपये) | लाभार्थी हिस्सा (रुपये) | एकूण (रुपये) |
|---|---|---|---|
| सर्वसाधारण योजना | १,१२,५०० | १,१२,५०० | २,२५,००० |
| अनुसूचित जाती योजना | १,६८,७५० | ६५,२५० | २,२५,००० |
| अनुसूचित जमाती योजना | १,६८,७५० | ६५,२५० | २,२५००० |

❖ **या योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड ही निवड समितीद्वारे होते**

1. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त - अध्यक्ष
2. पशुधन विकास अधिकारी,सधन कुक्कुट विकास गट — सदस्य
3. जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी — सदस्य
4. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण — सदस्य
5. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी — सदस्य
6. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी - सदस्य सचिव

* ## लाभार्थ्यांची निवड

* 

खालील प्राधान्यक्रमाने करण्यात येते

1. दारिद्र्य रेषेखालील

2. ० ते १ हेक्टर अत्यल्पभूधारक

3. १ ते २ हेक्टर अल्पभूधारक

4. ३०% महिलांना प्राधान्य

5. ३% टक्के अपंगांना पर्यंत

## ❖ व्यवसायाच्या माध्यमातुन स्वयंरोजगार निर्मिती

देशी कॉकलर व्यवसाय खूप सरळ आणि साध्या पद्धतीने करता येतो. या व्यवसायामध्ये कमी भांडवल गुंतवून व घरील सदस्य किंवा एक दोन सदस्य/श्रमिकांच्या मदतीने हा व्यवसाय सुरू करता येतो. हा व्यवसाय आपण आपल्या घरातील परसबागेत सुद्धा सुरू करू शकतो, याच्यासाठी १० कोंबड्या पासून आपण सुरुवात करू शकतो तसेच त्या व्यवसायासाठी लागणारे व्यवस्थापनाची गरजसुद्धा आपण घरच्या घरी करू शकतो. अशा प्रकारे सामान्य व्यक्ती आपला स्वयंरोजगार निर्माण करू शकतो.

## VIII. उपाययोजना :-

- या व्यवसायाची प्रगती करण्यासाठी जास्त प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे.

- पूर्ण अभ्यास केल्यानंतर लक्षात आलं की या व्यवसायाबद्दल ना ग्राहकांना जागृती आहे, ना उत्पादकांना जागृती आहे त्यामुळे याबद्दल जनजागृती व्हायला पाहिजे.

- ग्रामीण भागातील लोकांना या व्यवसायासंबंधी तसेच या विषयाबद्दल माहिती पुरवली पाहिजे व मोफत प्रशिक्षण दिले पाहिजे.

- या व्यवसायाकरिता सरकारने अधिक प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे, तसेच ते सहजरित्या प्राप्त होईल अशी व्यवस्था केली पाहिजे.

➢ तरुणांना तसेच ग्रामीण भागातील लोकांना ह्या व्यवसाय करण्यासाठी सरकारने विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रोत्साहित केले पाहिजे.

## IX. निष्कर्ष :-

देशी कॉकलर कोंबडी पालन एक दुप्पट नफा मिळविणारा व्यवसाय आहे आणि बऱ्याच लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या नोकरीची संधी उपलब्ध करून देतो. देशी कॉकलर जातीची शेती ही कमी देखभाल आणि चांगल्या गुणवत्तेने उत्पादनासाठी एक साधा व्यवसायात आहे. देशी कॉकलरची अंडी पोषक जीवनसत्त्वे आणि प्रथिने समृद्ध असतात आणि हे आरोग्यासाठी उपयुक्त असे कोंबडी व्यवसाय आहे, तसेच हा व्यवसाय साधारण शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून करू शकतो. किंवा थोडेसे भांडवल गुंतवुण लघु उद्योग म्हणून हा व्यवसाय सुरु करता येतो.

# संदर्भसूची


1. https://www.pashudhanpraharee.com/status-of-poultry-production-in-india/
2. https://www.youtube.com/watch?v=MziXf६OG१KM
3. https://www.youtube.com/watch?v=VtTHqJZStlM


Latitude: 20.450772
Longitude: 79.987115
Elevation: 243.16±12 m
Accuracy: 3.0 m
Time: 04-08-2024 11:43
Note: field project
Powered by NoteCam


Latitude: 20.45074
Longitude: 79.987042
Elevation: 216.57±24 m
Accuracy: 11.2 m
Time: 08-04-2024 11:58
Note: fild project
Powered by NoteCam

Department of Econimcs

**Mahatma . Gandh. Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist. Gadchiroli -441208**

**2023-2024**

**M A ,SEM II**

| Sr. No | Name Of Student | Signature |
|---|---|---|
| 1 | Prashant Prabhakar Ghodmare | Ghodmare |
| 2 | Payal Ramdas Mohanda | Mohanda |
| 3 | Urvashi Dipak Chaudhari | Chaudhari |
| 4 | Pranali Dinkar Tulavi | Tulavi |
| 5 | Dimpal Kalidas Meshram | [illegible] |
| 6 | Shubham Sudhakar Naitam | S.S.Naitam |

MAHATMA GANDHI RTS,SCIENCE
& N.P. COMMERCE COLLEGE
ARMORI
DIST:GADCHIROLI (M.S)441208

Session -2023-24

History Field Project

# A Historical Study Of Markanda Temple

**M. A.(History )Sem =II**
**NEP-2020**

Submitted to
Prof. Borkar G. W.
(Acting Head)
Department Of History
Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori

Submitted By

1. Borkar Dhaneshwar Giridhar
2. Dhurve Shekhar Madhao
3. Meshram Prerana Yshawant
4. Chauke Gayatri Hemaraj

**M. A.(History )Sem =II**
**Department Of History**
**Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori**

# DECLARATION

We hereby declare that the project entitled " A Historical Study Of Markanda Tempal ",which is being submitted as Historical Project of Second semester of M.A.(History) in Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori Dist Gadchiroli is an authentic record of our genuine work done under the guidance of Prof. W.B.Borkar (Acting Head ) Prof.P.M.Vyahadkar, Prof.S.M. Giradkar Dept. of History in Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori.

Date: / / Borkar D. G.

Place: Armori Dhurve S. M.

Meshram P.Y.

Chauke G. H.

| Student Name | Signature |
| --- | --- |
| 1. Dhaneshwar Giridhar Borkar | ------------ |
| 2. Shekhar Madhao Dhurve | ------------ |
| 3. Prerana Yshawant Meshram | ------------ |
| 4. Gayatri Hemaraj Chauke | ------------ |

# CERTIFICATE

This is to certify that the project report entitled " A Historical Study Of Markanda Tempal " submitted by Borkar Dhaneshwar Giridhar , Dhurve Shekhar Madhao , Meshram Prerana Yshawant , Chauke Gayatri Hemaraj has been carried out under the guidance of Prof. Prof. W.B.Borkar (Acting Head ) Prof.P.M.Vyahadkar, Prof.S.M. Giradkar Dept. of History in Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori.

Mahatma Gandhi Arts, Science & Late N.P Commerce College, Armori * Department of History

Head
Dept. of History
Mahatma Gandhi Arts, science
& N. p. commerce College, Armori.

Dept. of History
Mahatma Gandhi Arts Science &
Late N.P.Commerce College,Armori

# “मार्कंडा मंदीर ऐतिहासीक अभ्यास ”



# MARKANDA TEMPLE

## DIST.GADCHIROLI

# मार्कंडा मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास

पूर्व विदर्भातील गडचिरोली जिल्ह्याच्या चामोर्शी तालुक्यात स्थित असलेले मार्कंडा मंदिर हे विदर्भ व मध्य भारतातील शिवमंदिरांपैकी एक आहे. मार्कंडा मंदिर हे विदर्भातील 'प्रति खजुराहो' म्हणून ओळखले जाते. गडचिरोली जिल्ह्यातील मार्कंडा मंदिर विदर्भातील काशी म्हणून ओळखले जाते. मार्कंडा देव हे भगवान शिवाचे लोकप्रिय स्थान आहे. मार्कंडा मंदिर धार्मिक व स्थापत्य कलेच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे. सध्या हे मंदिर वीज पडल्यामुळे मुख्य मंदिराचे शिखर भग्न अवस्थेत असले तरी या मंदिराची भव्यता आणि धार्मिक महिमा व पावित्र्य आजही कायम आहे.

मंदिर निर्माणासंबंधी पौराणिक, ऐतिहासिक आख्यायिका आहेत. या दृष्टीने पुरातत्वीय शोधासह मार्कंडा मंदिराचे ऐतिहासिक पैलू, धार्मिकता, मंदिर निर्मितीचा काळ, मंदिराची रचना व मूर्तीशिल्प याबाबत माहिती जाणून घेणे आवश्यक आहे



## ● गडचिरोली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-.

गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून झाली. संपूर्ण गडचिरोली जिल्हा पूर्वी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये समाविष्ट होता व मुख्यतः गडचिरोली व सिरोंचा ही ठिकाणे चंद्रपूर जिल्ह्यामध्ये तहसील म्हणून कार्यरत होते.

फार प्राचीन काळी ह्या प्रदेशावर राष्ट्रकुट यांचे राज्य होते. त्यांनीच गडचिरोली जिल्ह्यातील प्रसिद्ध मार्कंडा मंदिर बांधले. त्यानंतर चालुक्य वंशाचे व नंतर देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य होते. देवगिरीचे यादव आणि वारंगलचे काकतिया राजे यांचे अल्लाउद्दिन खिलजी यांच्याकडून पराभूत झाल्यानंतर चंद्रपूरचे गोंड राजांनी आपले वर्चस्व निर्माण केले. तेराव्या शतकात खांडक्या बल्लाळ शाह याने चंद्रपूर शहराची स्थापना केली. १८५३ मध्ये बेरार हा चंद्रपूर प्रदेशाचा भाग ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आला. १८५४ मध्ये चंद्रपूर हा बेरार मधील स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. ब्रिटिशांनी १९०५ मध्ये चंद्रपूर व ब्रम्हपुरीमधील जमीनदारी व मालमत्ता हस्तांतरित करून गडचिरोली तालुक्याची निर्मिती केली. १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून स्वतंत्र गडचिरोली जिल्हा हा भारताच्या ५५६ वा जिल्हा म्हणून अस्तित्वात आला.

## ● गडचिरोली जिल्ह्याचे भौगोलिक स्थान :-

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ या प्रदेशात येतो. गडचिरोली जिल्हा हा राज्याच्या उत्तर-पूर्वेस असून उत्तर अक्षांश १८.४३` ते २१.५०` व पूर्व रेखांश ७९.४५` ते ८०.५३` च्या दरम्यान पसरलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस गोंदिया व भंडारा

जिल्हा, पूर्वेस छत्तीसगड राज्यातील राजनांदगांव, कांकेर, नारायणपूर व विजापूर जिल्हे, दक्षिणेस तेलंगाना राज्यातील जयशंकर भूपालपल्ली, आसीफाबाद व मंचेरीयल जिल्हे व पश्चिमेस चंद्रपूर जिल्हा आहे. वैनगंगा ही या जिल्ह्याची प्रमुख नदी असून ती जिल्ह्याच्या पश्चिम दिशेकडून वाहते व ती जिल्ह्याची सीमारेषा आहे.

१४४१२ चौ.कि.मी. क्षेत्रफळ असलेला गडचिरोली जिल्हा हा आकारमानाने महाराष्ट्रात पाचव्या क्रमांकाचा जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४.७ टक्के क्षेत्रफळ गडचिरोली जिल्ह्याने व्यापलेले आहे.



## ● मार्कंडा मंदिर क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी :-

मार्कंडा मंदिर गडचिरोली जिल्ह्याच्या चामोर्शी तालुक्यातील मार्कंडा गावाच्या पश्चिमेस हे मंदिर स्थापन आहे. मार्कंडा गाव गडचिरोलीपासून पश्चिमेस ४० कि.मी., नागपूरपासून आग्नेयेस १८४ कि.मी. तर चंद्रपूरपासून पूर्वेस ६५ कि.मी.अंतरावर बसले आहे. मंदिर समूह निसर्गाच्या सानिध्यात दक्षिणवाहिनी असलेल्या वैनगंगा नदीच्या डाव्या किनाऱ्यावर उंच खडकावर निर्माण केलेला आहे.

## ● मार्कंडा मंदिर क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

विदर्भातील प्राचीन धार्मिक स्थळांपैकी काही मोजकीच धार्मिक ठिकाणे आपली ऐतिहासिक परंपरा आणि ओळख बाळगून आहेत. त्यापैकीच एक म्हणजे मार्कंडा शिवमंदिर समूह एक आहे. मार्कंडा या क्षेत्राला एक मोठी ऐतिहासिक परंपरा असून या परिसरावर मौर्य, वाकाटक, सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य, माना राजवंश, गोंड राजवंश, भोसले आणि इंग्रज इत्यादी शासकांनी राज्य केले आहे. येथील परिसरात अगदी प्राचीन काळापासून ते भोसले काळापर्यंत पुरावशेष आढळून येतात.

सध्यस्थितीत मार्कंडा शिवमंदिर समूह संरक्षित स्मारक म्हणून भारतीय पुरातत्त्व विभागाच्या संरक्षणाखाली आहे. मार्कंडा मंदिर हिंदू देवतांमधील शिव देवतेला समर्पित आहे. आज येथील चार मंदिरे सुस्थितीत आहेत. उर्वरित मंदिराच्या अवशेषांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. वैनगंगेच्या काठावर असलेले हे मंदिर स्थानिकांसाठी धार्मिक श्रद्धेचे आणि पर्यटनाचे ठिकाण झाले आहे.

## ● महाशिवरात्रीला दरवर्षी यात्रेचे आयोजन :-

दरवर्षी येथे १० दिवसाची मोठी महाशिवरात्रीला यात्रा भरते. दरवर्षी लाखो भाविक छत्तिसगढ, मध्यप्रदेश आणि विदर्भाच्या इतर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर यात्रेकरू मार्कंडा येथे दर्शन घेण्यास येत असतात. महशिवरात्रीच्या दिवशी मंदिराच्या कळसावर मोठा दिवा पेटवला जातो. हा दिवा लावण्याचे कार्य व्याहाड बुज (सावली तालुका, चंद्रपूर) येथील बारावी पिढी अजूनही पार पाडत आहे. मंदिरावर लावण्यात येणाऱ्या दिव्याची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. महाशिवरात्रीला मार्कंडा मंदिरावर लावलेल्या दिव्याचा प्रकाश रामटेक येथील मंदिरावर पडतो.



**मार्कंडा मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार**

- **मार्कंडा येथील मंदिर समूह:-**

मार्कंडा येथील मंदिरे अप्रतिम स्थापत्यशैली असलेली ही बघता क्षणीच मनाला भुरळ घालणारी आहेत. येथील देवालये दक्षिणोत्तर १९६ फुट लांब आणि पूर्व-पश्चिम १६८ फुट लांब काटकोनात वसलेली आहेत. सभोवती ९ फुट उंचीची भिंत आहे. एकूण १८ देवळे या ठिकाणी आहेत. यामधील देवळांपैकी मार्कंडेय ऋषीचे देऊळ, यमधर्म आणि महादेवाचे मंदिर हे उत्कृष्ट शिल्पकलेचे नमुने आहेत. भृषंडीमुनी, मृत्युंजय, विठ्ठल-रखुमाई, उमाशंकर, दशावतार, शक्तीदेवी, हनुमान, गणेश, शंकर, विश्वेश्वर, भीमेश्वर, वीरेश्वर इत्यादी मंदिरे आहेत.







- **पौराणिक मंदिर :-**

वैनगंगा नदीच्या काठावरील मार्कंडा गावाला त्याचे नाव व प्रसिद्धी, सुंदर जांभळ्या रंगाच्या दगडांनी बांधलेल्या मार्कंडा मंदिर समूहामुळे मिळाली आहे. येथील शिवाच्या व नांदी मूर्तीवरून हे शिवाला समर्पित असलेले एक प्रसिद्ध मंदिर आहे. हिंदू धर्मातील प्रसिद्ध ऋषी मार्कंडेय यांच्या नावावरून या ठिकाणाला मार्कंडा असे नाव पडले. मार्कंडेय हे भृगु कुळातला एक ऋषी असून दहाव्या त्रेतायुगात झाला. स्थानिकांच्या मते मार्कंडेय ऋषीने येथे तपश्चर्या करून मार्कंडेय पुराणाची रचना केली. तसेच मार्कंडेश्वर मंदिराची निर्मिती केली. या ठिकाणी ज्या शिवलिंगाची मार्कंडेय ऋषी मोठ्या भक्तिभावाने पूजा करीत त्या ठिकाणी शिवलिंगासोबतच सुंदर मंदिर समूह आहे.



## ● पुरातत्त्वीय संशोधन:-

पूर्व विदर्भातील भद्रावती, राजुरा, नेरी, मार्कंडा इत्यादी ठिकाणच्या मंदिरांची स्थापत्य रचना सारखीच दिसत असल्यामुळे या मंदिर निर्मितीच्या जन्माची स्थानिक आख्यायिका गौरच्या लक्ष्मनिया राजाच्या कथेप्रमाणेच आहे. हेमाडपंथ ने राक्षसांकडून मार्कंडा, भांदक, नेरी इत्यादी ठिकाणची सर्व मंदिरे एका रात्रीत बांधली आहे. हेमाडपंथी मंदिरांच्या उत्पत्तीची कथा चंद्रपूर, गडचिरोली व वऱ्हाड मध्ये सामान्य आहे. हेमाडपंथी मंदिरांचा जनक हेमाद्रीचा काळ इ. स. १२६० ते १२७१ असा आहे. परंतु पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी मार्कंडा मंदिराची निर्मिती ही १० व्या किंवा ११ व्या शतकातील सांगितली आहे. तसेच हेमाडपंथी मंदिरापेक्षा मार्कंडा मंदिर अधिक सुंदर व विस्तृत आहे.

मार्कंडाच्या उद्ध्वस्त मंदिरावरील अनेक शिलालेख अद्याप उलगडलेले नाहीत. मार्कंडा मंदिरातील शिलालेखातील अक्षरे अशोक व गुप्तकाळातील वर्णामध्ये आहेत तसेच खंडित स्वरूपाचे आहेत. त्यामुळे कदाचित आजपर्यंत ते कुणालाही उलगडलेले नाही. मार्कंडा मंदिरातील एक शिलालेख "मकरध्वज जोगी ७००" हा लक्षणीय आहे परंतु डॉ. हिरालाल यांच्या मते तो मंदिरास भेट देणारा यात्रेकरु होता.

## ● मंदिराची धार्मिकता :-

वैनगंगा नदी जिथे उत्तरवाहिनी होते त्या पवित्रस्थळी मार्कंडेश्वर शिवमंदिर आहे. येथे हिंदू धर्माचे अनुयायी मोठ्या श्रद्धेने पूजा-अर्चा करण्यासाठी येतात. वैनगंगा नदी येथे उत्तरवाहिनी झाल्यामुळे या स्थानाला प्राचीन काळापासून धार्मिक महत्व आहे. भाविकांना या स्थळाबद्दल विशेष आकर्षण आहे. मंदिराचे धार्मिक महत्व लक्षात घेऊनच या मंदिरातील

दक्षिण दरवाज्यावर “मकरध्वज जोगी ७००” असे शब्द लिहिलेले आहे. त्याचे विश्लेषण डॉ. हिरालाल यांनी अंक ७०० हे मकरध्वजाचे शिस्तप्रिय शिष्य आहे असे केले. आणि आता हे मत ग्राह्य धरण्यात आले आहे. याचा अर्थ मकरध्वज च्या शिष्यांनी या मंदिरास भेट दिली होती.

मंदिरात दैनंदिन लोकांचा मोठा राबता आहे.महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भारत असते. शिवाच्या दर्शनासाठी हजारो लोक येतात त्यामागे पाप धुवून पवित्र होणे असा उद्देश असतो. काही अभ्यासक व संशोधन करणारे सुद्धा या पवित्र स्थळाला भेट देतात. अलीकडे धार्मिक श्रद्धा व पर्यटनाचे ठिकाण म्हणून मार्कंडा स्थळ प्रसिद्ध झाल्याने मंदिरास भेट देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.



## ● मंदिराचे बांधकाम :-

मंदिराचे आयुष्य साधारण बाराशे वर्ष आहे. मंदिराचे बांधकाम हे स्थानिक बेसाल्ट दगडाचे आहे. नदीच्या पात्राजवळच आढळणारे काळे, लाल काळे दगड साधून एकमेकांवर रचलेले आढळतात. त्याकरिता चुना व इतर नैसर्गिक चिकट रसायन घटक म्हणून वापरले आहेत व त्याआधारे दगड एकमेकांवर रचून नंतर कोरीव काम करण्यात आले आहे. मंदिराच्या बाह्यभागावर कलाकुसर व कोरीव काम आढळते. एकंदरीत रचनेवरून हे मंदिर हेमाडपंथी बांधकाम शैलीचे जरी वाटत असले तरी ते तसे नाही कारण दगडांना जोडण्याकरिता वापरण्यात येणारे चुना व इतर रसायन यांचे मिश्रण हे हेमाडपंथी शैलीत आढळत नाहीत. ही यादवकालीन शैली आहे. मंदिर हे टणक दगडात असूनही अत्यंत आखीव-रेखीव व सुबक बांधण्यात आलेले आहे.



मंदिराचा कळसाचा आकार व शैलीही उत्तर भारतीय मंदिराप्रमाणे आढळते. मंदिर व सभामंडपाच्या पृष्ठभागावर उतरवण्यात आलेल्या कोरीव शृंगारिक भावातील मुर्त्यांमुळे यास ‘प्रति खजुराहो’ अशी ओळख आहे. वस्त्रालंकित ब्रम्हा, विष्णू व महेश तिघेही सपत्नीक उतरवण्यात आलेले आहे. सोबतच विविध देवी देवतांची, विविध प्राणी, पक्षी यांच्या प्रतिमा पाहण्यास मिळतात. मुख्य देवतांच्या मुर्त्या या दरम्यान नृत्य, गायन, वादन ह्या मुद्रेतील मग्न नर्तिका कोरून काढलेल्या आहेत.

एकंदरीत वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या या मंदिरामुळे आपले तत्कालीन कला, स्थापत्य ज्ञानामुळे राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थितीची कल्पना येते.





## ● मंदिर निर्माण काळ :-

मार्कंडा मंदिर निर्मितीचा काळ व मंदिर निर्माण याबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. अलेक्झांडर कनिंघमच्या मते या मंदिराचे बांधकाम खजुराहो येथील बांधकाम सारखेच आहे, त्यामुळे सदर मंदिराचे बांधकाम १० व्या शतकात झाल्याचे मत मांडले आहे. डॉ. शा. भा. देव यांच्या मते, मार्कंडा येथील देवळे खजुराहो सारखीच असल्याने ती खजुराहो येथील देवळानंतरची व यादव काळापूर्वीची असावीत. वा.वि. मिराशी च्या मते हे बांधकाम राष्ट्रकुट राजा तिसरा गोविंद याने केले असावे. चंद्रपूरचा इतिहास या ग्रंथाचे लेखक अ. ज. राजूरकर यांच्या मते मार्कंडा मंदिर कोणत्या काळात कोणी बांधले असावे हा एक जातील प्रश्न आहे. याचा लिखित उल्लेख उपलब्ध नाही. पुढे ते म्हणतात कि या मंदिराचे बांधकाम कल्याणीचा चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य त्रिभुवनमल्ल याच्या कारकिर्दीत त्याचा भांदक येथील अधिकारी यांच्या देखरेखीखाली झाले असावे.

चंद्रपूर जिल्ह्याचे पुरातत्त्व या ग्रंथात समग्र अभ्यासकांच्या मतांचा अभ्यास करून मार्कंडा मंदिराची स्थापत्य रचना, तेथील मूर्ती शिल्प, भौमितिक नक्षी इत्यादींचा विचार करता या मंदिराच्या निर्मितीचा कालखंड इ. स. १०-११ वे शतक निश्चित करणे संयुक्तिक ठरतो असे म्हटले आहे.

## ● मंदिराची रचना :-

हिंदू धर्मीयांची आस्था असलेल्या पवित्र वैनगंगा नदीच्या किनाऱ्यावरील उंच भागावर जिथे वैनगंगा उत्तरवाहिनी होते तिथे आपल्या धार्मिक भावना अर्पण करण्यासाठी

या पवित्र मंदिर समूहाची उभारणी केली गेली. दक्षिणोत्तर १९६ फुट लांब आणि पूर्व-पश्चिम १६८ फुट लांब काटकोनात वसलेली आहेत. सभोवती ९ फुट उंच असलेल्या आणि पश्चिमेकडील दोन बाजुला दोन दरवाजे तसेच सर्व देवळांचा समूह बघण्यास प्रवेश करण्यासाठी दक्षिणेस असलेले एक मुख्य प्रवेशद्वार आहे. अलेक्झांडर कनिंघमच्या मते या ठिकाणी एकूण २० पेक्षा जास्त मंदिरे असल्याचा उल्लेख केला आहे. मार्कंडा एक महान प्राचीन मंदिर आहे यात शंका नाही.

मार्कंडेय ऋषी मंदिराचे अधिष्टान कनी पट्ट कुंभ आणि नक्षीदार सुशोभित आहेत. हे मंदिर निरंधार पद्धतीचे असून मंडपाच्या भिंतीची उभारणी नंतर करण्यात आली. या मंदिराची तुलना खजुराहो येथील मंदिर स्थापत्याशी केली जाते. अर्धमंडप याशिवाय सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असे इतर भाग आहेत. तीनशे वर्षापूर्वी वीज कोसळून या मंदिराचे फार नुकसान झाले व सभामंडप कोसळले.

- **मंदिरातील प्रतिमा :-**

मंदिराच्या गर्भगृहात मंदिराची अधिष्ठात्री देवता शिवलिंग आहे. मुख्य मंदिराचे बाह्यांग व अंतरंग शिल्पांनी अलंकृत असून देवदेवतांची वाहने, शिखरावर वानराच्या क्रीडा, बदकाचे कळप, हत्तीनीची प्रसूती, पक्ष्यांची शिकार वगैरे दृश्ये दाखवली आहेत. या मंदिराच्या स्तंभावर व मंडोवरावर तीन रांगात सुमारे चारशे शिल्पे आहेत. त्यात देवदेवता,सुरसुन्दरी आणी वाघ, सिंह, घोडा,हत्ती,एडका, मांजर इत्यादी विविध प्रकारचे आकृत्या आहेत. अर्ध्याहून अधिक मूर्ती शैव संप्रदायातील आहेत. काही ठिकाणी वाली –

सुग्रीव युद्ध, लवकुश व श्यामकर्ण अश्व, भीम-दुर्योधन मल्लयुद्ध यासारखे प्रसंग कोरलेले आहेत.याशिवाय या मंदिराच्या परिसरात इतरही अनेक प्रतिमा आहेत.

- **निष्कर्ष :-**

- मार्कंडा मंदिर पूर्व विदर्भातील प्राचीन मंदिर समूह असलेले श्रद्धास्थान आहे.
- महाशिवरात्री निमित्त होणाऱ्या जत्रेत हजारो लोक आपल्या श्रद्धा शिवाला अर्पण करतात.
- मंदिराची स्थापत्यशैली हेमाडपंथी नाही तर नागर शैलीची आहे.
- मार्कंडा मंदिर शिव देवतेला समर्पित आहे.
- मंदिराच्या निर्मिती व कार्यकाळ याबाबत अभ्यासकांमध्ये एकमत आढळत नाही.
- उत्तरवाहिनी वैनगंगा नदीच्या किनारी स्थित असल्याने मंदिराबाबत विशेष पुजनीय भाव दिसून येतो.
- मंदिरावर देवी-देवता, पशु-पक्षी, महाकाव्यातील दृश्य, अप्सरा, सुरसुन्दरी यांचे दृश्य अंकित केले आहे.
- चालत आलेली परंपरा लक्षात घेता मार्कंडेय ऋषीच्या पदस्पर्शाने मार्कंडा भूमी पुनीत झालेली दिसून येते..

## मार्कंडा मंदिराची काही निवडक फोटो






















श्री महाकालेश्वर
मंदीर






श्री वरदविनायक
गणेश मंदिर



Mahatma Gandhi Art, Science & Late N.P. Commerce College
Armori Dist: Gadchiroli

Session :2023-24

M.A.Sem –II (History )

Project Work Submission

Date :

| Sr.No | Name of student | Signature | Project Name |
|---|---|---|---|
| 1 | Bambole Divya Naresh | D.N. Bambole | Vairagad Fort |
| 2 | Nannaware Lakhan Umaji | [signature] | |
| 3 | Meshram Jayantkumar Chandrabhan | [signature] | |
| 4 | Kantode Jagruti Diwakar | JKantode | |
| 5 | Borkar Dhaneshwar Giridhar | Borkar | Markhanda Tempal |
| 6 | Dhurve Shekhar Madhao | [signature] | |
| 7 | Meshram Prerana Yshawant | PMeshram | |
| 8 | Chauke Gayatri Hemaraj | [signature] | |

Department of History, Mahatma Gandhi Arts Science & Late N.P. Commerce College, Armori

Dept. of History
Mahatma Gandhi Arts,Science &
Late N.P.Commerce College,Armori

MAHATMA GANDHI RTS,SCIENCE
& N.P. COMMERCE COLLEGE
ARMORI
DIST:GADCHIROLI (M.S)441208

Session -2023-24

## History Field Project

# Vairagad Fort

**M. A.(History )Sem =II**
**NEP-2020**

**Submitted to**
**Prof. Borkar G. W.**
**(Acting Head)**
**Department Of History**
Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori

**Submitted By**

1.Bambole Divya Naresh
2. Nannaware Lakhan Umaji
3.Meshram Jayantkumar Chandrabhan
4.Kantode Jagruti Diwakar

**M. A.(History )Sem =II**
**Department Of History**
**Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori**

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरीद्वारा संचालित

**महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली**

**सत्र : २०२३ - २०२४**

**- प्रकल्प -**

# “विदर्भातील निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास”

- सादरकर्ती -

**कु. हर्षना विनायक निकुरे**

एम.ए. (मराठी) भाग १

मार्गदर्शक

**प्रा. दिलीप घोनमोडे**

**डॉ. प्रा. विजय रैवतकर**

मराठी विभाग व संशोधन केंद्र

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,

आरमोरी, जिल्हा - गडचिरोली.

# प्रतिज्ञापत्र

मी, **कु. हर्षना विनायक निकुरे** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील एम. ए. (मराठी) भाग १ च्या द्वितीय सत्राकरिता **"विदर्भातील निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास"** या विषयावरील प्रकल्प मी स्वत: तयार केला असून, तो मी महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर करीत आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक : 15-04-2024

सादरकर्ती

Hikure

**कु. हर्षना विनायक निकुरे**

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कु. हर्षना विनायक निकुरे** यांनी **"विदर्भातील निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास"** या विषयावरील प्रकल्प गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर केला आहे.

कु. हर्षना विनायक निकुरे यांनी प्रस्तुत प्रकल्प आमच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध केला आहे. त्यांनी या प्रकल्पासाठी आवश्यक सामग्री परिश्रमपूर्वक मिळविली आणि तिचा सर्वमान्य संशोधन पद्धतीप्रमाणे अभ्यास करून सदर प्रकल्पाच्या रूपाने सूत्रबद्ध मांडणी केलेली आहे. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल आम्ही पूर्णपणे समाधानी असून, प्रस्तुत प्रकल्प पदव्युत्तर पदवीकरिता सादर करण्याच्या योग्यतेचा असल्याचे आमचे मत आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक :

मार्गदर्शक

**डॉ. प्रा. विजय रैवतकर**

सहायक प्राध्यापक

म. गां. कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली

मार्गदर्शक

**प्रा. दिलीप घोनमोडे**

मराठी विभागप्रमुख

म. गां. कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली

Head
Dept. of Marathi & Research Centre
M.G. College, Armori

# <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, **कु. हर्षना विनायक निकुरे** यांनी **"विदर्भातील निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास"** या विषयावरील प्रकल्प गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता मराठी विभाग व संशोधन केंद्रात सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकल्प कार्य मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने निर्धारित केलेल्या नियमांच्या अधीन राहून पूर्ण केलेले आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकल्प पूर्णपणे योग्य व परीक्षणासाठी पात्र आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक :

**डॉ. लालसिंग खालसा**
प्राचार्य
महात्मा गांधी कला, विज्ञान व
स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,
आरमोरी, जि. गडचिरोली

**प्रा. दिलीप घोनमोडे**
विभागप्रमुख
महात्मा गांधी कला, विज्ञान व
स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,
आरमोरी, जि. गडचिरोली

Head
Dept. of Marathi & Research Centre
M. G. College, Armori

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कु. हर्षना विनायक निकुरे** यांनी **"विदर्भातील निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास"** या विषयावरील प्रकल्प गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता मराठी विभाग व संशोधन केंद्रात सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकल्प कार्य मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने निर्धारित केलेल्या नियमांच्या अधीन राहून पूर्ण केलेले आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकल्प पूर्णपणे योग्य व परीक्षणासाठी पात्र आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक :

अंतर्गत परीक्षक
Head
Dept. of Marathi & Research Centre
M. G. College, Armori

बहिर्गत परीक्षक
Prof. R.M. Dhote

# ऋणनिर्देश

आपल्या हातून एखादे विशेष असे नवे कार्य घडताना त्या आनंदाला पारावार उतर नाही. असाच अनमोल क्षण मला महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील पदव्युत्तर मराठी चे शिक्षण घेत असताना मला मिळाला.

एम. ए. भाग १ मराठी विषयाचे शिक्षण घेत असताना विद्यापीठाने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमानुसार आम्हा विद्यार्थ्यांना प्रकल्प कार्य पूर्ण करायचे आहे. हे प्रकल्प कार्य पूर्ण करण्यासाठी आमच्या मार्गदर्शकांनी आम्हाला विविध विषय सुचविले. त्यापैकी विदर्भातील कवींच्या कवितांकडे माझे लक्ष केंद्रीत झाले. विदर्भातील अनेक मान्यवर कवींनी मराठी काव्य प्रांताला संमृद्ध केले. विदर्भातील समाजमनाच्या जीवन जाणिवा सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर या वैदर्भीय कवींनी आपल्या काव्यामधून अधोरेखीत केल्या. म्हणूनच या प्रकल्पाच्या अनुषंगाने मी “विदर्भातील निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास” हा विषय प्रकल्प कार्याकरिता निवडलेली आहे. आणि सदर प्रकल्प मार्गदर्शकांच्या सहकार्याने पूर्ण केलेली आहे.

सदर प्रकल्प कार्य ज्यांच्या प्रेरणेने व सक्षम मार्गदर्शनाने फुलले असे माझे मार्गदर्शक आदरणीय गुरुवर्य मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप घोनमोडे सर, डॉ. विजय रैवतकर सर, प्रा. खगेशकुमार सहारे सर आणि प्रा. वर्षा गवळी मॅडम तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा सर या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभार मानते. माझे हे प्रकल्प कार्यत या गुरुवर्यांच्या सहकार्यानेच पूर्णत्वास जाऊ शकले.

धन्यवाद!

सादरकर्ती

**कु. हर्षना विनायक निकुरे**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| | ❖ प्रतिज्ञापत्र | I |
| | ❖ मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| | ❖ प्रमाणपत्र | III |
| | ❖ प्रमाणपत्र | IV |
| | ❖ ऋणनिर्देश | V |
| | ❖ अनुक्रमणिका | VI |
| | प्रस्तावना | १ |
| | ग. रा. वडपल्लीवार यांची नाटके | १ ते ४ |
| | श्री. गणपती रामदास वडपल्लीवार यांनी लिहिलेल्या नाटकांचे विवेचन | ४ ते ६४ |
| | मातामाईचा मुंज्या | ४ ते ११ |
| | झाडपी माणसं | १२ ते १९ |
| | निष्कर्ष | १९ |
| | आधारभूत संदर्भग्रंथ | २० |
| | संदर्भग्रंथ सूची | २० |

# विदर्भातील निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास

## ➢ प्रस्तावना :—

मराठीचे आद्यकवी विदर्भातील मुकुंदराजा पासून उगम पावलेली वैदर्भीय काव्यधारा आजतागायत प्रवाहित आहे. आज या काव्यधारेने महासागराची अथांगता साध्य केली आहे. सहस्त्र वर्षाच्या या काव्यधारेने विविध चढ उतार, वळणे अलगद सामावून घेतली. कधी ऐहिकाची सार्थकता शोधण्यात, तर कधी वास्तवाला सामोरे जाण्यात तिने धन्यता मानली.

१८८५ ते १९२० हा कालखंड म्हणजे आधुनिक काव्येतिहासातील क्रांतिपर्व होय. या कालखंडाचे एकमेवा द्वितीय असे प्रातिनिधीक कवी म्हणजे केशवसुत होत. आत्माविष्काराची असोशी आणि दृष्टिकोनातील नवेपणा हे केशवसुतांच्या कवितेचे खरे बलस्थान होय. कोणत्याही कवीचे श्रेष्ठतव हे त्याने पुढील पिढीवर गाजवलेल्या प्रभावातून सिध्द होते. आजच्या आधुनिक काव्याच्या निराळेपणा कडे बघता. एकंदर मराठी कविता ही केशवसुतांच्या छत्रछायेत विसावलेला असल्याचेच दिसते.

केशवसुत परंपरेतील व त्यांच्या नंतरच्या कवी व कवितांचा आढावा घेता कवी बी, गुलाबराव महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, अनिल, मुक्तिबोध, ना. घ. देशपांडे, भाऊसाहेब पाटणकर, राम शेवाडकर, उ. रा. गिरी, बाबा आमटे. सुरेश भट, निलकांत ढोले, वसंत आ. डहाके, विठ्ठल वाघ, श्रीधर शनवारे, बाळकृष्ण बन्नोरे, मधुकर केचे, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, नारायण कुलकर्णी (कवठेकर), लोकनाथ यशवंत, बबन सराडकर, विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, अंजनाबाई खुणे, सुलभ हेर्लेकर, सुचित्रा कातरकर, आत्माराम क. राठोड, ज्ञानेश वाकुडकर आणि जावेद पाशा अशा ३० वैदर्भीय कवींनी १८८५ ते १९२० पर्यंतच्या वैदर्भीय मराठी काव्यधारेच्या वाटचालीत आपल्या कार्यकतृत्वाने स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या या कार्य कर्तृत्वात एकूणच मराठी कवितेच्या प्रवाहाचे, त्यात वेळोवेळी घडलेल्या परिवर्तनांचे, कवींच्या काव्यवृत्ती व काव्यसृष्टीचे सम्यक दर्शन घडते.

विदर्भाने प्राचीन काळापासूनच सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक वारस्याची समृध्द परंपरा जोपासली आहे. विदर्भाने राजवटींच्या इतिहासा सोबतच वाङ्मयात मराठी साहित्येतिहासाची सुवर्ण पाने साकार केली. मुळात मराठी भाषेच्या प्रारंभ काळातच विदर्भाला साहित्यिकांची थोर परंपरा लाभली. त्यामुळे विदर्भाच्या भूमीत प्रारंभी पासूनच समृध्द व सकस साहित्य निर्मिती झाली. ओवीतील सात्विकते पासून तर लीळेतील परोपकारा पर्यंत मानवी जीवनाच्या अनेक अंगाचे व प्रवृत्तींचे दर्शन त्यातून घडले.

वैदर्भीय कवितेचा विचार करतांना जी कविता विदर्भात अंकुरली ती वैदर्भीय कविता म्हणून ओळखली जाऊ लागली. इ.स. १० व्या शतकात विदर्भातील आंभोरा येथे मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधू' या ग्रंथापासून सुरू झालेली परंपरा पुढे महानुभावीयांच्या साहित्याने अवतीर्ण झाली. मराठीतील आद्य कवयित्रीचा बहुमान ज्या महदंबेला दिला जातो. तिच्या ढवळयाची निर्मिती विदर्भातील ऋध्दिपूरला झाली. मात्र याकाळातील काव्यरचना एका विशिष्ट पठडीत निर्माण झाली. पुढे त्याला छेद देण्याचे कार्य केशवसुतांनी केले.

केशवसुतांपासून अर्वाचिन कवितेस प्रारंभ झाला. त्याच्या कवितेतील विविधतेमुळे त्यांना आधुनिक कवितेच्या जनकत्वाचा बहुमान मिळाला. कारण त्यात नव्य चैतन्य युगाचा उत्स्फूर्त आविष्कार होता. त्यांनी कवितेचे रूपच बदलले. वृत्तांच्या शृंखलांतून ती मोकळी केली. संस्कृत प्रचुर शब्दावलीतून तिला बाहेर काढले. त्यांच्या कवितेतील या आधुनिकतेमुळे तत्कालीन कवींना बळ व प्रेरणा मिळाली.

वास्तवत: केशवसुतांनी एका विशिष्ट चाकोरीबध्द कवितेला नवे वळण लावले. त्यांचेच आदर्श पुढे ठेऊन काही वैदर्भीय कवींनी काव्यात नवता आनण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात विचार करतांना सर्वप्रथम श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा उल्लेख करावा लागतो. कोल्हटकरां सारखेच समकालीन म्हणून पुढे केशवसुत संप्रदाय निर्माण करून, केशवसुतांच्या काव्याच्या प्रेरणेने व आदर्शाने काव्य लेखन करणारे बरेच वैदर्भीय कवी आढळतात. असे हे कवी पुढील प्रमाणे आहेत.

## १) <u>बाबा आमटे</u> :–

बाबा आमटे हे नाव वैदर्भीय काव्यधारेच्या प्रवाहात एका वेगळया अर्थाने महत्वाचे व वैशिष्टयपूर्ण आहे. समाज सेवेसाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित करणाऱ्या बाबा आमटेंच्या काव्यातही त्याचे पडसाद उमटले आहेत. सामाजिक जीवनात दीर्घकाळ संघर्षात आणि सेवारत असण्याचा तो परिणाम आहे. शब्दांच्या मागे कृतीचे तारण असले की शब्द चलनी नाण्यासारखे उपयोगात येतातच याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे बाबांची कविता होय. हातापायाचे खंडहर झालेल्या महारोग्याच्या जीवनाचा जीर्णोध्दार करण्याचे महान कार्य त्यांनी केले. ज्यांना समाजाने वाळीत टाकले. अशा महारोग्यांमध्ये त्यांनी आत्मविश्वास जागृत केला. बाबा आमटे याचे आनंदवन या पराधिनांची कर्मभूमी ठरले. त्यांचे हे विधायक कार्य शक्तीशाली तेजपुंज सारखे आहे.

बाबा आमटे यांच्या सखोल समृध्द व्यक्तिमत्वाने त्यांची कविता देखील चिंतनमुक्त झाली. त्यांची कविता रोगी मनाचे दोष निवारणारी आहे. 'करूणेचा कलाम'च्या सलामीलाच त्यांनी, ''ख्रिश्चानिटी विरूध्द चर्चानिटी या लढाईत मी ख्रिश्चानिटीच्या बाजूने उभा आहे.'' अशी युध्द घोषणा दिली. धर्मांधतेच्या विळख्यात सापडलेल्या समाजाबद्दल बोलतांना ते म्हणतात –

'पण आकाश व्यापणारे विचार
जेव्हा बासनात बंदिस्त होतात
अन् त्यावर मालकी सांगतात
अंगुष्ठा एवढी माणसे
तेव्हा चर्च अन् मंदिराचे होतात
क्रूर कैदखाने
आणि दिसतात त्यांच्या भक्कम गजाआडचे
बंदिस्त प्रेषित अन् बंदिवान परमेश्वर'

असा वज्राघात करतात तेव्हा धर्मवेडयांची तख्ते आज ना उद्या फुटल्याशिवाय राहणार नाहीत, मंदिरांची कुलपे तुटल्याशिवाय राहणार नाही आणि धर्ममार्तंडाचे अस्तित्व

नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही याची साक्ष पटते. त्यांची 'संक्रमण बिनचेहऱ्याच्या शतकाचे' ही कविता युगसंघर्षात उतरलेल्या पांडवपक्षाला बलप्रदान करणारी आहे.त्यांची कविता एकाचवेळी किती नानाविध बाजूंनी आक्रमण करते याची प्रचिती देते.

'असलेल्याचे असलेले राखणारी
अन् सत्तेच्या काठीला प्रलोभनाची गाजरे लटकावून
नसलेल्यांना नुसतीच झुलवित ठेवणारी
घोषणाबाज सरकारे'

याची जाणीव करून देत ते पुढे सांगतात की,

'सम्राट अन् सरंजामशाह संपले आहेत
अन् पैशाची मक्तेदारी पळवाट शोधते आहे
इतिहासाचा पोत बदलला आहे
विसावे शतक सामान्य माणसाचे शतक ठरणार आहे'

असा एक नवा आशावादी लेखाजोखा बाबा आमटे तरूण पिढीच्या हाती देतात.

## २) <u>सुरेश भट</u> :—

सुरेश भट हे मराठीतील एक ख्यातनाम कवी होत. त्यांच्या 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार' इ. शीर्षक देखील त्यांच्या कवितेतील बदलत्या वैशिष्टयांचे निदर्शक आहे. त्यांनी प्रेम भावनेसह सामाजिक, राजकीय वास्तव गझल सारख्या माध्यमातून व्यक्त केले. उत्तान शृंगाराची विविध धुमारे त्यांच्या कवितेत पहायला मिळतात. म्हणूनच त्यातून —

'देखावे बघण्याचे वय निघून गेले
रंगावर भुलण्याचे वय निघून गेले'

अशी उपभोगाच्या असमर्थतेची वेदना त्यातून व्यक्त होतांना दिसते. जीवात्मा आणि परमात्मा, जीवनाची ओढ आणि मृत्युची दारावरची थाप यांचा संबंध दर्शवितांना—

'सजन दारी उभा काय आता करू?
घर कधी आवरू! मज कधी सावरू?'

सुरेश भटांच्या कवितांची मातब्बरी 'रूपगंधा' आणि 'रंग माझा वेगळा' मध्ये जेवढी आहे. तेवढी 'एल्गार' मध्ये जाणवत नाही. भटांच्या सामाजिक कवितांनाही एक धार आहे. 'रंग माझा वेगळा' मधील —

'उष:काल होता होता काळरात्र झाली,

अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली।' **(उष:काल)**

असा आशावाद ते व्यक्त करतात. देशाला स्वातंत्र्य मिळाले परंतु समता आली नाही. श्रीमंत व गरीब यांच्यात मोठी दरी निर्माण झाली. ही दशा निर्माण करणाऱ्या भांडवलशाहीबद्दल तीव्र खंत व्यक्त करतांना कवी म्हणतो —

'तिजोऱ्यात केले त्यांनी बंद स्वर्ग साती

अम्हावरी संसाराची उडे धूळमाती

अशा कशा ज्याने त्याने गाडल्या उमेदी

असा कसा जो तो येथे होतसे खरेदी'

हे समाज वास्तव दाखवून ही स्थिती बदलण्यास 'अजून रक्त मागत उठती, वधस्तंभ सारे' याची जाणीव करून देतात. सुरेश भट खरे रमतात ते गझल मध्ये! गझलमधील वृत्ती व सूक्ष्म निवृत्ती त्यांना सहजच सापडलेली आहे. कारण गझलेतून कोणताही शेर बाहेर वेगळा काढून त्याचे चिंतन केले, तर मागचा पुढचा कोणताही संदर्भ नसतांनाही तो शेर म्हणजे एक संपूर्ण अभिव्यक्ती, एक वेगळी कविताच असल्याचे आढळून येते. गझलेचे खरे गमक हेच आहे की, सुटा शेरही एक पूर्ण कविताच असतो. त्यामुळेच ती नाटयपूर्ण, विरोध लयीने खुलणारी असते.

'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा!

गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा!' **(रंग माझा वेगळा)**

गझल जाणीवपूर्वक हाताळून मराठीत रूढ व लोकप्रिय करण्याचे श्रेय सुरेश भट यांचेच आहे. वेदनेचे गीन गाणारी, पराभवाला महोत्सव मानणारी ही कविता गझलवृत्ती पचवून मराठी कवितेत धीटपणे उभी आहे.

सुरेश भट आपल्या पिढीतील वाङ्मयीन प्रलोभनाच्या तावडीतून स्वत:ची सुटका करून घेतली. आणि विदर्भात एक नवा वाङ्मयीन आदर्श प्रस्थापित केला. त्यातूनय

अनेक बहुजन व दलित समाजातले नव्या ताकदीचे कवी पुढे आले. साध्याच माणसांचा एल्गार आहे, हे सत्य त्यांनी अतिशय समर्पक शब्दात मांडत आहे.

'जरी या वर्तमानाला कळेना आमुची भाषा,
विजा घेऊन येणाऱ्या पिढयांशी बोलतो आम्ही'

अशी स्वत:ची भावना व्यक्त केली. आपला हा 'एल्गार' येथेच न थांबवता, ते अत्यंत धाडसाने 'भीमवंदना' करतात—

'वाढवू आम्ही गती
हा तुझा झेंडा आम्ही
घेतलेला सोबती
ऐक येणाऱ्या युगांच्या आदरांची वंदना!'

डॉ. आंबेडकरांच्या नुसत्या नामजपाने, जयजयकाराने आणि नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीच्या दर्शनाने लाखो दलित बांधवांमध्ये शक्ती संचार होतो. धर्मापासून तो घटनेपर्यंत सगळीच संजीवनी बाबासाहेबांनी पुरविली. त्याचेच परिणाम की दलित पीडित जनता बोलू लागली. आपले अस्तित्व सिध्द करू लागली. शब्दांची ऋतुजा, स्वरांचा गोडवा आणि आशयाचे जीवन भिडलेपण यामुळे त्यांच्या कवितेने आपले स्वतंत्र दालन निर्माण केले आहे. त्यात केवळ सुरांची लालसा नाही, कल्पनांची आतषबाजी नाही तर अनुभवाच्या केंद्राला केलेला भावना आवेगाचा एक विलक्षण स्पर्श आहे.

'सुन्या सुन्या मैफलित माझ्या तुझेच मी गीत गात आहे
अजूतही वाटते मला की अजूनही चांदरात आहे'

गीतिकाव्याचे इतके मनोहर रूप वैदर्भीय काव्यधारेत अपवादानेच पहायला मिळते. म्हणूनच सुरेश भट काव्याच्या क्षेत्रात तेवढेच महत्वाचे ठरतात.

## ३) श्रीधर शनवारे :—

१९६० नंतर स्वत:ची वेगळी आशयाभिव्यक्ती जपणारे कवी म्हणजे श्रीधर शनवारे हे होत. अतिरेकी प्रतिमावाद व आत्मवंचक दुर्बोधता यापासून ते सदैव दूर राहिले. पूर्वसुरींच्या अनुकरणात न रमणारी, समकालीनांच्या वादसंप्रदायात न पडणारी

अशी एक वेगळीच वाट त्यांनी स्वीकारली. त्यात नवता जरूर आहे, पण नवकाव्यातील विकृतीला त्यांनी स्पर्श होऊ दिला नाही. निसर्गनिष्ठा हे त्यांच्या कवितेचे केंद्र आहे. कारण ते चक्क जंगलच अनुभवण्याचा प्रयत्न करतात. जंगलातील वेगवेगळया वृक्षांमध्ये त्यांना मानवी देहाचे, अवयवांचे दर्शन घडते. निसर्गाचे विराटरूप समर्थपणे त्यांच्या शब्दात आहे. रूद्रभीषण निसर्ग साक्षात्काराने डळमळीत न होता एका सहज आत्मविश्वास व नवलाईने त्या रौद्ररूपातील सौदर्य न्याहाळणारी त्यांची प्रतिभा आहे.

मानवी जीवनाच्या अथांगतेचाही शोध ते आपल्या परीने घेतात. एक विशिष्ट जीवन विषयक आकलन घेऊन त्यांनी कविता लिहिली आहे. त्यामुळेच ते 'सत्यकथा' किंवा 'अस्मितादर्श' मध्ये लिहितांना प्रवाहित झाले नाहीत. तर स्वत:ची जीवननिष्ठा त्यांनी सांभाळली. त्यांची कविता व्यक्ती, घटना, निसर्ग त्यांच्या अंतर्बाहय तपशीलासह बोलकी चित्रे उभी करीत राहिली. गिट्टीखदान, कामठी, बहिरमबुवा, बहुरूपी, कथकली इ. अनेक कवितांमधून त्यांचे एखादी घटना रेखाटण्याचे कसब व शब्दसामर्थ्य जाणवते.

शनवारे यांची सूक्ष्म निरीक्षण दृष्टी 'बरसाली' या कवितेतून दिसते. यात त्यांनी अत्यंत बोलके भावचित्र रेखाटले आहे. शस्त्राला धार लावणाऱ्या चाकासारखा पैसेंजरचा कीचकीच आवाज, स्टेशन समोरच्या फुटक्या दिव्याची बाहेर आलेली टोकदार काच, भूता सारखा पायऱ्या उतरत आलेला केबिनमॅन, बॉल टोकन पोहचवण्यात ओला झालेला चोळामोळ दाढीचा पाइंटमॅन व ऑफिसकडे वळलेला हेडलैंपवाला हे सर्व एखाद्या चलचित्रा प्रमाणे दृष्टी समोर साकार होतात. कवितेत खबानदोश नावाच्या भटक्या जमातीचा एका रात्रीचा भयप्रद सहवास कवीने ज्या कुशलतेने रेखाटला तो अजोड आहे. त्यांचे निसर्गाकडे पाहणेही अजोड आहे.

'अरूणाचल' कवितेत तिथले तेंगाचे झाड, बॉटया बुंधा, मेकनिया वेली, हिमालयाच्या पर्वत रांगा, तेथील स्त्रियांचे रंग, रूप, दाव नावाचे शस्त्र या सर्व गोष्टींचे दर्शन या कवित घडते. तेव्हा कवीची निसर्ग वेधकताही विदर्भातील साऊर खेडे व तेथील बहिरमबुवाची यात्रा इतकीच मर्यादित न राहता, सरहद्दी पर्यंत सर्वव्यापी असल्याचे सिध्द होते. त्यांच्या कवितेत भव्योदात्त निसर्गाचे केवळ कुतूहल नाही, तर त्यासोबतच ते समाज भाष्यही करतात.

'विंध्यच्या विक्राळ जंगलातील
मांसाहारी मातंगी देवी
वाघावर बसलेल्या तिच्या हातातील
आठ रक्ताळलेली आयुधे
अघोरी मंत्रासारखा इथला विकट वारा,
मगरीच्या पाठीचे बुंधे असलेले
सागाचे प्रचंड वृक्ष.'

असा हिंस्त्र निसर्गही ते तितक्याच कुशलतेने साकार करतात. कवितेच्या एका विशिष्ट झंझावात त्यांची कविता अवतरली, तरी तिने इष्ट वळण ढळू दिले नाही. हे त्यांच्या कवितेचे खास वैशिष्टय होय.

## ४) <u>अंजनाबाई खुणे</u> :—

वैदर्भीय काव्यधारेत अंजनाबाई खुणे यांच्या कवितेने एक वेगळाच ठसा निर्माण केला आहे. 'अंजनाबाईची कविता' या पहिल्याच काव्यसंग्रहाने त्यांना प्रसिध्दी मिळाली. झाडीबोलीतील सौदर्य धारण करून त्यांची कविता आकारास आल्यामुळे मराठीच्या काव्य परंपरेत त्यांच्या कवितेने लक्ष वेधून घेतले. अंजनाबाईची कविता साधी, सोपी व हदयाचा ठाव घेणारी आहे. त्यात कुठलाही बडेजाव नाही, तर ती त्यांच्या हदयाची हाक आहे. त्यात प्रबोधनाचे सामर्थ्य आहे. कर्तव्याची जाण आहे, तशीच देशप्रेमाची उर्मी आहे. शीघ्र कवित्व हा त्यांचा विशेष गुण आहे. त्यांची राष्ट्रीय कविता आता अभ्यासाचा विषय व्हावा इतकी प्रगल्भ झाली आहे. त्यांनी केलेले कारगील व तत्सम सीमा युध्दा संदर्भातील वर्णन त्यांच्या चौफेर निरीक्षणाची व काव्यदृष्टीची साक्ष पटवून देणारे आहे.

'इंच इंच भूमी आज
जरी रक्ताने माखली
शूर जवानांनी लाज
भूमातेची राखली' **(कारगिलचे युध्द)**

आपल्या देशाप्रति प्राणांची बाजी लावणारे शूरवीर भारतमातेच्या रक्षणासाठी कसे सिध्द आहेत. याची जाणीव त्यांनी करून दिली आहे. तसेच भारतातील मुख्य व्यवसाय शेती असून, आज त्याच शेतकऱ्याची जी दुरावस्था होत आहे. त्यामुळे त्यांचे संवेदनशील मन तेथे धाव घेते.

'शेतकऱ्याच्या कष्टाला
नका समजू फोल
त्याच्या मालाला मिळावे
खरा भाव, योग्य मोल' **(शेतकऱ्याचे दुःख)**

शेतात रात्रं दिवस काबाडकष्ट करणाऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळाला, तरच तो सुखी जीवन जगू शकेल. याची जाणीव त्या करून देतात. अंजनाबाईचे कवी मन जसे जवानाला कर्तव्याची जाण करून देते. शेतकऱ्याच्या दुःखाला वाचा फोडते. तसेच व्यसनाधीन माणसाला वठणीवर आणण्यालाही मागेपुढे पहात नाही.

'दारू पेऊन आला घरी
मनते. 'भूक लागली
दे मालं न्याहारी'

पतीच्या व्यसनाधिनतेमुळे कंटाळलेली स्त्री त्याला तेवढयाच रोखाने ठणकावून सांगते की –

'अरे, थोडी तू ठेव
या घराण्याची लाज
जोडुनि कर इनवी
तुलं अंजना अज!' **(दारू सोडा)**

झाडीबोलीचे लोभस रूप येथे प्रत्ययाला येते. आई हा सर्वांच्याच आस्थेचा विषय आहे. आजवर आईवर अनेकांनी कविता लिहिल्या. अंजनाबाई आपल्या 'सून मनं सासूलं' या कवितेत मातेची व्यथा प्रकट करतांना म्हणतात –

'बेमार पल्ली तवर
दवाई नोहोती भेटत

तेरवीच्या दिसी गावालं
पुऱ्या, वडं वाटत.'

जीवंत म्हाताऱ्या आई वडिलांची सेवा करण्यातच खरे सार्थक आहे. याची जाणीव त्या येथे करून देतात. अवघ्या चार वर्ग शिकलेल्या अंजनाबाईची प्रतिभा पाहून त्यांना 'झाडीपट्टीची बहिणाबाई' अशी दिलेली उपाधी सार्थच आहे. वैदर्भीय काव्यधारेतच नव्हे, तर एकूणच मराठी कवी परंपरेत अंजनाबाईचे निराळेपण सहज नजरेत भरणारे आहे.

## ५) <u>वसंत आबाजी डहाके</u> :—

साठोत्तरी मराठी कवितेत प्रयोगशीलतेच्या खुणा उमटवणाऱ्या कवींमध्ये वसंत आबाजी डहाके एक आहेत. १९७२ ला त्यांचा 'योगभ्रष्ट' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिध्द झाला. त्यांची कविता अस्तित्ववादी जाणिवांमुळे वैदर्भीय काव्यधारेत वैशिष्टयपूर्ण ठरली. जीवन विषयक तथाकथित मूल्ये नाहीशी झालेली व नवी मूल्ये अजून न सापडलेली अशा अवस्थेतील ही कविता एकटेपणा, जीवनाच्या हेतुशून्यतेची जाणीव आणि त्यामुळे येणारा हताशपणा, जीवन जगण्याच्या यांत्रिक धडपडीमुळे येणारा चेंगरलेपणा या अनुभव केंद्रा भोवती रूंजी घालते.

'मी या युगाच्या कातडीवरील
एक लहान जळता डाग;
एखाद्या माळरानासारखा ओसाड अर्थहीन'

आज जीवनाच्या गुंतागुंतीवर व अनाकलनीयतेवर भर देत आजच्या माणसाच्या दुबळेपणावर व अगतिकतेवर प्रकाश टाकीत कवी काही मुलभूत प्रश्न उपस्थित करतो. आजपर्यंतची वैदर्भीय कविता ही ज्या जाणीवा दर्शवित होती, त्याहून वेगळी अशी जाणीव ही कविता व्यक्त करते.

सामाजिक बांधिलकीला नकार; पण स्वत:चे अस्तित्व घेऊन जगतांना सामाजिक विकृतीचे आलेले अनुभव व समाज मनाची वेदना पाहून ते संभ्रमात पडतात. ही संभ्रमावस्था 'प्रारब्ध जखडलं आहे' अशा ओळींतून जाणवते. मनुष्यातील दुबळेपणा,

लाचारी व कार्य करण्याची कुवत नसणे अशा अनेक प्रश्नाचे दर्शन त्यांच्या कवितेतून घडते. त्यामुळेच ते खंबीरपणे सांगतात—

'मी चक्क पुस्तकातील किडा, अत्यंत बिनबुडाचा
किंवा बी नसलेले रसयुक्त फळ
स्वत:च्या चरित्रावर एकसत्ताक राज्य करणारा
अथवा एक प्रचंड रूग्णालय' **(पुस्तकातील किडा)**

कवीला सर्व जगच अशक्त, लुळं पांगळ वाटू लागते. जगण्याचा विरंगुळा म्हणून केल्या जाणाऱ्या नाटकापेक्षा फार मोठा अर्थ कवेत येत नाही. त्यांच्या 'नाटक' कवितेत मुद्दाम नारायणराव पेशव्याच्या खुनाची आठवण दिली आहे. आजचा माणूस कसा नारायण पेशव्यासारखा दुबळा अपरिपक्व आहे हे सूचविले आहे. आपण का जगतो? आपल्या जगण्याला काही अर्थ आहे का? आपण झापडे लावूनच का जगतो? असे मूलभूत प्रश्न कवीला पडतात. आणि एकाकीपणाची, आयुष्याच्या निरर्थकतेची जाणीव त्यांच्या मनात निर्माण होते.

पारंपारिक नीतिकल्पनांच्या, सामाजिक दडपणांच्या जाचापुढे मानवी प्रवृत्तींचा होणारा कोंडमारा व त्याचे दुबळया भयात होणारे रूपांतर अशा अतिवास्तवादाच्या पातळीला त्यांची कविता स्पर्श करते. याचे प्रत्यंतर 'शुभवर्तमान' या संग्रहात येतो.

'जंगलात जावं तर तिला भय वाटतं, बिबटयाचं;
डोंगरावर जावं तर तिला भय वाटतं अस्वलाचं, लांडग्याचं;
..........म्हणून ती म्हणते मला माझ्या सख्ख्या मोठया भावा,
ही कोयती घे अन् घाल घाव मानेवर,
माझ्या अन् या लेकराच्याहि...............' **(लोकगीत)**

आजच्या या युगात हे भय पावलोपावली भेटते. फक्त त्याची रूपे निरनिराळी असतात. जगाच्या व्यवहारात माणसाची क्षुद्रता, जगा विषयीचा परकेपणा व त्यातून निर्माण होणारा एकाकीपणा याचे दर्शन त्यांच्या कवितेतून घडते.

एखादी गोष्ट करण्याची आवड असून संधीच मिळत नाही. याची अनुभूती 'चित्रलिपी' संग्रहातील कवितेतून येते. म्हणूनच 'मला काही निवडायची संधीच नाही. सगळं लादलं

जातंय मस्तकावर' अशी भावना कवी व्यक्त करतो. माणसे, त्यांची मने, भोलतालचे सारे ताण हे व्यक्त करीत जाणारी ही कविता विचार, चिंतनशीलता व सध्याच्या भीषण वर्तमानाने दिलेली भयावह अवस्था त्यांच्या घुसळणातून आकार घेते. आणि समकालीन जीवनातील शून्यत्वाचा, पोरकेपणाचा समग्र वेध घेत व्यापक होत जाते. समाजात वावरतांना सर्वच बाजूंनी व सर्वांकडून होणारा आघात मनाला सुन्न करतो, तेव्हा कवी म्हणतो –

'एक मुंडकं म्हणतं
तुझा मेंदू काढून दे
दुसरं मुंडकं म्हणतं
तुझं हदय काढून दे........'

हे सर्व दिल्यानंतर आपण हाडामासाचा फक्त सांगाडाच म्हणून शिल्लक राहिल्याची कवी कबुली देतो. आपले जीवन कसे शून्यवत होत गेले याची जाणीव कवीने येथे करून दिली आहे. अशा वास्तवदर्शीपणामुळेच डहाकेच्या कविता वैदर्भीय काव्यधारेत आपले एक वेगळे अस्तित्व निर्माण करून जातात.

## ६) विठ्ठल वाघ :–

साठोत्तरी कवितेच्या कालखंडात ग्रामीण कवितेनेही अभूतपूर्व क्रांती घडवून आणली. या क्रांतीची मूळ प्रेरणा महात्मा फुले याची कविता ठरली. पुढे अनेक कवींनी मराठी ग्रामीण कवितेला समृध्द करण्याचे कार्य केले. त्यातीलच एक कवी म्हणजे विठ्ठल वाघ हे होत. आज त्यांची कविता ग्रामीण जीवन अभिव्यक्त करण्यात यशस्वी झाली असल्याचे स्पष्टपणे जाणवते. त्यांच्या 'साय' आणि 'काया मातीत मातीत' या संग्रहातील कविता विनोद वा चमत्कृती पासून अलिप्त असून हळूवारपणे ग्रामीण जीवनाचा प्रत्यय घडवते. प्रेम आणि ग्रामीण निसर्गात त्यांची कविता रमलेली असली, तरी त्यातील नाटय मनोवेधक आहे.

विठ्ठल वाघ यांच्या कवितेतला निसर्ग रानातील पिक, माती, माणूस व प्राणी यांना एकाच पातळीवर आणतो. वऱ्हाडी बोलीचे रूप घेऊन येणारी त्यांची कविता वाचकांचे लक्ष वेधून घेते.

'काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते तिफन चालते.'

माती, निसर्ग, पाऊस, ढग, जनावर व शेतकरी कुटुंबाचा एकजीव गोतावळा; त्यांचे परस्पर संबंध याचे सुरेख नाटय 'तिफन' या कवितेतून त्यांनी साकार केले आहे. समकालीन युगभान त्यांनी जपले आहे. आजच्या जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाच्या काळात माणसाचे अध:पतीत स्वरूप बोली भाषेत, शेतकरी जीवनातील बोरीबाभुई, पराटी, चिलाटी, साचली या प्रतिमांचा वापर करून मांडले आहे.

'कसा झाला हा माणूस कळू निंबाचा रे पाला
येल काकळीचा होता बारं कारल्याचा आला'

अशा ओळीतून माणूसकी विसरलेल्या माणसाबद्दल खंत व्यक्त केली आहे. तर संतांबद्दल आदर ठेवून शेती विषयीची निष्ठा 'वावर' या कवितेतून जोपासली आहे. त्यात कवी म्हणतो –

'असी कायी माती माही साता जलमाची माय,
तुका असा पांडुरंग रंगवून घे कपाय.'

विठ्ठल वाघांची 'म्हैस' कविता खेडयातल्या आजच्या विविध प्रश्नांचे प्रतिनिधित्व करते. पंचवार्षिक योजनांतर्गत विकास प्रकल्प कागदोपत्री खेडयांसाठी आखले जातात. पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. याचेच दर्शन त्यांच्या 'मेंढर' या कवितेतून होते. या अन्यायाला कोणते घटक जबाबदार आहेत, याचे वर्णन त्यांनी यात केले आहे. खेडयातील साधी भोळी जनता नेत्यांच्या आश्वासनाला बळी पडते, पण शेवटी त्यांचा भ्रमनिराश होतो. दुध गंगेचा उगम खेडयात होतो. पण तिचा महापूर शहरात वाहतो. दिवसभर गायी चारणाऱ्या पोराला दुधाचा थेंबही मिळत नाही. ही विसंगती दाखवितांना कवी म्हणतो –

'दुधासाठी पहलं पोट्ट घासून मेल हातपाय

औंदाच्या सालीबी गंर्भार आये त्याची माय'

सामाजिक वेदना मांडणारी वाघांची कविता वास्तवतेचा लेखाजोखा सादर करणारी आहे. याशिवाय लोकगीतांतील जीवनसत्वांचे यथार्थ आकलन, आदिम जीवन धारणांचे व लोकमानसांचे मनोज्ञ दर्शन त्यांच्या कवितेचे बलस्थान आहे. वऱ्हाडी भाषेचं अंत:करणच जणू खुल्या दिलाने त्यांच्या कवितेतून साकार होते.

## ७) ज्ञानेश वाकुडकर :–

वैदर्भीय काव्यधारेत एका निराळया अर्थाने रसिकांचे लक्ष वेधून घेणारे कवी म्हणजे ज्ञानेश वाकुडकर होत. 'सखे साजनी' या दीर्घ मालिका कवितेने समस्त मराठी रसिकांच्या हदयात प्रेमाचा शिडकाव करणारे ज्ञानेश वाकुडकर यांच्या कवितेचा 'शृंगार' हा रसराज आहे. स्त्री देहाचे इतके सूक्ष्म निरीक्षण काव्यातून त्यांच्या इतके कुण्याच कवीने केले नाही. वाकुडकरांच्या कवितेचे विशेष म्हणजे त्यांची कविता शृंगारिक असली, तरी त्यात बिभत्स व भडकपणा अजिबात नाही. याउलट त्यात नर्म शृंगाराचा सुखद गारवा आहे. स्त्रीच्या सन्मानाला कुठेही बाधा पोहचणार नाही. याचे कवीने भान राखले आहे.

ज्ञानेश वाकुडकरांच्या रूबाया, मुक्तक वा शेर हे देखील रसिकांच्या मनावर वेगळी छाप सोडून जातात. 'रूबाई' हा चार ओळींच्या काव्य प्रकार, पण त्याचे स्वरूप प्रचंड वेधक आहे. पहिल्या दोन ओळीत यमक, तिसरी ओळ विनायमकाची आणि चौथ्या ओळीत चमत्कृतिपूर्ण कलाटणीसह पुन्हा यमक असे या प्रकाराचे बाहय स्वरूप आहे.

'देहाचे अवघे प्याले
एकाच मुशीतून आले
एकाचे घर मोहाचे
एकाचे मंदिर झाले!'

अवघ्या चार ओळीत आकर्षक भाषाशैली व बेमालूम धक्कातंत्राचा सफाईदारपणे वापर करून एखादा विषय रूबाईतून मांडण्याचे कसब कवीला साधले आहे. त्यांनी

स्वयंपूर्ण, सरळ, साधी व स्पष्ट अभिव्यक्ती असलेली चार ओळींची लघुतम कविता 'चारोळी' देखील रचली आहे.

'दाण्यासाठी गाण्याचं
जेव्हा कबूल केलं
कोकिळेच्या कंठातलं
गाणचं हरवून गेलं!'

यातही त्यांनी निराळी परिणामकारकता साधली आहे.

शीघ्र कविता हे वाकुडकरांचे एक विशेष आहे. त्यांच्या कवितेतील उत्स्फुर्तता वेधक आहे. त्यांनी चारोळी व रूबाई सोबतच स्वत:चा वेगळेपणा जपणाऱ्या मनाचा मनाशी हदय संवाद साधणाऱ्या वेगळया फॉर्ममधील सहा ओळींच्या काही कविता लिहिल्या, त्याला त्यांनी 'संवादिनी' असे नाव दिले. रचनेच्या अंगाने विचार केल्यास त्यांचे निराळेपण सहजच जाणवते.

'नवे पारधी, नवीन फासे
कोळयासोबत मिळून मासे
असे तयांनी तळे घेरले
असा टाकला डाव
समानतेचे नवे पुजारी
भाजून खाती गाव'

हे समाज वास्तव अतिशय समर्पक शब्दात कवीने येथे मांडले आहे. काव्य प्रकार कुठलाही असो, दर्जेदार रचना करण्यास संपन्न प्रतिभा, समृध्द चिंतन, भाषेवरील प्रभुत्व, लेखन तंत्राची अचूक जाण आणि सहज सुंदर रूपात अभिव्यक्त होणारं संवेदनशील मन असणे गरजेचे आहे. हे सर्व वाकुडकरांच्या ठिकाणी असल्यामुळे त्यांनी हाताळलेला कुठल्याही काव्य प्रकाराने अल्पावधीतच लोकप्रियतेचे शिखर गाठले. हा त्यांच्या चिंतनशीलता व सौदर्यानुभूतीचा परिणाम आहे. त्यामुळेच त्यांची कविता वैदर्भीय व मराठी काव्याच्या परिप्रेक्षात निराळी ठरली.

## ८) उषाकिरण आत्राम :—

उषाकिरण आत्राम हया आदिवासी कवयित्री होत. कवी तुमरामांच्या कवितेशी नाते प्रस्थापित करीत, पण रानातील लाल पळसफुलांची अंगार घेऊन अवतीर्ण झालेली त्यांची कविता स्त्रीवादाचा बुलंद आवाज उठविणारी आहे. व्यवस्थेविरूध्द बंड पुकारण्यास बळ देणारी आहे. ‘म्होरकी’ पासून सुरू झालेला त्यांचा काव्य प्रवास ‘लेखणीच्या तलवारी’ पर्यंत येऊन ठेपला. त्यांची कविता स्वानुभवातून, स्त्री अत्याचार अन्यायातून, त्यांच्या हुंदक्यातून, आक्रोशातून निघालेला हुंकार व जीवन सत्य आहे. म्हणूनच त्या म्हणतात, हिला ना मिळाला कौटुंबिक वारसा वा गोतावळा, जे अनुभवले, भोगले, पाहिले व जे वाटले ते लिहिले.

उषाकिरण आत्रामांनी आपल्या वाटयाला आलेला अनुभव आवेशाने व्यक्त केला आहे. नाचण्याच्या धुंदीत जग विसरून जाणारा आदिवासी समाज स्वत:चे दु:खही विसरतो.

‘दु:खाला विसरण्यासाठी
बांबूच्या सनईतून
चामडीच्या ढोलातून............ढम तालावर
रि रो.......रेला रे........रि रे......रेला रे!
स्वत:ला विसरून.......नाचतो वेडा होऊन’ **(जगापासून दूर दूर)**

यात कवयित्रीच्या मनाची बंडखोरी नसली, तरी अस्वस्थ करून सोडणारी वास्तवाची भयानकता आहे. आदिवासी स्त्रीला समाजावस्थेत अजूनही मानाचे स्थान नाही. समस्त देहाला गोंदून मूळ सौदर्य नष्ट करण्याला ती संस्कृती मानते. स्त्रीलंपटांच्या आमिषांना भाळून आपले सर्वस्व लुटवून बसते. परंतु तिचे चित्कार रानातच विरून जातात. ही आदिवासी स्त्रीची भयावहता पाहून तिच्या शील चारित्र्याचा बाजार केव्हा थांबणार? असा प्रश्न त्यांना विवश करतो. तेव्हा कवयित्री आपल्या आदिवासी भगिनींना सतर्कता व सामर्थ्याया गंभीर इशारा देते.

'वाटेन जातेस तर समद्या डोयाले आग लागन
राणे! तुझ्यावर नजर समद्या सुधारलेल्या बाप्यायची
म्हणून म्हणते 'तू रातराणी होवू न गं!
व्हसील तं पयसाची लाल तांबडी आगं व्हयं!
नायत् बिब्याची फुलं व्हय!' **(पयसाची लाल आग व्हय)**

पळसाची लाल आग व बिब्याची फुलं या रान प्रतिमा बरेच काही सांगून जातात. आदिवासींमध्ये असणारे अंधश्रध्देचे प्रस्थ नष्ट करण्यासाठी स्वत:च स्वत:या प्रकाश झाले पाहिजे याची जाणीव त्या करून देतात.

आदिवासी जीव लपवून जगतो. नक्षलवादाने त्याचे वंशविच्छेदन होत आहे. घरदार, जल, जमीन, जंगल सारे लुटून तो बेसहारा झाला आहे. रोज पडणारे मुडदे, जंगल जिव्हाऱ्यातल्या आर्त किंकाळया व त्यांचे उद्ध्वस्त झालेले संसार या सर्व प्रश्नांमुळे खरेच मला देश आहे काय? असा प्रश्न 'बाताल मावा देस?' या कवितेत कवीच्या मनात निर्माण होतो.

'तिची काळीज कापणारी हाक ऐकून
रान थरारू लागले' **(बाताल मावा देस?)**

हे वास्तव उषाकिरण आत्राम यांच्या कवितेतून येते, तेव्हा निश्चितच स्वतंत्र भारतात आजही आदिवासींची काय अवस्था आहे. याची जाणीव होते. त्याची कविता प्रत्येकाला विचार प्रवृत्त करण्यास भाग पाडते. त्यांच्या कवितेतील आदिवासींची ही वास्तव दाहकताच त्यांच्या कवितेचे मर्म सांगून जाते. एकूणच मराठी काव्य परंपरेत व वैदर्भीय कवी परंपरेत एका आदिवासी कवयित्रीने मांडलेले हे वास्तव सत्य लक्षवेधक आहे.

## ९) <u>लोकनाथ रंगनाथ</u> :—

लोकनाथ रंगनाथ हे दलित कवितेच्या क्षेत्रातील एक प्रभावी व महत्वाचे कवी होत. त्यांचे 'आता होऊन जाऊ द्या', 'आणि शेवटी काय झाले', 'पुन्हा चाल करूया' हे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या काव्यसंग्रहांच्या शीर्षकातूनच त्यांचा नवतावादी

दृष्टिकोन प्रत्ययाला येतो. संघर्ष हा त्यांच्या कवितेचा प्राण आहे. त्यांची कविता भावनाशील वृत्तीने सामाजिक व्यवस्थेच्या विरोधात उभी राहते. म्हणूनच ते म्हणतात –

'जोहार करणारे आमचे हात।
आम्ही कापून फेकले।
आता शस्त्रांशिवाय हातात काही नाही।'

हे शस्त्र ज्ञान, बुध्दी, संस्कृती व नैतिकतेच्या धारेचे आहे. त्याने प्रस्थापितांना इशारा दिला होता की, 'आता तुम्ही आमच्या सोबत सांभाळून वागलं पाहिजे.' परंतु असे म्हणतानाच कवी 'आणि शेवटी काय झाले?' असा प्रश्न करतो. कारण कदाचित या व्यवस्थेने दलित चळवळ वा नेतृत्वाला संपवून टाकले आहे, असे त्यांना वाटते. आपल्या नेतृत्वा विषयीचा भ्रमनिरास झालेला. बाबासाहेबांविषयी असलेल्या जनसामान्याचा आदर व जिव्हाळा यांचा लाभ उचलणारे नवेच बहुरूपी नवनव्या नावाखाली समूहाला वापरू लागले. तेव्हा कवी म्हणतो –

'विद्रोहाची भाषा करणारे सत्ताधारी होऊन
लाळ गाळू लागले.' **(वर्तमान)**

हे जनसामान्यांच्या मनातलेच शल्य कवी बोलून दाखवितो.

लोकनाथांची कविता म्हणजे व्यवस्थेच्या बहुरूपीत्वाचा वेध घेणारी आहे. एक व्यवस्था मोडून काढतांना दुसरी व्यवस्था उदयाला येत असते. ती उपयुक्त की अनुपयुक्त हे ठरवावे लागते. त्यांच्या अनेक कविता स्व समाजाच्या आत्मटिकेचा विषय झालेल्या आहेत. त्यांच्या कवितेचा आकृतिबंधही लक्षणीय आहे. चिरडल्या गेल्याची दाहक वेदना शब्दरूपात पकडतांना अवशिष्ट आशयाचे जे तुकडे त्यांच्या हाती आले, त्याचीच मांडणी त्यांनी आपल्या कवितेतून केली आहे. लोकनाथांची कविता जनसामान्यांची आहे. नागडया व्यवस्थेचा आरसा ती सहजपणे दाखवून देते. आशय आणि अभिव्यक्ती यादृष्टीनेही त्यांच्या संग्रहातील कविता लक्षवेधक व महत्वाच्या आहेत.

## १०) <u>विनायक तुमराम</u> :—

आदिवासींच्या जीवन जाणिवांचा वेध घेणारे वैदर्भीय कवी म्हणजे विनायक तुमराम होत. त्यांचे 'गोंडवन पेटले आहे' व 'रानगर्भातील जखमा' हे दोन कविता संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांची कविता प्रचलित व्यवस्थेच्या संदर्भात एक प्रखर विरोध, विद्रोह प्रगट करतांना दिसते. तसेच त्यांच्या कवितेतून आदिवासींच्या चिरदु:खाचे हुंकार व्यक्त होतात. म्हणूनच प्राचार्य राम शेवाळकर या कवितेला 'नव्या प्रबोधनाचे उषासूक्त म्हणतात.' तुमरामांनी आदिवासीच्या दु:खाला वाचा फोडण्याचा यथोचित प्रयत्न आपल्या कवितांमधून केला आहे. ते म्हणतात की —

'मुक्तीच्या वाटाच साऱ्या कशा
अंधारून आल्या आहेत
आपलाच आपण हात धरून
मार्ग शोधायची आता
वेळ आली आहे.' **(स्वप्नांचे दिवे)**

आपले दु:ख निवारण्यासाठी आपणच पुढाकार घेतला पाहिजे. हे आत्मभान कवीला येथे आले आहे. प्रस्थापित समाज व्यवस्थेने येथील मुळनिवासी असणाऱ्या आदिवासींचे जगणे असहाय्य करून टाकले आहे. एकीकडे वन कायद्यामुळे त्यांचे जंगलाचे स्वामित्व संपुष्टात आले, तर दुसरीकडे त्यांच्या अशिक्षित व साधेपणाचा फायदा घेऊन त्यांचे आर्थिक, मानसिक शोषण सुरू आहे. त्यातून आदिवासी स्त्री देखील सुटली नाही. हे विदारक सत्य 'आदिवासी माय' या कवितेतून मांडले आहे.

तुमरामांच्या 'रानगर्भातील जखमा' या काव्य संग्रहातील कवितांना निरनिराळे सामाजिक व सांस्कृतिक आयाम आहेत. आदिवासींचे प्रश्न समस्या, गरीबी, बेरोजगारी व भटकंती यावर गंभीर चिंतन करणाऱ्या या कविता आहेत. त्यांच्या काही कवितांमधून आदिवासींच्या समृध्द संस्कृती व त्यांच्या निसर्गनिष्ठेची साक्ष पटते.

'पौर्णिमेच्या धुंद रात्री रानी विलसते रम्य प्रभा
उठतो ध्वनी पहाडात हा रेलॉ ....रे भिडतो नभा'

आदिवासींचे स्वछंद जीवन, त्यांचे निसर्गाशी समरसून जाणे या गोष्टी विलक्षण आहेत. आपली ही आदिम संस्कृती त्यांनी पिढयान पिढयापासून जतन केली आहे.

'हया आद्य जीवन संस्कृतीची ही रीत युगे चालली
विश्व त्यांचे तेच फुलविती ही मुक्तियात्रा चालली' **(रेलॉ.......रे)**

परंतु आज त्यांचे हे जीवन कसे भयप्रद झाले आहे. त्यांचे हे अस्तित्व उद्या राहणार की नाही अशी चिंता कवी मनाला व्यथीत करते. याचे वर्णन ते 'क्रौयैछाया' या कवितेत करतात. मात्र आजची ही काळरात्र उद्याचा उष:काल घेऊन येणार आहे, असा आशावाद त्यांना आहे.

'ललकारते का रविला ही रात्र काजव्यांची
उष:काल अटळ हा क्षितिजास आस त्याची' **(संकेत अन् इशारे)**

उद्याचा उष:काल पहायचा असेल, तर सर्वय आदिवासींनी एकसंघ होऊन काळोखाचे साम्राज्य धुडकावून लावले पाहिजे. हे एकटयाचे काम नाही, असा प्रश्न कवी 'एकटयानेच युध्द पेटेल काय?' या कवितेतून उपस्थित करतो.

एकूणच मराठी कवितेच्या प्रांतात आदिवासी कवितेचे एक स्वतंत्र अस्तित्व आहे. ही कविता पराधीन नाही, तर तिला स्वतंत्र स्थान आहे. यातील व्यथा एका विशिष्ट प्रदेश वा देशातील आदिवासींच्या नाहीत. तर त्या समस्त विश्वातील आदिवासींच्या दु:खाशी नाते प्रस्थापित करणाऱ्या आहेत. कवीने अतिशय समर्पक व लक्षवेधकपणे घेतलेला आदिवासींच्या जीवनाचा वेध उल्लेखनिय आहे. म्हणूनच त्यांची कविता वैदर्भीय काव्यधारेत आपले लक्षवेधू घेते.

## ➢ समारोप :—

मागील १०० वर्षापासून सतत प्रवाहीत असणारी वैदर्भीय काव्यधारा आज प्रगल्भ व समृध्द झाली असली; तरी तिने अनेक उतार चढाव पार करीत, वळसे घेत तिने कवितेचे सगळे प्रवाह आपल्या कवेत घेतले आहेत. कधी अध्यात्माला स्पर्श करीत, प्रयोगशीलतेशी जवळीक साधत, वैचारिकतेवर मंथन करीत, भाव सौदर्यात रममाण होत आज ती सागरा प्रमाणे अथांग झाली आहे.

मुळात वैदर्भीय काव्यधारेचे प्रतिनिधित्व करणारे हे ३० कवी भावनांचा आवेश, मानवी वेदनेचे दर्शन, पार्थिवाचे भान व समकालीन जाणिवांचा आत्मशोधी स्वीकार अशा विविध गुणांनी वैशिष्टयपूर्ण आहेत. विदर्भाच्या भूमीत जन्माला आलेली ही वैदर्भी काव्यधारा आज मराठी काव्य सागरालाच नव्हे, तर निरनिराळया भाषिक प्रातांना कवेत घेऊन जागतिक कवितेच्या महासागरात विलीन झाली आहे. या काव्यधारेने उच्चभ्रू व पांढरपेशा समाजापासून तर दलित, आदिवासी, ग्रामीण, मुस्लिम व भटक्या विमुक्तां पर्यत सर्वांनाच आपल्यात सामावले आहे. तिने मानवी मनाला अविरत आनंद देण्यापासून तर मानवतेच्या कळवळयापर्यत नानाविध तरंग उठविले आहेत. आज ती राष्ट्रीय एकात्मतेची गंगोत्री ठरली आहे. यात संतांचा भक्तीभाव व मानव प्रेम आहे. कवी मनाची कोमलता व राष्ट्रप्रेम आहे. समाजाच्या वेदनेसह मधुर सुर व गीतांची आरास आहे. त्यात सुनीत, मुक्तछंद, लावणी, गौळण, रूबाई, गझल, हायकू, चारोळी, संवादिनी इ. ची विविधता आहे. शेरोशायरीचा रूबाब, पोवाडयाची वीरता, लावणीचा शृंगार आहे. हायकूतील गूढ व गझलेचा नजराणा आहे. तसेच दलित, आदिवासी, ग्रामीण, कष्टकरी, मुस्लिम मनाचा कोंडमारा आहे.

त्याचप्रमाणे वैदर्भीय परिसर, निसर्ग, संस्कृती, बोली इ. च्या वैशिष्टपूर्ण खुणा या काव्यधारेत आहेत. तसेच चिंतनशीलता, प्रयोगशीलता, अभिव्यक्तीच्या वेगवेगळया वाटा निर्माण करण्याची तगमग, व्रतस्थ काव्य निर्मिती, गूढरम्य कवितेची धुसर पाऊलचिन्हे अशी किती तरी वैशिष्टये या वैदर्भीय काव्यधारेत आढळून येतात.

## ➢ संदर्भग्रंथ सूची :–


१) वाटाणे राजेंद्र, 'वैदर्भीय काव्यधारा', विजय प्रकाशन, नागपूर.

२) काळे अक्षयकुमार, 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', पां. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९९९.

३) तुमराम विनायक, 'आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा', विजय प्रकाशन, नागपूर, १९९४.

४) तुमराम विनायक, 'शतकातील आदिवासी कविता', हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २००३.

५) कुलकर्णी गो. म., 'आधुनिक मराठी कविता (काही रूपे – काही रंग), मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे, १९९१.

६) भावरे महेंद्र, 'मराठी कवितेच्या नव्या दिशा', लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००७,

७) सार्वेकर कैलास, 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास', मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे, १९९९.

**Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College,**
**Armori, Dist. Gadchiroli**

# Department of Marathi

# Project

## M. A. - I (Marathi)

### Session : 2023 - 2024

## Students Participation List

| Sr. No. | Student Name |
|---|---|
| 1 | Vishakha Bhaichand Lengure |
| 2 | Harshana Vinayak Nikure |
| 3 | Sonam Deorao Ghutke |

## Certificates



**प्रतिज्ञापत्र**

मी, **कु. विशाखा भाईचंद लेनगुरे** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील एम. ए. (मराठी) भाग १ च्या द्वितीय सत्राकरिता **"झाडीपट्टी रंगभूमीवरील नाटककार ग. रा. वडपल्लीवार यांच्या नाटकांचा अभ्यास"** या विषयावरील प्रकल्प मी स्वत: तयार केला असून, तो मी महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर करीत आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक : 15-04-2024

सादरकर्ती

कु. विशाख भाईचंद गुरनुले



**प्रतिज्ञापत्र**

मी, **कु. हर्षना विनायक निकुरे** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील एम. ए. (मराठी) भाग १ च्या द्वितीय सत्राकरिता **"विदर्भातील निवडक कवींच्या कवितांचा अभ्यास"** या विषयावरील प्रकल्प मी स्वत: तयार केला असून, तो मी महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर करीत आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक : 15-04-2024

सादरकर्ती

कु. हर्षना विनायक निकुरे



**प्रतिज्ञापत्र**

मी, **कु. सोनम देवराव घुटके** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील एम. ए. (मराठी) भाग १ च्या द्वितीय सत्राकरिता **"झाडीपट्टीतील लोकनाट्य : तमाशा आणि गोंधळ"** या विषयावरील प्रकल्प मी स्वत: तयार केला असून, तो मी महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर करीत आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक : 15-04-2024

सादरकर्ती

कु. सोनम देवराव घुटके

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरीद्वारा संचालित

**महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,**
**आरमोरी, जि. गडचिरोली**

**सत्र : २०२३ - २०२४**

**- प्रकल्प -**

# "झाडीपट्टीतील लोकनाट्य : तमाशा आणि गोंधळ"

- सादरकर्ती -

**कु. सोनम देवराव घुटके**

एम.ए. (मराठी) भाग १

मार्गदर्शक

**प्रा. दिलीप घोनमोडे**

**डॉ. प्रा. विजय रैवतकर**

मराठी विभाग व संशोधन केंद्र

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,

आरमोरी, जिल्हा - गडचिरोली.

# प्रतिज्ञापत्र

मी, **कु. सोनम देवराव घुटके** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील एम. ए. (मराठी) भाग १ च्या द्वितीय सत्राकरिता **"झाडीपट्टीतील लोकनाट्य : तमाशा आणि गोंधळ"** या विषयावरील प्रकल्प मी स्वत: तयार केला असून, तो मी महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर करीत आहे.

स्थळ : आरमोरी

सादरकर्ती

दिनांक : 15-04-2024

**कु. सोनम देवराव घुटके**

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कु. सोनम देवराव घुटके** यांनी **"झाडीपट्टीतील लोकनाट्य : तमाशा आणि गोंधळ"** या विषयावरील प्रकल्प गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर केला आहे.

कु. सोनम देवराव घुटके यांनी प्रस्तुत प्रकल्प आमच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध केला आहे. त्यांनी या प्रकल्पासाठी आवश्यक सामग्री परिश्रमपूर्वक मिळविली आणि तिचा सर्वमान्य संशोधन पद्धतीप्रमाणे अभ्यास करून सदर प्रकल्पाच्या रूपाने सूत्रबद्ध मांडणी केलेली आहे. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल आम्ही पूर्णपणे समाधानी असून, प्रस्तुत प्रकल्प पदव्युत्तर पदवीकरिता सादर करण्याच्या योग्यतेचा असल्याचे आमचे मत आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक :

मार्गदर्शक

**डॉ. प्रा. विजय रैवतकर**

सहायक प्राध्यापक

म. गां. कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली

मार्गदर्शक

Head
Dept. of Marathi & Research Centre
M.G. College, Armori

**प्रा. दिलीप घोनमोडे**

विभागप्रमुख

म. गां. कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कु. सोनम देवराव घुटके** यांनी **"झाडीपट्टीतील लोकनाट्य : तमाशा आणि गोंधळ"** या विषयावरील प्रकल्प गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता मराठी विभाग व संशोधन केंद्रात सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकल्प कार्य मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने निर्धारित केलेल्या नियमांच्या अधीन राहून पूर्ण केलेले आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकल्प पूर्णपणे योग्य व परीक्षणासाठी पात्र आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक :

**डॉ. लालसिंग खालसा**
प्राचार्य
महात्मा गांधी कला, विज्ञान व
स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,
आरमोरी, जि. गडचिरोली

**प्रा. दिलीप घोनमोडे**
विभागप्रमुख
महात्मा गांधी कला, विज्ञान व
स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,
आरमोरी, जि. गडचिरोली

Head
Dept. of Marathi & Research Centre
M.G. College, Armori

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कु. सोनम देवराव घुटके** यांनी **"झाडीपट्टीतील लोकनाट्य : तमाशा आणि गोंधळ"** या विषयावरील प्रकल्प गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता मराठी विभाग व संशोधन केंद्रात सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकल्प कार्य मराठी विषयाच्या पदव्युत्तर पदवीकरिता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने निर्धारित केलेल्या नियमांच्या अधीन राहून पूर्ण केलेले आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकल्प पूर्णपणे योग्य व परीक्षणासाठी पात्र आहे.

स्थळ : आरमोरी

दिनांक :

**अंतर्गत परीक्षक**
Head
Dept. of Marathi & Research Centre
M. G. College, Armori

**बहिर्गत परीक्षक**
Prof. R. M. Dhote

# ऋणनिर्देश

आपल्या हातून एखादी नवीन निर्मिती किंवा नव संशोधन कलाकृती रचण्याचे विशेष कार्य घडताना त्या आनंदाला पारावाच उतर नाही. असाच अनमोल क्षण मला महात्मा गांधी कला विज्ञान स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथील एम. ए. (मराठी) चे पदव्युत्तर शिक्षण घेत असताना मला मिळाला.

एम. ए. मराठी या विषयाचे शिक्षण घेत असताना एक अभ्यास विषय म्हणून मला एक प्रकल्प कार्य पूर्ण करायचे आहे. या प्रकल्प कार्यासाठी मराठी विभागातील सर व मॅडम सोबत चर्चा करताना विविध मला सुचविले गेले. त्यात विदर्भातील त्यातही झाडीपट्टीतील लोककला या विषयावर सखोल चर्चा झाली.

विदर्भातील त्यातही विशेषत: झाडीपट्टीतील लोककलांचा अभ्यास करताना माझ्या अभ्यासात तमाशा, पोवाडा, किर्तन, गणगौळण, दंडार, कडकलक्ष्मी, वाघ्यामुरळी, दशावतार, झाडीपट्टी रंगभूमी, मंडई इत्यादी अभ्यास विषयाची माहिति चाळली गेली. तेव्हा जाणवले की, महाराष्ट्रातील लोककला विविध आणि अत्यंत समृद्ध आहेत. त्यात लोकसंगीत, लोकनृत्य, लोककथा व सांस्कृतिक उत्सव या सर्वांना महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून मी माझे प्रकल्प पूर्ण करण्यास **"झाडीपट्टीतील लोकनाट्य : तमाशा आणि गोंधळ"** हा विषय निवडला.

सदर प्रकल्प कार्य ज्यांच्या प्रेरणेने व सक्षम मार्गदर्शनाने फुलले असे माझे आदरणीय गुरुवर्य माझ्या महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप घोनमोडे सर, डॉ. विजय रैवतकर सर, प्रा. खगेशकुमार सहारे सर आणि प्रा. वर्षा गवळी मॅडम यांच्या मोलाच्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. सोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा सरांचे सुद्धा आभार मानते.

धन्यवाद!

सादरकर्ती विद्यार्थीनी

**कु. सोनम घुटके**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | ❖ प्रतिज्ञापत्र | I |
| | ❖ मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| | ❖ प्रमाणपत्र | III |
| | ❖ प्रमाणपत्र | IV |
| | ❖ ऋणनिर्देश | V |
| | ❖ अनुक्रमणिका | VI |
| | प्रस्तावना | १ |
| | तमाशा | २ ते ८ |
| | गोंधळ | ९ ते १३ |
| | समारोप | १४ |
| | संदर्भग्रंथ सूची | १५ |

# झाडीपट्टीतील लोकनाट्य : तमाशा आणि गोंधळ

❖ **प्रस्तावना :-**

झाडीपट्टी म्हणून चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्याचा परिसर ओळखला जातो. या परिसरात तमाशा, दंडार, गोंधळ, भारुड, खडीगंमत, दंडीगान इत्यादी लोकनाट्य फार पूर्वीपासून प्रचलीत आहेत. यातील तमाशा व गोंधळ हे प्राचीन लोकनाट्य असून अन्य सर्व लोकनाट्यापेक्षा हे वेगळे लोककलाप्रकार आहेत. झाडीपट्टी परिसरात शंकरपट, मंडई व विविध उत्सवांच्या निमित्ताने तमाशा हा प्राचीण लोकानाट्य प्रकार आजही सादर केला जातो. यासोबतच कौटुंबिक व सामाजिक उत्सवाच्या निमित्ताने गोंधळ हा लोकनाट्य प्रकारही झाडीपट्टी परिसरात आजही अस्तित्वात आहे.

खरे तर येथील लोककला सादर करणाऱ्या कलावंताना यासंदर्भात असामान्य प्रतिभा लाभलेली असल्याचे जाणवते. यांच्या सादरणीकरण व प्रयोगासाठी लागणारी गण, गौळण, लावणी, पोवाडे, बतावणी, विनोद, नाट्यात्म प्रवेश ही सगळी सामुग्री येथील कलावंतानी आपल्या प्रतिभेच्या बळावर उभी केलेली आहे. त्याचप्रमाणे वाद्यवाजविण्याचे कौशल्य देखील त्यांनी स्वतः उत्तम प्रकारे आत्मसात केल्याचे दिसून येते. मंडईत सादर केल्या जाणाऱ्या तमाशातील सामाजिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक घटकांसोबतच उत्स्फूर्त विनोदातून समाजातील विदारक प्रश्नांकडे लक्ष वेधने, त्यावर प्रकाश टाकण्याचे काम हे हौसी कलावंत करीत असतात. समाज शिक्षणाचे व लोकशिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य या कलेद्वारा आज परोपरीने जोपासले जात आहे. कालानुरुप बदल घडताना आज या कलेतील भाषिक पेहराव, अभिनय करून प्रेक्षकांना हसत ठेवत समाज जागृतीचे कार्य या लोककलेद्वारा साधले जात आहे. म्हणून झाडीपट्टीतील हे लोकनाट्याचे साहित्य मुद्रित स्वरुपात संग्रहित करणे, जतन करणे, त्याचे संवर्धन करणे ही काळाची गरज ठरत आहे. या प्रकल्पाचे निमित्ताने मला या लोककलांचा बारकाईने परिचय झाला तो इतरांही करुन देण्याचे मानस मी या निमित्ताने बाळगते.

# तमाशा

१७ व्या शतकापासून महाराष्ट्रामध्ये तमाशा हा अतिशय लोकप्रिय असणारा कलाप्रकार अस्तित्वात आहे. हा कलाप्रकार सिद्ध होण्यापूर्वी महाराष्ट्रात गोंधळ, जागरण, बळीराजा आणि महासुभा, ज्योतिबा यांच्या कार्याची जागृतीपर गीत गायन जागरण, वाघ्यामुरळी, दशावतार, बहुरूपी, वासुदेवाची गाणी, पोतराज इ. लोककलाप्रकार प्रचलित होते. या सर्व नाट्यात्मक लोककला प्रकारात आणि तमाशामध्ये तांत्रिक अंगाच्या दृष्टीने आणि वाङ्मयीन बाजूने काहीएक प्रमाणात साधर्म्य आढळते. तमाशा हा गण, गौळण, लावणी, बतावणी आणि वग अशा पाच अंगांनी समृद्ध झालेला कलाप्रकार आहे.

## ➢ तमाशाची उत्पत्ती :-

'भारतीय संस्कृतिकोशा'त 'तमाशा' या शब्दाच्या उत्पत्तीविषयी पुढील प्रमाणे माहिती उपलब्ध आहे. 'तमाशा' हा शब्द अरबी शब्द असून त्याचा अर्थ 'प्रेक्षणीय दृश्य' असा होतो. तमाशा संस्थेच्या शिल्पकारांना असलेली 'शाहीर' ही संज्ञाही मूळ 'शायर' किंवा 'शाहर' या अरबी शब्दापासूनच बनलेली आहे. तमाशा संस्थेचे आणि तिच्या शिल्पकाराचे नाव अरबी असल्यामुळे ही संस्था मुसलमानांच्या प्रभावातून उदय आली असावी, असे काही विद्वानांचे म्हणणे आहे. 'तमाशा' परंपरेविषयीचा संदर्भ मराठी विश्वकोशातही सापडतो, तो पुढीलप्रमाणे आहे.

'तमाशा' हा शब्द मूळचा मराठी भाषेतील नसून तो उर्दूतून मराठीत आला आहे. १३ - १४ व्या शतकात दक्षिण भारतात मुसलमानी अंमल सुरू झाल्यापासून तो शब्द मराठीत आढळतो. एकनाथांच्या एका भारुडात 'बड़े बड़े तमाशा 'देखें' अशी ओळ आहे. अशी माहिती तमाशाच्या जन्माविषयी सांगितली जाते.

## ➢ तमाशाचे स्वरुप :-

तमाशाची एकंदर प्रकृती पाहिली तर असे दिसून येईल की, “१८ व्या शतकाच्या सुरुवातीला वीरांच्या विषयवासनेवर उतारा म्हणून जन्मलेला हा कलाप्रकार आहे. मात्र १९ व्या शतकाच्या सुरुवातीला त्यात भक्ती, नीति, ब्रह्मज्ञान यांचा समावेश झाला. म्हणजे तमाशाचे हाड शूरवीरांच्या शृंगाराचे आहे, मात्र त्याचे मांस हे सात्त्विकतेचे असल्याचे म्हणावे लागेल. यावरुन हाडाचे वळण आणि मासांने दिलेला आकार यांनी

तमाशाची प्रकृती बनलेली आहे असे दिसते. तसे तर शृंगाराच्या हाडाने आणि सात्त्विकतेच्या मांसाने तमाशाचे शरीर बनले आहे हेच सिद्ध होते. तमाशाच्या रथाचे एक चाक हे शृंगाराचे, तर दुसरे चाक हे ब्रम्हज्ञानाचे आहे. या दोन्ही चाकांना जोडणारा कणा शूरवीरांच्या पराक्रमाचा होता." असे नामदेव व्हटकर यांचे म्हणणे याठिकाणी रास्त वाटते.

तमाशाचे खरे स्वरूप जरी उत्तर पेशवाईत उदयास आले असले, तरी हा कलाप्रकार महाराष्ट्रात त्यापूर्वीपासूनच अस्तित्वात होता. मात्र याच तमाशाचे आज महाराष्ट्रात अनेक फड असून आजमितीला प्रामुख्याने रघुवीर खेडकर, मंगला बनसोडे, काळू बाळू, दत्ता महाडिक, चंद्रकांत ढवळपुरीकर यांचे संच अतिशय प्रसिद्ध असल्याचे पहावयास मिळते.

तमाशा हा गावोगावी भरणाऱ्या जत्रा किंवा यात्रे निमित्ताने सादर केला जाणारा कलाप्रकार आहे. नंतरच्या काळात तर तो कापडी तंबू / कनात बांधून, तसेच तिकीट विक्री करून सादर केला जाऊ लागला. महाराष्ट्रातील लोकप्रिय कलाप्रकार असलेल्या तमाशा क्षेत्रासाठी लोकशाहीर बशीर मोमीन (कवठेकर) यांनी अनेक वगनाट्ये, लावण्या, लोकगीते, सवाल - जवाब, गण - गवळण आणि फार्स असे विविधांगी साहित्य निर्माण केले आणि ते महाराष्ट्रातील सर्व प्रमुख तमाशा मंडळांना पुरवले आहे.

## ➢ तमाशाचे अंग :-

### १) गण :-

तमाशाची सुरुवातच गणाने म्हणजेच गणपतीला आवाहन करून केली जाते. अथर्वशीर्षात 'गं' काराची उपासना आहे. संत ज्ञानेश्वरांनी या 'गं' काराला व्यवहारी भाषेत गण असे नाव देऊन त्याला ईश आदि अशा शब्दांनी 'भावार्थदीपिकेत' नमन केले आहे. शाहिरांनी गण हा शब्द तसाच ठेवला आणि 'गणापूत झाली सारी उत्पत्ती' असे म्हटले. खरे तर प्रत्येक मंगल कार्याची सुरुवात गणेश पूजनापासून करण्याची आपली परंपरागत प्रथा आहे. म्हणून तीच प्रथा गणाच्या रूपाने तमाशात रूढ झाली आहे. आजही समाजामध्ये प्रत्येक शुभकार्याची सुरुवात ही विघ्नहर्त्या विनायकाची पूजा अथवा नमन करूनच होताना दिसते. तेव्हा तमाशातही प्रत्येक खेळ निर्विघ्न पार पडावा म्हणून गणेशाला गणातून नमन अथवा आवाहन केले जाते. १९८० च्या

राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळालेला लोकशाहीर बशीर मोमीन (कवठेकर) लिखित एक गण येथे उदाहरण म्हणून आपणास घेता येईल.

हे गणराया । तव गुण गाया SS
धावुनी ये मज । यश द्याया ॥धृ॥
रसिकांच्या पुढे मी एक पामर ।
कवण अर्पितो तव चरणावर ।
स्मरण सरुदे । गित स्फुरुदे ।
भक्तिचे हे गणराया ॥१॥
अजाण बालक बोल बोबडे ।
मान्य करावे ते वाकुडे ॥
तु सुखकर्ता । तु दुःखहर्ता ॥
वेडा मी दर्शन घ्याया ॥२॥
विद्येचा रे तुची विधाता ।
वंदन करीतो जाता - जाता ।
मस्तकी आमुच्या । हाथ असुदे ।
पैलतीरावरती जाया ॥३॥

हे करत असतानाच पुढे शाहिरात दोन प्रकारचे आध्यात्मिक विचार प्रवाह अंतर्भूत झाले. ते म्हणजे शिव किंवा ब्रम्ह यांना श्रेष्ठ मानणारे 'तुरेवाले' आणि शक्ती - माया यांना श्रेष्ठ मानणारे 'कलगीवाले'. हे दोन्ही पक्ष आपआपल्या परीने आपल्या दैवतांचे स्तवन करीत. 'गण गाताना हे शाहीर प्रतिपक्षाला उद्देशून धाक वैऱ्याला किंवा अपयश द्यावे दुष्मनाला अशी भाषा वापरीत. अर्थात श्रोत्यांनी गण ऐकल्याबरोबर तो गाणारा शाहीर कोणत्या पक्षाचा आहे, याची कल्पना श्रोत्यांना येत असे. हा गण सादर करताना म्हणण्यात येणाऱ्या काव्यास 'गणाची लावणी' असे म्हटले जाते. ज्या काळात तमाशा उभारीस आला तो काळ पेशवाईचा होता. आणि पेशवे हे गजाननाचे भक्त होते. त्यातही तमाशा हे शेवटी आध्यात्मिक बीज असणारे लौकिक लोकनाट्य असल्याने गणातून गणपतीची आराधना क्रमप्राप्तच ठरते.

**२) गौळण :-**

तमाशा सादर करत असताना गणानंतर गौळण सादर होते. या गौळणीचे मूळ संत ज्ञानेश्वर माऊलीपर्यंत जाऊन पोहोचते. त्यांनीच सुरुवातीला आध्यात्मिक गौळणी

लिहिल्या. तमाशात मात्र आध्यात्मातूनही शृंगार दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. महाभारत काळात श्रीकृष्ण मथुरेला दही, दूध, तूप, लोणी घेऊन जाणाऱ्या गौळणींना अडवत असे आणि त्यांच्याकडून लोणी हिसकावून घेत असे हे सर्वांनाच माहित आहे. तोच संदर्भ येथेही येतो. तमाशातील श्रीकृष्णही मथुरेला जाणाऱ्या गौळणींना अडवतो. गौळणींमध्ये राधा व इतर गौळणींची कृष्ण आणि त्याचे सवंगडी त्यामध्ये प्रामुख्याने पेंद्या छेडछाड काढतात. त्यातूनही विनोद निर्माण होतो. गौळणीतील मावशी आणि पेंद्या, मावशी आणि कृष्ण, मावशी आणि इतर गौळणी यांच्यातील संवाद अतिशय चटकदार आणि द्विअर्थी असतात. हे संवाद पूर्णपणे करमणूकप्रधान असतात. सर्व गौळणी आणि मावशी ह्या कृष्णाची विनवणी करतात. शेवटी कृष्ण आपले अस्सल दान म्हणजेच तमाशातील 'गौळण' मिळाल्यानंतर सर्व गौळणींना जाण्याची अनुज्ञा देतो आणि गौळण संपते.

**३) लावणी :-**

'लावणी' हा तमाशातील अत्यंत लोकप्रिय असा प्रकार आहे. 'लावणी' या शब्दाचा संबंध काहीजण संस्कृतमधील 'लापणिकेशी लावण्याचा प्रयत्न करतात. तर काही लोक शेतीमध्ये ज्याप्रमाणे भाताच्या रोपाची लावणी असते. तशी अक्षरांची व शब्दांची एकापुढे एक लावलेली रचना म्हणजे 'लावणी' अशी निर्मिती सांगून 'लावणी'च्या निर्मितीचा संबंध श्रमपरिहारार्थ झाला असावा असेही सांगतात. ती समूहमनाचे रंजन करण्यासाठी जन्मल्याचे मत अधिक प्रचलित आहे. लावणीचे विषय हे वेगवेगळ्या स्वरूपाचे असतात. यात पौराणिक, आध्यात्मिक, सामाजिक, काल्पनिक तसेच स्त्री - पुरूष सौंदर्यवर्णन, शृंगार, विरह, वियोग, रूसवे - फुगवे इत्यादी विषय हाताळले जातात. परंतु या सर्व विषयातील शृंगारावर आधारित असणाऱ्या लावण्यांची संख्या खूप जास्त असल्याने लावणी म्हणजे केवळ शृंगार अशीच धारणा अधिक झाल्याचे दिसून येते. २० व्या शतकाच्या उत्तरार्धातील नावाजलेले लावणी कवी बशीर मोमीन (कवठेकर) यांनी लिहिलेली व सुरेखा पुणेकर यांनी आपल्या तमाशा फडाद्वारे महाराष्ट्रात सादर केलेली एक लोकप्रिय लावणी इथे उदाहरणादाखल उल्लेख करावीशी वाटते.

मध्यानी रात्र झाली, आवचित जाग आली ।
सहीना विरह मजला, मी झाले अर्ध मेली ॥

सांगू कशी मी तुजला, वैरीण रात्र गेली ॥धृ॥
इश्काची इंगळी डसली, त्यानेच गोष्ट फसली ।
झाला उरात भडका, येईना झोप कसली ॥
सहीना यातना त्या - मरणाचे घाव झेली ॥१॥

**४) बतावणी :-**

आजच्या मराठी साहित्यातील फार्स या प्रकाराला पूर्वी बतावणी, संपादणी असे संबोधले जात असे. वास्तविक पाहता हा रंगभूमीवर सादर होणारा कलाप्रकार आहे. नाटकाची लांबी वाढविण्यासाठी किंवा गंभीर नाटकात प्रेक्षकांना हसविण्यासाठी फार्स रंगभूमीवर सादर केले जाऊ लागले. यद्‌वारा समाजातील व्यंगांवर नेमके बोट ठेवले जाऊ लागले. मात्र तेही विनोदाच्या साह्याने. तमाशातील फार्समध्ये बहुतांशी 'तात्या' आणि 'बापू' ही दोनच पात्रे आढळतात. पुढे सादर होणाऱ्या वगातील पात्रांची रंगरंगोटी होईपर्यंतच्या वेळात बतावणीचे सादरीकरण सादर केली जाते. 'तात्या' आणि 'बापू' हे दोघेही विनोदासाठी चुटक्यांचे किंवा शापांचे सहाय्य घेऊन प्रेक्षकांना हसवितात.

**५) वग :-**

तमाशातली फार्स किंवा बतावणी संपल्यानंतर वगाचे सादरीकरण केल जाते. तमाशातील नाट्य खऱ्या अर्थाने वगामध्ये पहावयास मिळते. 'वेग' हा शब्द 'ओघ' या शब्दाचा अपभ्रंश असावा. कारण ग्रामीण बोलीभाषेमध्ये 'ओघ' या शब्दाऐवजी 'वग' या शब्दाचा वापर होत असल्याचे आढळून येते. तर 'सातवाहन राजा हाल याच्या गाथासप्तशती या ग्रंथामध्ये 'वग्ग' हा शब्द समूह, कळप या अर्थाने वापरला असल्याचे दिसून येते. मुळात 'वग्ग' या शब्दापासून वग हा शब्द रूढ झाला असावा. कारण तमाशातील वगाची निर्मिती किंवा प्रत्यक्ष प्रयोग समूहमनाच्या किंवा प्रत्येक पात्रांच्या स्वतंत्र प्रतिभेचे एकत्रीकरण असते. म्हणूनच ती समूहनिर्मिती ठरते. वगाचे स्वरूप हे नाटकाप्रमाणे असते. यातील संवाद व पात्रे नाटकाप्रमाणेच असतात. वगाची कथा ठरलेली असते. पण प्रत्येक पात्राच्या तोंडचे संवाद मात्र स्वयंस्फूर्तीने किंवा हजरजबाबीपणाने अभिव्यक्त होत असतात. तमाशाचा साधारणपणे उत्तरार्ध म्हणजे वग होय. वास्तवत: वगाची लिखित अशी संहिता मुळातच नसते. पण स्थूल कथा प्रत्येक पात्राला ज्ञात असते. पात्रे स्वयंस्फूर्तीने पण कथेला अनुसरून संवाद म्हणत असतात. सरदार किंवा तमाशाचा प्रमुख संवादामध्ये सुसूत्रता राखून कथेला गती प्राप्त

करून देत राहण्याचा प्रयत्न करीत असतो. विमुक्त संवाद, अभिनय, नृत्य, संगीत यांच्या माध्यमातून वगाचा प्रयोग सिद्ध होतो. आपल्या वैविध्यपूर्ण लिखाणासाठी प्रसिद्ध असलेले लेखक व कवी बशीर मोमीन (कवठेकर) यांची ईश्कान घेतला बळी, बाईने दावला इंगा, तांबडं फुटलं रक्तांच, भंगले स्वप्न महाराष्ट्राचे, भक्त कबीर ही वगनाट्य अनेकविध तमाशा संचाद्वारे महाराष्ट्रात सादर करण्यात आली.

## ➢ तमाशातील वाद्य :-

तमाशातील मुख्य वाद्ये म्हणजे ढोलकी, तुणतुणे, हलगी किंवा कडे आणि झांज हे होत. या चारहींच्या वाद्यमेळ्यात नाचीच्या पायातील चाळांचीही भर पडते. या प्रत्येक वाद्याची माहिति पुढीलप्रमाणे आहे.

### १) ढोलकी :-

ढोलकी हे तमाशातील महत्त्वाचे वाद्य आहे. दक्षिणेतील मृदुंग, खोळ याहून ती वेगळी असते. मृदंगाचे एक टोक लहान करत नेले असते. तसेच तमाशातील ढोलकीचे काहीवेळा ते थोडेसे लहान केलेले दिसते. मृदंगाच्या आवाजात एक दमदारपणा आहे. त्या तुलनेत ढोलकीत कडक फडकतेपणा आहे. साधारण दोन - सव्वादोन फूट लाकूड पोखरून हे खोड बनविलेले असते. हे खोड बहुधा शेळी, बोकड यांच्या निम्म्या कमविलेल्या कातड्याने मढविलेले असते. तिच धिमपुडा रुंद आणि शाईपुडा अरुंद असतो. बऱ्याच वेळा तमाशाची ढोलकी सरळ समारंतरही असलेली आढळते. शाईकडचा पुडा लोखंडी कड्यावर आवळलेला आणि तो धिमपुड्याला सुताच्या दोरीने जखडलेला असतो. तमाशातील ढोलकीचा स्वर दोरीच्या तिढ्यात बारीक खुंट्या घालून, त्यांनी दोरीचा पीळ वाढवून खालीवर नेतात.

### २) तुणतुणे :-

तुणतुणे हे लाकडी मापाच्या खालच्या तोंडाला कातड्याने मढवून तयार केलेले असते. मापाच्या मध्यावरून बारीक तार वर घेतलेली असते. मापट्याच्या बाजूला दोन - अडीच फुटाची तिरकस दांडी बसवून तिच्या वरच्या टोकाच्या खुंटीला ती तार गुंडाळलेली असते. ही दांडी हातात धरून, त्याच हाताच्या बोटाने नखाने तुणतुणे वाजवतात. तुणतुण्याच्या टोकाला रंगीत रुमाल बांधलेला असतो. तुणतुणे

वाजविणाऱ्याला सुरत्या असे म्हणतात. गाण्याचे पालुपद पुढे चालवित तो तुणतुणे वाजवित असतो.

### ३) हलगी किंवा कडे :-

हलगी हे वाद्य शाहिरांच्या डफापासून तमाशात आले. पण डफापेक्षा हलगीचा आवाज कडक आणि टणक असतो. हे एक साधे वाद्य आहे. साधारण: मोठ्या ताटाच्या आकाराचे हे वाद्य लाकडी किंवा लोखंडी कड्यावर कातडे मढवून तयार केलेले असते. तमाशामध्ये विशिष्ट प्रसंगीच या वाद्याचा उपयोग केला जातो. या वाद्यामुळे तमाशात कडाक्याचा रंग भरला जातो. तमाशाच्या मुख्य सरदाराजवळ ही हलगी असते. ही हलगी तो छातीच्या डाव्या बाजूला उभी धरून तिच्यावर उजव्या हाताची थाप देऊन वाजवित असतो. हलगीच्या खाली तो डाव्या हाताच्या पंजाने बोटात लहान काडी धरून त्या काडीने हलगीवर आघात करूनही तो हलगी वाजवितो. त्यामुळे काडीच्या आघाताने व उजव्या हाताच्या थापेने हलगीतून कडक आवाजाचे संगीत बाहेर पडते. या हलगीला 'कडे' असे सुद्धा म्हणतात.

### ४) झांज :-

तमाशातील झांज हे वाद्य गोंधळातून तमाशात आले आहे. भजनी टाळेपेक्षा ही झांज थोडीशी वेगळी असते. यात साधारण दोन इंच व्यासाची नादमय अशी वाजवायची दोन पाळी असतात. ही झांज तुणतुणे वाजविणाऱ्या सुरत्याच्या जोडीचा दुसरा सुरत्या वाजवित असतो.

## ➢ पुरस्कार बहाल :-

तमाशा क्षेत्रात प्रदीर्घ सेवा केलेल्या ज्येष्ठ कलाकारास राज्य शासनातर्फे इ.स. २००६ पासून दरवर्षी सात दिवसांच्या तमाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवा प्रसंगी विठाबाई नारायणगाववकर जीवन गौरव या नावाने पुरस्काराचे वितरण करण्यात येते. या पुरस्कारात ५ लाख रुपये बक्षीस, मानचिन्ह आणि मानपत्र असे दिले जाते.

# गोंधळ

## ➢ प्रास्ताविक :-

महाराष्ट्रात खास करुन गोंधळी लोक गोंधळ हा पारंपरिक वा विधिनाट्य सादर करीत असतात. या जातीचे विशेषत: लोक महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश या प्रांतात आढळतात. गोंधळ्यांनी आपल्या विधिनाट्याची एक स्वतंत्र रंगभूमी विकसित केली असून आपल्या या रंगभूमीवरील रंगाविष्काराला संस्थात्मक स्वरूप प्राप्त करून दिले आहे.

## ➢ स्वरूप :-

गोंधळी हे देवीचे उपासक असून ते गोंधळ या विधिनाट्याद्वारे मंगल कार्याची सांगता करतात. महाराष्ट्रात गोंधळ्यांच्या मराठे, कुंभार, कदमराई व रेणूराई अशा पोटजाती असल्याचे उल्लेख आढळतात. असे असले तरी गोंधळ्यांनी रेणुराई आणि कदमराई अशाच दोन आपल्या पोटजाती असल्याचे सांगितले आहे. यांनाच रेणूराव व कदमराव असेही म्हणतात. रेणुराई हे माहूरच्या रेणुका मातेचे भक्त असून ते रेणुकेचीच उपासना करतात. तर कदमराई हे तुळजापूरच्या भवानी मातेचे भक्त असून ते तिचीच पूजा मांडतात. गोंधळाचे विधिनाट्य सादर करण्यालाच गोंधळ घालणे अशी संज्ञा आहे.

## ➢ कुलाचार महत्व :-

लग्नासारख्या विधीत गोंधळाच्या कुळाचारास अनन्यसाधारण महत्त्व आहे. गोंधळ या विधिनाट्यात गोंधळी महिलांचा सहभाग कधीही नसतो. त्यांना देवीची गाणी मात्र येत असतात. आजचे गोंधळाचे जे प्रचलित स्वरूप आहे त्यात गोंधळ्यांची संख्या चार किंवा आठ असते. त्यातील एक प्रमुख गोंधळी असतो, बाकी त्याचे साथीदार असतात. यात वापरल्या जाणाऱ्या वाद्यांमध्ये तुणतुणे आणि संबळ ही प्रमुख वाद्ये आहेत. यात कधी कधी गोंधळी हाच वादकाची भूमिका सुद्धा बजावत असतो. या प्रकारात एखादा साथीदार दुसऱ्या वाद्यासह साथ करतो. आज रूढ असलेल्या गोंधळाच्या प्रकारात काकड्या गोंधळ व संबळ्या गोंधळ असे दोन प्रकार आढळतात. काकड्या गोंधळ हे कोणत्याही जातीचे लोक करू शकतात, तर संबळ्या गोंधळ हा

गोंधळी जातीचे लोकच घालतात. गोंधळ करण्याच्या पद्धतीत दोन्ही उपजातींच्या पोषाखामुळे आणि परंपरेने चालत आलेल्या संकेतांमुळे काही भेद निर्माण झाले आहेत. उदा. रेणुराई गोंधळी विधिनाट्याच्या वेळी समोर दिवटी ठेवतो. कदमराई गोंधळी हातात जळता पोत घेऊन गाणी म्हणतात. ते एका हाताने संबळ वाजवतात. कदमराई गोंधळ्यांनाच भुत्ये, राजदरबारी गोंधळी असे सुद्धा म्हणतात. गोंधळी हा गोंधळ विधी सादर करताना परंपरेने चालत आलेल्या सांकेतिक करपल्लवीने प्रेक्षकांना चकित करतात. करपल्लवीच्या वापराने त्यांचे सादरीकरण न केवळ चमत्कृतीपूर्ण होते, तर नाट्यपूर्ण व रंजकही होते. परशुरामाने गोंधळ्याची निर्मिती कशी केली हे जसे ते कवनांमधून सांगतात. त्याचप्रमाणे उदरनिर्वाहाची तरतूद भवानी मातेने आशीर्वाद दिल्यामुळे कशी झाली. यासंबंधीची कथाही त्यांच्या कवनांतून गातात.

गोंधळातील गीत हे समारंभात देवीचे स्तुतिगीत ठरते. कृष्णकथा गुंफणाऱ्या गौळणी असतात. वीरांचे पराक्रम गाणारे पोवाडे असतात. आध्यात्मिक भेदिक रचना असतात. ग्रामीण जीवनातील वास्तवावर उपरोधिक भाषेत प्रकाश टाकणारी गीते असतात. तर कीर्तनकारांच्या उत्तररंगात रंगणारी आख्यानगीतेही असतात. गोंधळाच्या उत्तररंगात आख्यान लावले जाते. त्यात अंबरीष राजा, विक्रम राजा, जांभुळ आख्यान, चांगुना आख्यान यांसारखी आख्याने निरुपण, निवेदन, विनोदी बतावणी, गमतीशीर संवाद यांसह गोंधळी रंगवून रंगवून सांगतात.

थोडक्यात, महाराष्ट्रातील लोकसंगीतात गोंधळ या प्रयोगरूप लोककलेचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. गोंधळी ही देवीच्या भक्तांची भटकी जात आहे. गोंधळ हा लग्न, मुंज, बारसे, जावळ अशा समारंभाचे वेळी देव - देवतांच्या उपासनेसाठी केलेला एक कुलाचार आहे.

## ➢ वाद्यांचा उपयोग :-

गोंधळ सादर करतांना साधारणत: संबळ, तुणतुणे, टाळ, झांजरी, डिमडी इत्यादी वाद्यांचा व हातातल्या दिवटीचा उपयोग केला जातो.

'झाडपी माणसं' या नाटकात नाटककाराने एकूण १६ व्यक्तिरेखांची योजना केली असून यापैकी 'आरती,' 'तानी,' 'हमिदा' आणि 'गोदाबाई' या चार स्त्रीव्यक्तिरेखा आहेत. नाटकातील 'झिंगरू पाटील,' त्यांचा घरगडी 'महागू,' गावचा गायकी 'तुकाराम,' 'पाटलाच्या वाड्यातील मोलकरीन 'तानी' या व्यक्तिरेखा झाडीबोलीत बोलणाऱ्या आहेत. 'दगडू पाटील' ही व्यक्तिरेखा आदिवासी लोकनेता म्हणून दर्शविली असून या व्यक्तिरेखेसाठी मराठी बरोबरच गोंडी बोलीचा वापर केला आहे. झाडीबोलीत संवाद करणाऱ्या व्यक्तिरेखांच्या काही खास लकबींचे दर्शनही नाटककाराने घडविले आहे. 'महागू' ला 'सवालाच का पडते,' 'तानी' ला 'हो नाही त का?' आणि झिंगरु पाटलाला 'अन्नाच्यान रीतच बिघडली त्यालं कोण का करंल' हे पालुपद आळविण्याची सवय आहे. नाटककाराने या नाटकाची रचना तीन अंकात केली असून प्रत्येक अंकात सहा-सहा प्रवेशांची योजना केली आहे.

झाडीपट्टीतील माणसे स्वभावाने निर्मळ आणि निर्व्याज प्रेम करणारी आहेत. झाडीपट्टीत पैशापेक्षा माणुसकीला अधिक किंमत आहे. लोक आपली शेतीची कामे एकमेकांच्या सहकार्याने करतात, इत्यादी झाडपी माणसांची वैशिष्ट्ये या नाटकात नाटककारांनी स्पष्ट केली आहेत. लोक नक्षलवादी का बनतात, हे सांगताना या नाटकातील शंकर समर्थ गुरूजी म्हणतात, "बेकारीमुळे झाले ते त्रस्त, म्हणून बनले नक्षलग्रस्त. भ्रष्टाचारी नोकरवर्गाची त्यांना चिड आहे. पोलीस व वनविभागाचे अधिकारी त्यांचे नंबर एक दुश्मन. आदिवासी सुधारणेकरिता धडपडणारा आमच्यासारखा शिक्षक त्यांना आवडतो." ऊन, वारा, पाऊस व भूक यांना तोंड देत रानोमाळ फिरणाऱ्या या नक्षलवाद्यांचे मतपरिवर्तन घडवून त्यांना सुधारणेच्या प्रवाहात आणणे. ही काळीच गरज आहे, असे समर्थ गुरूजींना वाटते. आदिवासी बहूल भागात स्व. बाबा आमटे व त्यांच्या कुटुंबियाचे कार्य मोलाचे आहे, हे सांगत असतानाच गावातल्या गुरूजींनीही हे कार्य करावे अशी अपेक्षा समर्थ गुरूजी व्यक्त करतात. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांचा गुरू नसतो तर तो सर्व समाजाचा आदर्श असतो अशी मौलिक विचारसणी नाटककाराने या नाटकात व्यक्त केली आहे.

## श्री. गणपती रामदास वडपल्लीवार यांनी लिहिलेल्या नाटकांचे विवेचन

### १. मातामाईचा मुंज्या :-

### अ) आशय विषय :-

झाडीपट्टीतील ग्रामीण जनजीवनात रूढ असलेली अंधश्रध्दा आणि जातिप्रथा हा 'मातामाईचा मुंज्या' नाटकाचा मुख्य आशय विषय आहे. ग्रामीण आदिवासी परिसरातील लोक अजूनही परंपरागत रूढी आणि अंधश्रध्देमुळे जातिभेदाच्या समस्येत गुरुफटलेले आहेत. जातीप्रथा नष्ट करण्याकरीता आंतरजातीय विवाह हा एक पर्याय नाटककाराने सुचविलेला आहे.

### आ) कथानक :-

नाटकाच्या पार्श्वभूमीसाठी ग्रामीण भागातील एका खेडेगावाची निवड केली आहे. गाव खेड्यात मातामाईचे पूजन करण्याची जुनी प्रथा आहे. जीवनात उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्येचे निराकरण मातामाई करते अशी ग्रामीण लोकांची समजूत आहे.

ही त्यांची पारंपरिक समजूत कधी इतकी विकोपाला जाते, की एखादा शारीरिक आजार सुध्दा मातामाईच्या पूजनाने बरा होतो, अशी त्यांची श्रध्दा होऊन बसते. या भोळ्या समजूतीचा फायदा मरीमाईचे भक्त असणारे पुजारी घेतात व लोकांची फसवणूक करतात.

हेच पुजारी सर्वसामान्य लोकांच्या मनात जातिभेदाची विषवल्ली रूजवण्याचे काम करतात. 'मातामाईचा मुंज्या' या नाटकातील मुंगसाजी वैद्यराज आणि गोदाबाई जातीयतेचे जहर गाव पाटील असलेल्या 'मसा पाटलाच्या' डोक्यात भरवतात आणि पाटील त्यांच्या भूलथापांना बळी पडतो. मुंगसाजीच्या चिथावणीमुळेच गावात दलित दलितेत्तर संघर्ष निर्माण होतो. दलितेत्तर जशी मिरवणूक काढून मातामाईची पूजा करतात, तशीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयजयकार करीत दलित मरीमाईचे पूजन करण्याचा प्रयत्न करतात.

परंपरागत विचासरसरणीने वावरणारा मसा पाटील, पण आधुनिक समतावादी विचारसरणीचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव असलेला मसा पाटलांचा मुलगा 'गुणवंत' आंबेडकरी तत्त्वज्ञानावर पीएच.डी. करून दलितांचे पुढारीपण करतो. समाज जीवनातील अनिष्ट जातिप्रथा नष्ट व्हावी म्हणून दलित मुलीशी लग्न करण्याचा निर्धार करतो. मसा पाटील या लग्नाला प्रारंभी विरोध करतात पण आपल्या पित्याला डॉ. आंबेडकरांचे मानवतावादी तत्त्वज्ञान आणि समतावादी विचार पटवून देऊन त्यांचे मतपरिवर्तन करण्यात डॉ. गुणवंत यशस्वी होतो.

नाटककाराने नाटकाच्या माध्यमातून दलितोध्दाराकरिता केलेला प्रयत्न खरोखरच प्रशंसनीय आहे. या सोबतच अनिष्ट रूढी-परंपरांच्या दुष्परिणामात भरडल्या जाणाऱ्या ग्रामीणांच्या जीवनात समतेचे नवे वारे प्रस्थापित करण्याचा व अंधश्रध्देशी निगडित गुन्हेगारी संपुष्टात आणण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.

**इ) व्यक्तिचित्रण :-**

**१. मसा पाटील :-**

हा परंपरागत देवदेवस्कीवर विश्वास ठेवणारा, जुनाट विचारसरणीचा खेडेगावातील पाटील आहे. अत्यंत अंधश्रध्दाळू व जातियता पाळणारा आहे. झाडीबोली ही त्याची बोलीभाषा असून त्याच्या बोलण्यात 'अन्नाच्यान' हे पालुपद येतेच. त्याला श्रध्दा आणि अंधश्रध्दा यातील फरक समजत नाही. देवदेवस्की करणाऱ्या आणि मंत्रतंत्र जाणणाऱ्या मुंगसाजी वैद्यबुवावर त्याचा पूर्ण विश्वास आहे. ''वैद्यबोवा,

आमचा तुमच्यावर पुरा-पुरा भरोसा आहे. तुमची वैद्यकी, देवाऱ्याची पूंजा अन् गोदाबाईची देवी आमच्या संग राहिल्यावर गावाच्या केसालं धक्का नाही लागावाचा.'' असे तो मुंगसाजीला म्हणतो. यावरून तो देवदेवस्कीच्या किती अधिन झाला आहे, हे दिसून येते.

दलित लोक मातामाईची पूजा डॉ. गुणवंताच्या पुढाकाराने करणार आहेत असे 'कवळू' कडुन कळताच मसा पाटलाला आपल्या मुलाचा भयंकर राग येतो आणि त्याचा बंदोबस्त करण्यास वैद्यबुवास सांगतो. मातामाईसाठी आपला मुडदा पडला तरी चालेल पण दलितांना देवाला हात लावू देणार नाही अशी तो प्रतिज्ञा करतो.

पूर्वज जसे वागले तसेच नव्या पिढीतील दलितांनीही आपली पायरी ओळखून वागले पाहिजे, अशी मसा पाटलाची अपेक्षा आहे. दलित आपले म्हणणे मानत नाहीत म्हणून त्याचे दलितांशी भांडण होते. दलितांचा पुढारी बनलेल्या आपल्या मुलाला 'त्या भिकाऱ्यांच्या मागे लागू नको' असा तो सल्ला देतो. प्रकरण गंभीर झाल्यामुळे मसा पाटील पोलीसात रिपोर्ट देण्याकरीता जातो.

कालांतराने डॉ. गुणवंताचे विचार मसा पाटलाला पटू लागतात. देवदेवस्कीच्या नावावर मुंगसाजी वैद्यराज आणि गोदाबाईचे काळे धंदेही माहित होतात. शेवटी मसा पाटील आपल्या मुलाला छातीशी कवटाळत म्हणतो, ''आता काही होवो, माझ्या जीवाच्या जीवालं नाही सोडावाचा. मग तो दलिताईची पोरगी घरी काहून नाही आणे. तिलं माझी सून म्हणून ठेविनच. घरची इस्टेट वाटून देईल तो दलिताले तरी चालल, पण माझी ही इस्टेट नाही सोडावाचा.'' मसा पाटील जुने परंपरागत विचार सोडून नव्या आधुनिक मताचा स्वीकार करतो आणि सर्वांना सांगतो की, 'आता सप्पा सोडा. काहाची जात ना पात. आता आपण एकच.'

**२. मुंगसाजी वैद्यराज :-**

हा संधीसाधू आणि गुन्हेगारीप्रवृत्तीचा असून नाटकातील खलपुरूष आहे. गावठी वैद्य म्हणून परिसरात याची ख्याती आहे. गावातील लोक मात्र याला 'जादुखोर' म्हणून ओळखतात.

मुंगसाजी अत्यंत स्वार्थी आणि भांडखोर आहे. त्याने आपल्या स्वार्थाकरिता अनेकांच्या मुंड्या मुरगळूनही साधूचे सोंग घेतले आहे. वीस वर्षापासून फरारी होऊन तो पोलिसांना गुंगारा देत असून त्याच्यावर इंडीयन पीनल कोडनुसार ३०२, ३२५, ३५४, ३७६ आणि ४२० या कलमा लागलेल्या आहेत.

मुंगसाजी वैद्‌यराज हा त्याच्या पूर्वायुष्यातील धुनिवाला बाबा होय. तेव्हा कित्येक स्त्रिया, श्रीमंत व राजकीय मंडळींना हा देवदूत वाटत होता. एका दलित वनरक्षकाच्या मुलाचे प्रेम एका ब्राहमण कन्येवर असल्यामुळे मुंगसाजी त्या मुलाचा गळा आवळून खून करतो. आपले बिंग फुटू नये म्हणून तो तिथून पलायन करतो व या खेडेगावात गोदाबाई भक्तीन सोबत राहून तिच्या संगतीने गाव नासवण्याचे काम करतो. 'मातामाईचा मुंज्या' तो हाच. दलिताविरोधी कारवाया करून दलितांची घरे जाळतो. मुंगसाजी केवळ दलित विरोधकच नव्हे तर संपूर्ण मानवजात विरोधक असे हे व्यक्तिमत्त्व आहे.

**३. उस्मान चाचा :-**

मुसलमानासारखा पेहराव करून वेषांतराने राहणारा 'उस्मानचाचा' हा एक वनरक्षक आहे. आपले कुटुंब उध्वस्त करणाऱ्या खून्याच्या शोधात तो गावोगाव भटकतो. याच खेडेगावात त्याला त्याच्या मुलाच्या खून्याचा शोध लागतो.

उस्मान चाचा हिंदी भाषेबरोबरच मराठी भाषा ही बोलणारा आहे. तो लंगडा असून कुबड्‌यांच्या आधाराने चालतो. एकदा मुंगसाजी सोबत त्याची भेट होते त्यावेळी मुंगसाजी उस्मान चाचा सोबत वाद घालतो. पण उस्मान चाचा त्याला सांगतो की, "आपके बोलनेका मतलब समझनेपर भी मै तुमसे बहस नही करता। उसकी आज जरूरत भी नही है मुझे।"

उस्मानचाचा मुंगसाजीच्या हालचालीवर पाळत ठेवित असल्यामुळे त्याला तो आपला प्रतिस्पर्धी वाटतो. त्यामुळे मुंगसाजी आपल्या साथीदारांद्‌वारा त्याच्यावर हल्ला करवितो. परंतु उस्मान चाचा यातून बचावतो. जातियतेविरूध्द लढा देणाऱ्या डॉ. गुणवंताला तो 'तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है' म्हणत शुभेच्छा देतो.

इन्स्पेक्टर मुंगसाजीला अटक करतात त्यावेळी उस्मान चाचा मराठी भाषेत आपली व्यथा सांगतो की 'मी जन्माने मुसलमानही नाही किंवा माझी मातृभाषा हिंदीही नाही. काय सांगू साहेब, भिक्षूक ठवरे माझं नाव! जातीने दलित आणि पेशाने वनरक्षक होतो मी!... भामरागड परिसरात मला नोकरी करावी लागली. माझा मुलगा शिक्षणाच्या निमित्ताने जन्मगावीच राहिला... तो एका ब्राम्हण कन्येच्या प्रेमात पडला. गावात उठाठेव वाढली आणि याच मुंगसाजी वैद्‌याने त्याचा खून केला... एकुलता एक पोरगा मेला म्हणून माझी पत्नी पागल होऊन पांडुरंगाच्या भेटीला गेली. साहेब तुम्हाला

तुमचा गुन्हेगार मिळाला पण मला माझा मुलगा केव्हा मिळणार?' म्हणून ओक्साबोक्सी रडू लागतो.

नाटककाराने उस्मानचाचा या व्यक्तिरेखेतून पुत्रसुख आणि पत्नीसुखाला पारखा होऊन सर्वस्व गमावून बसलेल्या एका दलित वनकर्मचाऱ्याची व्यथा स्पष्ट केली आहे.

**४. गोदाबाई** :-

गोदाबाई ही या नाटकातील एकमेव स्त्री व्यक्तिरेखा आहे. ती अत्यंत धूर्त आणि संधीसाधू आहे. ग्रामीण भागात 'गोदाबाई भक्तीन' म्हणून तिची ओळख आहे. तिच्या अंगात मातामाई येते. ती नऊवारी पातळ नेसलेली असून तीने पदर कमरेला गुंडाळलेला आहे. कपाळावर मोठ्या आकाराचे कुंकवाचे मळवट असून केस मोकळे सोडून देवी अंगात आल्यामुळे नाचत आहे. नाचत नाचतच ती मातामाईच्या मंदिरात येते. मोठ्या जोराने किंकाळी मारून नाचता नाचताच ती 'कोठे आहे रे घोडा' असे देवाऱ्याला विचारते आणि 'मला दलितांनी डिवचण्याचा कारण काय ? अशा प्रकाराने मला विटाळून माझा अपमान करून माझ्या मुंज्याला का संधी देता?' असे प्रश्न विचारते.

गोदाबाई भोळ्या भाबड्या गावकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना दलितांविरूध्द भडकावते. त्यांच्यावर बहिस्कार टाकण्याचा सल्ला देते. तिच्या सल्ल्यामुळेच गावात दलित विरूध्द दलितेत्तर असा संघर्ष निर्माण होतो.

मुंगसाजीसोबत आलेली गोदाबाई ही कोण, कुठली? याचा सुगावा घेण्याकरीता गोविंदा माली तिला विश्वासात घेतो.ती आपल्या पूर्वायुष्याची संपूर्ण माहिती गोविंदाला सांगते. गोदाबाई ही मुंगसाजी वैद्यराजची लग्नाची बायको नव्हे तर त्याची रखेल असते. ती त्याच्या प्रत्येक कटकारस्थानात मदत करते. गोदाबाई स्वतः मातामाई असल्याचे सोंग वठवते पण दलितांच्या सतर्कतेमुळे तिचे पितळ उघडे पडून तिला तुरूंगाची हवा खावी लागते.

**५. डॉ. गुणवंत :-**

हा मसा पाटलाचा एकुलता एक चिंरजिव, स्वभावाने अत्यंत सालस आणि नव्या आधुनिक विचाराचा तरुण आहे. त्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यावर पीएच. डी. मिळविलेली आहे. दलितांचा उध्दार व्हावा याकरीता तो दलितांचा ग्रामीण नेता झालेला आहे.

पारंपरिक रूढीपरंपरेने चालत आलेली जातिप्रथा बंद व्हावी म्हणून तो प्रयत्न करतो. अस्पृश्य असले तरी ते आपल्याच धर्माचे लोक असल्यामुळे त्यांनाही मातामाईची पूजा करता यावी यासाठी तो दलितांच्या मोर्च्याचे पुढारीपण करतो. त्याचे वडील मसा पाटील व मुंगसाजी वैद्‌यराज दलितांनी मातामाईची पूजा करण्यास विरोध करतात. त्यावेळी डॉ. गुणवंत त्यांना समजावून सांगतो, ''वैद्‌यराज, तुमच्या या मातामाईच्या पूजनाने काही खरा परमेश्वर मिळणार नाही या दलितांना! देव तर प्रत्येकाच्या हृदयातच आहे. तो भक्तीने पावतो. त्याला काशी रामेश्वर करण्याची काय जरूर? पण देवपूजनाचा बहुमान जन्मजात उच्चभ्रू समजणाऱ्या तुमच्या जातीलाच आहे, ही तुमची असलेली निरर्थक घमेंड दूर व्हावी या करिताच हा प्रामाणिक प्रयत्न आहे.'' पण पारंपरिक विचारांचा पगडा बसलेल्या सवर्णांना ते पटत नाही.

डॉ. गुणवंत वयाने लहान असला तरी बुध्दीने आणि विचाराने थोर आहे. दलितांच्या हक्कासाठी तो जीवाचे रान करतो. दलितोध्दाराकरीता पिता-पुत्रातच संघर्ष निर्माण होतो, पण त्याचीही तो पर्वा करीत नाही.

जातिभेदाबरोबरच गावातील अंधश्रध्दा दूर करण्यासाठीही तो झटतो. अंधश्रध्देला खतपाणी घालून आपली तुंबडी भरणाऱ्या अट्टल गुन्हेगारांना पकडण्यासाठी तो पोलिसांना मदत करतो. डॉ. गुणवंत हा केवळ बोलका सुधारक नाही तर कर्ता सुधारक आहे. जातिप्रथा निर्मुलन करण्याकरिता स्वतः दलित मुलीशी आंतरजातीय विवाह करून गावात नवा आदर्श निर्माण करतो.

या प्रमुख व्यक्तिरेखांसोबतच गोविंदा माली, कवळू देव्हारी, जोंधळू मेंबर, विक्रम कोतवाल, पोलीस इन्स्पेक्टर या दुय्यम व्यक्तिरेखा या नाटककाराने निर्माण केल्या असून त्या मुख्य व्यक्तिरेखांना पूरक ठरलेल्या आहेत.

**ई) संवाद :-**

नाटकातील काही पात्रांचे संवाद अस्स्ल झाडीबोलीत लिहिले असून ते लक्षणीय आहेत. 'मातामाय भाव घेणार की तिच्या मुंज्याचा आट राहील,' असे मुंगसाजी म्हणताच चिरकुट देव्हारी त्याला म्हणतो, ''तुलं कवा तरी चांगला दिसला होता का?'' आजच काहालं दिसल! आटाशिवाय पाटच नाही वाहे तुजा. पोरंबारं जादुखोर म्हणून बोंबलतात तरी-''

नाटकातील काही संवाद तर काव्यात्मकतेने नटलेले दिसतात. उदा. - उस्मान : हम तुम पंछी डालके होनेसे आप जल्दी हमारी बाते समझ जाते हो वैद्‌यराज, इसलिए

हरबार हम तारीफ करते है तुम्हारी! वतन कोनसा है तुम्हारा, वह तो अल्ला जाने। फिरभी झाडीपट्टीकी आपकी एन्ट्री एवन है इसमे कोई शक नही। मेरा क्या? न जातका पता न बापका पता, अल्हाहने कर दिया है लापता। तबसे कही पडा रहता हुँ खाता-पिता।''

जातिभेद करणे पाप आहे, हे परंपरागत विचारसरणीच्या आपल्या वडिलांना पटवून देताना डॉ. गुणवंत म्हणतो, ''परमेश्वराने ही सृष्टी निर्माण केली. पशुपक्षी निर्माण केले, तसाच मानवही निर्माण केला. मग एक माणूस ब्राह्मण का? आणि दुसरा हरिजन का? सुखसमृध्दी ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्य यांच्याच वाट्याला का? शूद्रांनी गुरासारखे राबायचे आणि उष्ट्या पत्रावळी उचलायच्या? खरं पाहता हेच पातक आहे आणि ते तुम्ही सर्रास करीत आहात व करवित आहात.''

या नाटकातील संवादाच्या रूपाने नाटककाराने दलित समाजातील फुटीर राजकारणावरही प्रकाश टाकलेला आहे. दलित समाजातील जोंधळू म्हणतो, ''दलितोध्दाराचा ढेंभा मिरवून स्वतःची खूर्ची सांभाळणारी आपली नवी पिढी आपल्याच जातीत फुटीचे राजकारण निर्माण करीत आहे.''

एकंदरीत, या नाटकातील संवाद प्रस्तुत नाटकाच्या आशय विषयाला समर्पक आहेत.

**उ) भाषाशैली :-**

श्री. ग. रा. वडपल्लीवार यांनी नाट्य लेखनासाठी त्रिसूत्री भाषाशैलीचा वापर केला असून मुंगसाजी वैद्यराज, गोविंदा न्हावी, डॉ. गुणवंत, जोंधळू, विक्रम, गोदाबाई व पोलीस इन्स्पेक्टर या पात्रांसाठी मराठी भाषा, मसा पाटील, देव्हारी व कवळू या पात्रांसाठी झाडीबोली आणि उस्मान चाचा या पात्रासाठी हिंदी भाषा वापरली आहे.

प्रमाण मराठी भाषेला झाडीबोलीतील ज्या शब्दांचा परिचय झालेला नाही, असे कितीतरी शब्द नाटकात आले आहेत. मलं, तुलं, काहालं, नसं, दिसं, सप्पा, झुलीर, गोटा, इळा (विडा), डोक्सा इ. झाडीपट्टीतील ग्रामीणांना अंगवळणी पडलेले शब्द येथील पात्रे सहज बोलून जातात. यासोबतच झाडीपट्टीतील जनजीवनात सहज बोलल्या जाणाऱ्या म्हणीसुध्दा दिसून येतात. उदा. 'ज्याची हुशारी त्याची मुशाफिरी,' 'ज्या गावी भरला दरा, तोच गाव बरा,' 'कोनी नाही हटके, आन् आपूनच मटके,' 'भरोशाची म्हस आन् लावलन उठबस,' 'घरची करते देवा देवा आन् बाहेरचीलं चोरी शिवा', 'एक पूत आन् हेलभर मूत', इत्यादी म्हणींची योजना नाटकात कल्पकतेने केली आहे. याशिवाय

'उसवल्याला दोरा भरणे', 'शिरा ताणून पोंगा वाजवणे', 'काती बांधल्या कोंबड्यावानी झगडणे', 'घुबडालं फासे मांडणे', 'कवळीचा फरक नसणे', 'उबळ्या कुडवाना मोजणे', 'सप्पा तेलरांधा बिघडणे' इ. वाक्प्रचारांचा उपयोगही नाटककाराने उत्तमप्रकारे केल्याचे दिसून येते.

सुविचारप्रचूर वाक्यरचना हे या नाटकातील भाषेचे वैशिष्ट्य आहे. या सुविचारातील शब्दाशब्दांतून संदेश वहन करण्याची क्षमता दिसून येते. उदा.- 'परिवर्तन हेच काळाचे लक्षण आहे.' 'समतावादी, मानवतावादी मनुष्यधर्म खरा धर्म होय.' 'मानवाच्या हाती निसर्गाने दिलेली सुखाची ढाल गंजून ती जेव्हा निकामी होते, तेव्हाच मनुष्याला दुःख सोसवेनासे होते'. इत्यादी सुविचारप्रचूर वाक्य या नाटकात आढळतात.

मराठी भाषेबरोबरच हिंदी भाषेवरही नाटककाराचे प्रभुत्व दिसून येते. या नाटकात हिंदी भाषेतील म्हणींचाही उपयोग केलेला दिसतो. 'पंछीओंमे कौआँ और आदमीओंमे नौआँ।', 'उपरसे टामट्म, अंदरका राम जाने।', 'हिंमत दे मर्दा तो मदत दे खुदा।', 'न रहे बास न बजे बांसूरी।' या सारख्या म्हणी उस्मान चाचाच्या तोंडी नाटककाराने घातलेल्या आहेत.

**ऊ) नेपथ्य :-**

शासनासमोर असलेल्या 'दलितोध्दार' या समस्येवरील हे नाटक असल्यामुळे ते कुठेही सहज सादर करता यावे या करिता नाटककाराने अगदी आटोपशीर नेपथ्याचा उपयोग केला आहे. खेड्यापाड्यातील लोकांचे प्रबोधन करण्यासाठी प्रयोग सादरीकरण सुलभ व्हावे ही यामागील नाटककाराची भूमिका असावी. कारण शहरी भागात जसे सुराज्ज रंगमंच आढळतात, तसे ग्रामीण भागात आढळत नाहीत.

नाटकात खेडे विभागातील एक गाव, थोडासा जंगलाचा परिसर आणि एक कडूनिंबाच्या फांद्याचा मांडव दाखवलेला आहे. या मांडवाखाली मातामाईच्या ८ ते १० मूर्त्या उभ्या आहेत. मूर्त्यांच्या कपाळावर कुंकू व हळदीचे पट्टे लावलेले आहेत. मूर्त्यांच्या दोन्ही बाजूला दोन लाकडी समयात ज्योती जळत आहेत. मध्यभागी एक धुपाटणे असून त्यातून धुपाचा धूर निघत आहे, असे नेपथ्य एका दृश्यासाठी वापरले असून त्यातून गावात 'मातामाई पूजनाचा' उत्सव सुरू असल्याची कल्पना येते.

दुसऱ्या प्रवेशात दलित वस्तीतील एका दलिताचे गरिबीतले घर दाखविले आहे, तर दुसऱ्या एका प्रवेशात मुंगसाजी वैद्यराज व गोदाबाई यांचे घर, इतके कमी नेपथ्य या नाटकासाठी वापरले आहे.

## २. झाडपी माणसं :-

### अ) आशय विषय :-

झाडीपट्टीच्या लोकजीवनातील लोकाचार, रूढी-परंपरा आणि सांस्कृतिक सण उत्सव इत्यादींचे यथार्थ दर्शन हा या नाटकाचा आशय विषय आहे. त्यासोबतच परप्रांतातून येणाऱ्या उपऱ्या लोकांनी झाडीपट्टीत येऊन येथील साध्या भोळ्या माणसांची कशी लुबाडणूक केली आहे, याचेही चित्रण नाटककाराने केले आहे.

### आ) कथानक :-

झाडीपट्टीतील एका गाव खेड्यातील झिंगरू पाटील व त्यांचा मुलगा बाबुराव पाटील खेड्यापाड्यातील लोकाचार आणि लोकपरंपरा सांभाळीत जीवन जगतात. परंतु बाहेरून आलेल्या नरसन्ना, पहेलवान, गोदाबाई आणि हमीदा या उपऱ्या पोटभरू लोकांनी त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेत आपला जम बसवला आहे. नरसन्नाने बाबुराव पाटलास दारूचे व्यसन लावले. नरसन्ना बाबुराव पाटलास त्याची जमीन गहाण ठेवून व्याजाने पैसे देऊ लागतो. दारूचा ठेकेदार असल्यामुळे गावातील लोकही नरसन्नाच्या मागे मागे पिंगा घालू लागले. नरसन्ना आता गावातील राजकारणात उतरला व विजयी देखील झाला. येथील मूळ भूमिपुत्र असलेल्या बाबुराव पाटलाच्या जीवनाची वाताहत झाली. पाटीलकीचा लटका बडेजाव, दारूच्या व्यसनाने झालेली अधोगती व राजकारणातील अपयश यामुळे बाबुराव पाटील पुरता खचून गेला.

गाव खेड्यातील राजकारण आणि त्यातून निर्माण होणारी सत्तापिपासू वृत्ती, राजकीय मूल्य पायदळी तुडवून राजकारणाआड निर्माण होणारी गुन्हेगारी, ग्रामीण जीवनातील हेवेदावे आणि भ्रष्ट मानसिकता या दृष्ट प्रवृत्तीला गावातील शंकर समर्थ गुरूजी आणि बाबुराव पाटील विरोध करतात. गावाचे हीत लक्षात घेऊन गुन्हेगारी प्रवृत्तीला वाव देणाऱ्या नरसन्ना ठेकेदार, चितपटराव पहेलवान आणि गोदाबाई यांचे डावपेच हाणून पाडतात. असे या नाटकाचे थोडक्यात कथानक आहे.

### इ) व्यक्तिचित्रण :-

प्रस्तुत नाटकात नाटककाराने ९ पुरुष आणि ४ स्त्री व्यक्तिरेखा साकारलेल्या आहेत. त्यापैकी ४ पुरुष व १ स्त्री व्यक्तिचित्र प्रमुख असून उर्वरित दुय्यम स्वरूपाची आहेत.

**१. बाबुराव पाटील :-**

हा झाडीपट्टीतील झिंगरू पाटलाचा मुलगा असून गावचा सरपंच आहे. वडिलांप्रमाणेच दयाळू स्वभावाचा आणि नोकरांवरही पुत्रवत प्रेम करणारा मोठा दिलदार माणूस आहे. गावातील गोरगरीब, नोकर चाकर आणि विधवा स्त्रियांबद्दल त्याच्या मनात कळवळा आहे. गावातील कित्येक विधवा स्त्रियांच्या शेत्या तो बिगारीने करून देतो. पण परप्रांतातून आलेल्या उपऱ्या माणसांच्या संगतीने त्याला दारूचे व्यसन लागते. आपल्या पाटिलकीच्या प्रतिष्ठेसाठी आणि दारूच्या व्यसनासाठी तो दारू ठेकेदार नरसन्नाकडे आपली शेती गहाण ठेवतो. सरपंच असताना त्याचे जिल्ह्याच्या ठिकाणी सतत जाणे येतो असते. अशातच त्याला कोठेवाली बाईचाही नाद लागतो.

बाहेरून आलेले नरसन्ना ठेकेदार, पांडू पहिलवान आणि 'गंगा माँ' म्हणून वावरत असलेली गोदाबाई गावातील राजकारणात सहभागी होऊन आपली 'तंटा भानगडी पार्टी' स्थापन करून बाबुराव पाटलाच्या विरोधात उभे राहतात. पैसा आणि दारूच्या जोरावर निवडून येतात आणि बाबुराव पाटलाला सरपंच पदावरून पायउतार व्हावे लागते.

बाई आणि बाटलीमुळे बाबुराव पाटील भिकेला लागतो. दुस-यांना दानधर्म करणारा बाबुराव पाटील धान्याच्या फसलीवर धान्य देण्याच्या करारावर दुस-यांकडून कर्ज घेतो. एककीकडे प्रतिष्ठा तर दुसरीकडे कुचेष्टा यामुळे त्याची गत मृदंगासारखी होते. नरसन्ना ठेकेदार बाबुराव पाटलाच्या शेतीवर जप्ती आणतो पण शंकर समर्थ गुरूजींच्या सतर्कतेमुळे गुन्हेगार म्हणून फरारी असलेल्या नरसन्ना, पहेलवान व गोदाबाई यांना अटक होऊन बाबुराव पाटलाची परिस्थिती पूर्व पदावर येते.

**२. शंकर समर्थ गुरूजी :-**

हे ग्रामीण भागात प्रामाणिकपणे व निष्ठेने शिक्षकीपेशा सांभाळणारे प्राथमिक शिक्षक आहेत. राज्य शासनाने त्यांना 'आदर्श शिक्षक' म्हणून पुरस्कृतही केले आहे. शाळेव्यतिरिक्त गावाच्या विकासाकरीता समाजकार्यातही त्यांचा मौलिक सहभाग आहे. शालेय शिक्षणाबरोबरच ते गावात प्रौढशिक्षणाचेही वर्ग घेतात. त्यामुळे गावातील लहान थोर मंडळी गुरूजींचा आदर करतात. परंतु काही समाज कंटकांना हे न रूचल्यामुळे ते माडिया आदिवासी भागात गुरूजींची बदली करवितात.

आपले अपूर्ण राहिलेले कार्य बाबुराव पाटलाच्या पत्नीने म्हणजेच आपली मानसकन्या 'आरती' ने पूर्ण करावे असे तिला सांगून ते बदलीच्या ठिकाणी जायला

निघतात तेव्हा गावातील प्रौढ व आया बाया धाय मोकलून रडतात. सर्व गाव शंकर गुरूजींना देवाप्रमाणे मानत असल्यामुळे देवाची जशी मिरवणूक काढली जाते तशी हार घालून गुरूजींची मिरवणूक काढून गुरूजींना साश्रू नयनांनी निरोप देतात. गुरूजी गाव सोडून गेले त्या दिवशी कोणाचीही चूल पेटली नाही. इतके प्रेम गुरूजींनी गावावर व गावकऱ्यांनी त्यांच्यावर केले होते.

शंकर गुरूजी हाडाचे शिक्षक आहेत, आदिवासी माडियांशी संवाद साधण्यासाठी ते त्यांची 'गोंडी बोली' शिकतात. गोंडी बोलीत त्यांच्याशी संवादही करतात. आदिवासी भागात राहून ते आदिवासींचे शैक्षणिक परिवर्तन करतात. जी आदिवासींची मुले उंदीर, ससे, खार मारण्यासाठी दिवसभर रानात भटकत होती, ती आता शाळेबाहेर जाण्यास तयार होत नव्हती. रात्रीच्या शाळेत शिकून म्हातारे-कोतारे, गुराखी, म्हसकीही लिहू वाचू लागले. शंकर गुरूजींच्या या कार्यामुळे राष्ट्रपती पुरस्करासाठी त्यांची निवड केली जाते.

शैक्षणिक उपक्रमांव्यतिरिक्त शंकर गुरूजी नक्षलवाद्यांचे मतपरिवर्तन करण्याच्या कार्यातही सक्रीय आहेत. आपल्या निवृत्तीनंतर मिळणारे उपादान, विम्याची रक्कम आणि केंद्र पुरस्कृत शिक्षक पुरस्काराची रक्कम ते आदिवासी मुलांच्या उच्चशिक्षणाकरीता खर्च करतात.

खरा आदर्श शिक्षक व इतरही शिक्षकांना प्रेरणादायी ठरणारे व्यक्तितत्व 'शंकर समर्थ गुरूजी' या व्यक्तिरेखेद्वारे ग.रा. वडपल्लीवार यांनी या नाटकात रेखाटले आहे.

**३. नरसन्ना ठेकेदार :-**

नरसन्ना हा तेलंगणा प्रांतातून आलेला व दारूचा धंदा करणारा गृहस्थ आहे. स्वभावाने अतिशय धूर्त, अत्यंत स्वार्थी व कपटी अशी ही व्यक्तिरेखा आहे. पोट भरण्यासाठी नरस्सन्ना ताट वाटी घेऊन झाडीपट्टीतील खेडेगावात येतो. येथील भोळ्या भाबड्या लोकांच्या साधेपणाचा फायदा घेऊन त्यांना दारूचे व्यसन लावतो. दारूच्या व्यसनामुळे त्यांच्या जमिनी आपल्या ताब्यात घेतो. आपला दारूचा धंदा वाढवून तो गावचा प्रमुख होण्याचे स्वप्न पाहतो.

नरसन्नाला येथील माणसांशी आणि त्यांच्या सांस्कृतिक जीवनाशी काहीही देणेघेणे नाही. तो फक्त दारूचा धंदा करून पैसे कमविणे जाणतो. बाबुराव पाटलाचा नोकर महागुला तो म्हणतो, "आमी आंद्रामधून येती आला तो धंदा करावाले. तुज्या सारखा नौकरी करावाले नाही." यावरून त्याचा झाडीपट्टीत येण्याचा हेतू कळतो.

नोकर माणसाने मालकाच्या समोर जास्त बोलू नये, या मताचा तो आहे. नोकरांना तो आपल्या पायातला जोडा समजतो. म्हणूनच बाबुराव पाटलाचा नोकर महागु बोलत असतो तेव्हा तो त्याच्यावर चिडतो.

नरसन्ना झाडीपट्टीत रहात असला तरी तो येथील रितीरिवाज मानत नाही. झाडीपट्टीत श्रावण महिन्यातील पहिला मंगळवार पाळण्याची प्रथा आहे. या दिवशी शेतीची सर्व कामे बंद असतात. पण काम बंद राहू नये असे नरसन्नाला वाटते. कारण तो प्रत्येक दिवस कमाईचा समजत असतो.

थोड्याच दिवसात नरसन्ना आपल्या दारूच्या धंद्यात जम बसवितो आणि गावाच्या राजकारणात भाग घेऊन आपली 'तंटा भानगडी पार्टी' काढतो. आपण स्वतः निवडून तर येतोच पण आपला सहकारी पहेलवान ग्रा. पं. सदस्य व गोदाबाईला जि. प. सदस्य म्हणून निवडून आणतो. स्वतः सरपंच बनतो तर गोदाबाईला जिल्हा परिषद अध्यक्ष बनवितो. गोदाबाईच्या मदतीने राजकारणाआड भ्रष्टाचार करतो. त्याचे सगळे भ्रष्टाचार बाबुराव पाटील हमीदाबाईच्या मदतीने सी.सी.टि.व्ही. कॅमेऱ्यात कैद करतो. नरसन्नाचे भ्रष्टाचार उघड होताच त्याची रवानगी तुरूंगात होते.

**४. पहेलवान** :-

हा अतिशय धूर्त, पाताळयंत्री पहेलवान आहे. परप्रांतात चोऱ्या, खून आणि बलात्कार करुन फरारी झालेला एक खतरनाक गुन्हेगार आहे. तो झाडीपट्टीत 'पहेलवान' हे नाव धारण करून उजळ माथ्याने मिरवतो. 'मी झटपट चित करणारा माणूस आहे' हे त्याचे पालुपद आहे.

पहेलवान स्वभावाने रागीट व गुंड प्रवृत्तीचा आहे. नरसन्ना, गोदाबाई व तो असे त्यांचे त्रिकुट आहे. तो आपल्या त्रिकुटाला 'आपण तिघेही बाहेरून आलेले एकमेकांचे मावस भाऊ, येथेच राहू व मिळून खाऊ' असे आपले ध्येय समजावून सांगतो. ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदच्या होणाऱ्या निवडणुकीत आपल्या पार्टीचे उमेदवार उभे करतो. आपले बिंग फुटू नये म्हणून तोच शंकर गुरूजींची बदली आदिवासी नक्षलग्रस्त भागात करवितो.

गावगुंड म्हणून त्याचा गावात दरारा आहे. नरसन्ना दारू ठेकेदाराच्या मदतीने गावाचे भविष्यकालीन नेतृत्त्व करण्याचा त्याचा मनसुबा आहे. त्याकरीता राजकारणातील आपल्या पार्टीचा प्रतिस्पर्धी असलेल्या बाबुराव पाटलाला दारूच्या अधिन करतो.

'गंगा मॉ' म्हणून वावरणाऱ्या गोदाबाईला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत विजयी करून तिला जिल्हा परिषदेची अध्यक्ष बनवितो. शासकीय अनुदानाची रक्कम तिच्या मार्फतीने हडप करतो. शिक्षकांच्या बदल्या करण्यासाठी त्यांच्याकडून हवी ती रक्कम वसूल करतो. परंतु हमीदाच्या कोठीवर बाबुराव पाटलाने सी.सी.टि.व्ही. कॅमेरे लावल्याचे त्याच्या लक्षात न आल्यामुळे तेथे कट शिजत असतानाचे सर्व दृश्य कॅमेऱ्यात कैद होते व पहेलवान पोलीसांच्या जाळ्यात अडकतो.

**५. गोदाबाई :-**

गोदाबाई ही अत्यंत स्वार्थी व कपटी स्त्री आहे. आपल्या पूर्वायुष्यात अनेक तरूणींना कुंटनखान्याच्या दलालाकडे विकणारी एक कुंटन होती. परंतु आपल्या पापाचे भांडे फुटताच ती फरार झाली. आता ती झाडीपट्टीत येऊन 'गंगा मॉ' बनून देवीचा ठाणा चालवते. स्वत:च्या अंगात 'गंगा माय' भिनवते आणि भक्तांच्या रोगांवरील उपाय म्हणून त्यांना राख आणि लिंबू देते.

नरसन्ना आणि पहेलवानाच्या कारस्थानातही ती सहभागी होते. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत निवडून येऊन जिल्हा परिषद अध्यक्ष बनते. पूर्वीचे तिच्या अंगावरील नऊवारी पातळ, कपाळावरचे मळवट जाऊन ती आता फॅशनेबल राहते. सहावारी गोलसाडी व आखुड बाह्यांचा ब्लाऊज, रूपया एवढ्या कुंकवाच्या ठिकाणी ती आता टिकली लावते.

गोदाबाई फारशी शिकलेली नाही. फक्त सही करण्यापुरते तिचे जेमतेम शिक्षण झालेले आहे. पण ती शक्कलबाज स्त्री आहे. आधी देवी मॉ बनून ती लोकांना फसवित होती, आता जि.प. अध्यक्ष बनून फसवते आहे. शासकीय अनुदानाची अफरातफर करून आपला गल्ला भरते. परंतु शेवटी तिच्या काळ्या कृत्याचा घडा फुटून तुरूंगात जावे लागते.

या प्रमुख व्यक्तिरेखांशिवाय झिंगरू पाटील, त्यांची सून 'आरती', नोकर महागू, तुकाराम देव्हारी, आदिवासी लोकनेता दगळू पाटील, तानी आणि हमिदा या दुय्यम व्यक्तिरेखा आहेत. सर्व व्यक्तिरेखांची आपली खास वैशिष्ट्ये आहेत. झिंगरू पाटलाचे 'अन्नाच्यान, रितच बिगडली त्यालं कोन का करल' हे झाडीबोलीतील पालुपद; तर तानीचे 'हो नाही तं का' हे पालुपद आहे. महागूचेही 'सवालच का पडते' हे पालुपद आहे. त्यामुळेच या नाटकातील व्यक्तिरेखा या अस्स्ल झाडीपट्टी जनजीवनातील व्यक्तिरेखा वाटतात.

**ई) संवाद :-**

या नाटकातील संवाद वैविध्यपूर्ण आणि लक्षणीय आहेत. सुविचार प्रधानता हे या नाटकातील संवादांचे वैशिष्ट्य आहे. गावातील प्राथमिक शिक्षक शंकर समर्थ गुरूजी यांच्याबाबत ‘आरती’ म्हणते, ‘‘अनंत आकाशावरून जगला प्रकाश देणारे जसे सूर्यनारायण तसेच पृथ्वीवर ज्ञान प्रकाश देणारे गुरूजीच नाही का? त्यातही प्राथमिक शिक्षक म्हणजे सकाळच्या कोवळ्या किरणासारखे निराकाराला आकार देणारे.’’ यावरून तिच्या हृदयातील शिक्षकांविषयीचा आदर ज्ञात होता.

झाडीपट्टीतील घरंदाज बाबुराव पाटील नोकर चाकरांवर आपल्या कुटुंबातील व्यक्तींसारखे प्रेम करतात. त्यांना आपल्या पंक्तिला बसवून जेवन करतात. हे झाडीपट्टीच्या पाटलाचे वैशिष्ट्य नरसन्नाला सांगताना आरती म्हणते, ‘‘आमच्याकडे तुमच्यासारखा भेदभाव नाही. एकाच पंगतीत नोकरांसह जेवण करणारी आम्ही झाडपी माणसं आहोत.’’

झाडीपट्टीत श्रावण महिन्यातील पहिल्या मंगळवारी शेतीची कामे बंद ठेवण्याची प्रथा आहे. परप्रांतीय नरसन्नाला ती विचित्र प्रथा वाटते. तो म्हणतो, ‘‘पटेल साब, तुमचे झाडीपट्टीत अजब रिवाज असतो. ये महिन्यात मंगलवारी खेतीचा काम बंद ठेवतो, तो नुकसान कोणाचा होतो? मालकाचाच ना?यावर बाबुराव पाटील नरसन्नाला म्हणतो, ‘‘खरं आहे तुमचं! वैशिष्ट्याशिवाय प्रसिध्दीच मिळत नाही, मग ती एखाद्या विभागाबद्दल किंवा व्यक्तिबद्दल असो. ही आहे आमची झाडीपट्टी. येथील रिवाज इतरांपेक्षा वेगळे आहेत. येथे किंमत आहे माणुसकीला, पैशाला नाही.’’ अशा अनेक वैविध्य पूर्ण, आशयानुकूल संवादांमुळे झाडीपट्टीची माणसं साक्षात भेटल्याचा साक्षात्कार नाट्यरसिकांना होतो.

**उ) भाषाशैली :-**

श्री ग. रा. वडपल्लीवार यांनी नाटकात प्रमाण भाषेबरोबरच बोली भाषेचा अधिक प्रमाणात वापर केलेला आहे. संपूर्ण कथानक आदिवासी भागात घडत असल्यामुळे झाडीपट्टीची झाडीबोली या नाटकात विपूल प्रमाणात आलेली दिसते.

झाडीपट्टीतील ग्रामीण भागात दैनंदिन व्यवहारात बोलले जाणारे कितीतरी शब्द नाटकात सहज आढळतात. उदा. कोठ्यात (गोठ्यात), बुळगा (म्हातारा), तवरी (तोपर्यंत), बुहू (पुष्कळ), दंड (शेत), जीवती (दीपपूजा), परणे (पळून जाणे), तोंडार (वाचाळ), लाथा इदरणे (पाय झाडणे), हेल (माठ), चोरी (चोळी), येल पाडणे (पाल्हाळून

बोलणे), जाया (जाणारा), डकरणे (जोरात बोलणे), चाया (चहा), इचू (विंचू), निवा (निखारा), भूजाळण (बुजगावणे), भुळूक (छिद्र), हेबाळणे (सोडणे), वांझली (निपुत्रिक), लुकवणे (लपविणे), डिकवणे (चिकटवणे) असे कितीतरी शब्द या नाटकात वापरल्याने अस्सल झापडी जनजीवन रसिकांना दृक्गोचर होते.

येथील बोलीतील शब्दांबरोबरच झाडीतील म्हणींचाही वापर नाटककाराने केलेला दिसून येतो. 'खावालं काळ आन् भुईलं भार', 'जेथी भरला दरा आना तोच गाव माझा बरा', 'मलं पाहा आना फुलं वाहा', 'घरची करते देवा देवा आना बाहेरचीलं चोरी शिवा', 'खाजे ना घेजे आना धसक्यावरी माजे', 'कोनी नाही हटके आना आपूनच मटके', 'कोणी नाही वानवे कोणालं आना नकटी वानवे गुणालं', अशा कितीतरी ग्रामीण म्हणी पात्रांच्या संवादात ठिकठिकाणी दिसून येतात. या बरोबरच 'घरकी मुरगी दाल बराबर', 'दाम करे काम बिवी करे सलाम', 'ढबुकी मेख तमाशा देख' यासारख्या हिंदी म्हणींचाही वापर नाटककाराने केलेला आहे.

सुभाषितयुक्त वाक्यरचनाही नाटकात नाटककाराने केल्याचे दिसून येते. उदा. 'मोठी मोठीपुस्तके वाचून पदवी मिळविण्यापेक्षा त्याचं व्यवहारात प्रात्यक्षिक करणं म्हणजे खरं शिक्षण', 'माणुसकीला लाथाडून जिवंत राहण्यापेक्षा माणुसकीचे रक्षण करता करता मरण्यातच खरा आनंद', 'मोती होऊन सोन्याच्या संगतीत राहण्यापेक्षा दवबिंदू होऊन एखाद्या चातकाची तहान भागविणे अधिक चांगले'. या सारख्या शुभाषितांचा वापरही केलेला आहे. या द्वारा नाटककार जणू काही मानवी जीवनाचे तत्त्वज्ञानच सांगताना दिसतो.

याशिवाय आदिवासी गोंडी बोलीतील वाक्यही नाटकात आढळतात. उदा. 'बेके हत्तुर रा?' (कोठे गेला हा?), 'बेके हत्तुर बेर नन्ना पुन्नोन' (कोठे गेला असेल तेच समजत नाही), 'बेके मंतोर हो निमा गुरूजी?' (गुरूजी कोठे होता तुम्ही?), 'लोपेडो मंजर नन्ना.' (मी मागे होतो.) 'बस्के वातीन हो निम्मा पाटील?' (पाटील, तुम्ही केंव्हा आलात?), 'इदेक वातीन नन्ना' (मी आत्ताच आलो), 'निमा पने सोभाय मास्तर आंदू' (तुम्ही उत्तम शिक्षक आहात) या सारखी गोंडी बोलीतील वाक्य नाटककाराने नाटकातील पात्रांच्या संभाषणासाठी लिहिलेली आहेत. यावरून नाटककारांची भाषाशैली किती प्रगल्भ आहे, याची कल्पना येते.

**ऊ) नेपथ्य :-**

जोपर्यंत एखादे नाटक प्रयोगाच्या रूपाने रंगभूमीवर सादर होत नाही, तोपर्यंत त्या नाट्यकृतीला महत्व प्राप्त होत नाही. नाटकाचा प्रयोग अगदी सुलभतेने करता यावा याकरीता नाटककाराने फारच कमी खर्चिक नेपथ्य वापरले आहे. पहिल्या अंकातील पहिल्याच प्रवेशात झाडीपट्टीच्या पाटलाचा वाडा व त्यांची बैठक दाखविली आहे. रंगमंचाच्या शेवटी वालकंपाऊंडची भिंत असून तिला जोडून फाटक किंवा दिंडी दरवाजा आहे. दरवाजा बंद आहे. उजव्या बाजूला गोठ्यात जाण्याचा रस्ता आहे. त्याच बाजूला भिंतीवर दावे, कासरे ठेवलेले आहेत. डाव्या बाजूला माजघरात जाण्याचा मार्ग आहे. त्याला लागूनच खाली बैठक असून बैठकीवर एक दोन खूर्च्या ठेवलेल्या दिसतात. फाटकाच्या बाजूला तुळशी वृंदावन आहे.

पहिल्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशात हमिदाबाईची कोठी दाखविलेली असून तेथे गादी लोडाची बैठक आहे. तिसऱ्या प्रवेशात गोदाबाईचा 'गंगा माय' देवीचा ठाणा दाखविला आहे. दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशात पाटलाच्या शेतीच्या बाजूचा रस्ता दाखविला आहे, तर दुसऱ्या प्रवेशात प्राथमिक शाळेचा परिसर दिसतो आहे. तिसऱ्या प्रवेशात पाटलाचा वाडा, चौथ्या प्रवेशात हमिदाबाईचीकोठी, तर सहाव्या प्रवेशात शिवमंदिरासमोरील मोकळा परिसर दाखविलेला आहे. पहिल्या व दुसऱ्या अंकातीलच सर्व नेपथ्य तिसऱ्या अंकात वापरले आहे. नेपथ्यातून झाडीपट्टीतील वास्तव जीवनदर्शन प्रतिबिंबीत होते.

➢ **निष्कर्ष :-**

१) गावगाड्यातील संघर्ष हुबेहुब चित्रीत केला आहे.
२) अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्या समाजव्यवस्थेचे वास्तवदर्शी चित्रण केलेले आहे.
३) अस्सल झाडीपट्टीतील बोलीभाषेचा वापर केलेला आहे.
४) झाडपी संस्कृती तसेच प्रथा, परंपरा जोपासण्याचे कार्य केले आहे.
५) आदिवासीचे जीवनदर्शन प्रत्यक्षपणे घडविण्यात आले आहे.
६) नाटकांमध्ये झाडी बोली भाषेचा वैशिष्ट्यपूर्ण वापर केलेला आहे.
७) झाडीपट्टी नाटकांच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयाला स्पर्श केला आहे.

## ➢ आधारभूत संदर्भ ग्रंथ :-

१) माता मायचा मुंज्या : गाभमन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९३.

२) झाडपी माणसं : विद्या प्रकाशन पब्लिशर्स प्रा. ली. नागपूर, प्र. आ. २०१५.

## ➢ संदर्भ ग्रंथ सूची :-


१) कुलकर्णी व. दि. : 'नाटक : रंगाविष्कार आणि रंगास्वाद', पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती २००९.

२) कुलकर्णी अरविंद : 'मराठी नाट्यलेखन तंत्राची वाटचाल', व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७६.

३) कुलकर्णी प्रतिभा : 'विदर्भातील रंगकर्मी', विद्याविकास पब्लिशर्स प्रा. ली., नागपूर, प्रथमावृत्ती २०१३.

४) जोगळेकर सुषमा : 'आधुनिक मराठी नाटक : आशय आणि आकृतिबंध, गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९६.

५) ढेरे रा. चि. : 'लोकसंस्कृतीचे उपासक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २०१४.

६) देशपांडे सरोज : 'भारतमुनींचे नाटयशास्त्र', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००७.

७) देशपांडे वि. भा. : 'मराठी नाटक स्वातंत्रोत्तर काळ (१९४७-९०)', व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९२.

८) मोहरक श्याम : 'झाडीपट्टी रंगभूमीची शतकोत्तर वाटचाल', राघव पब्लिशर्स ॲण्ड डीस्ट्रीब्यूटर्स, नागपूर, प्रथमावृत्ती २०१३.

९) सहस्त्रबुद्धे सुनिता : 'मराठी नाटकातील संवाद : बदलते रुपरंग', पुष्प प्रकाशन लि. पुणे, प्रथम आवृत्ती १९९५.

१०) बोरकर हरिश्चंद्र : 'झाडीपट्टीची दंडार', दास्ताने आणि कंपनी प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९९.

११) लांजे हिरामण : 'समग्र झाडीपट्टी', विवेक प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती, २००६.

१२) नाईकवाडे राजेंद्र : 'समकालीन मराठी रंगभूमी', विजय प्रकाशन, राजन जयस्वाल (संपा.) प्रथम आवृत्ती, २०१०.

१३) नाकाडे धनंजय : 'झाडीपट्टीची रंगभूमी', धनंजय स्मृती रंगभूमी, वडसा.

१४) बोरकर सदानंद : 'आमची रंगभूमी : एक चिंतन', प्रथम आवृत्ती, २०१०.

# DECLARATION

We hereby declare that the project entitled " Vairagad Fort ”,which is being submitted as Historical Project of Second semester of M.A.(History) in Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori Dist Gadchiroli is an authentic record of our genuine work done under the guidance of Prof. W.B.Borkar (Acting Head ) Prof.P.M.Vyahadkar, Prof.S.M. Giradkar Dept. of History in Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori.

Date: / /

Place: Armori

Bambole D. N.

Nannaware L.U.

Meshram J. C.

Kantode J. D.

| Student Name | Signature |
| --- | --- |
| 1. Divya Naresh Bambole | D.N. Bambole |
| 2. Lakhan Umaji Nannaware | [illegible] |
| 3. Jayantkumar Chandrabhan Meshram | [illegible] |
| 4. Jagruti Diwakar Kantode | Kantode |

# CERTIFICATE

This is to certify that the project report entitled "Vairagad Fort " submitted by Bambole Divya Naresh, Nannaware Lakhan Umaji, Meshram Jayantkumar Chandrabhan, .Kantode Jagruti Diwakar has been carried out under the guidance of Prof. Prof. W.B.Borkar (Acting Head ) Prof.P.M.Vyahadkar, Prof.S.M. Giradkar Dept. of History in Mahatma Gandhi Arts, science & N. p. commerce college,Armori.

Mahatma Gandhi Arts, Science & Late N.P Commerce College, Armori
Department of History

Head
Dept. of History
Mahatma Gandhi Arts, science
& N. p. commerce College, Armori.

Dept. of History
Mahatma Gandhi Arts, Science &
Late N.P. Commerce College, Armori

# “ वैरागड किल्ला ”



# VAIRAGAD FORT

## TA.ARMORI DIST.GADCHIROLI

# वैरागड किल्ला - अभ्यास

महाराष्ट्र राज्यातील पूर्व विदर्भात घनदाट जंगलांच्या जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोलीतील वैरागड हे ऐतीहासिक गाव आरमोरी तालुक्यापासून जवळपास १५ कि.मी अंतरावर स्थित आहे.या ठिकाणी स्थित किल्ला एक महत्वाचा असून याला ऐतिहासिक वारसा व वैविध्यपणा लाभल्यामुळे या गावाला महत्व प्राप्त झाले आहे.या ऐतीहासिक किल्यामुळे जिल्ह्याला मोठे स्थान प्राप्त झाले आहे.आज या किल्याची व्यवस्था दुरावस्था असली तरी या किल्याने गडचिरोली जिल्ह्याला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले असून याच किल्याने पर्यटन विकासला चालना मिळाली आहे. आजही वैभवशाली इतिहासाची साक्ष देत हा किल्ला उभा आहे परतू काळाच्या ओघात आज ह्या किल्याची पडझळसुरु झाली आहे. त्यामुळे वैरागड किल्याची माहिती पाहणे आवश्यक ठरते.



# गडचिरोली जिल्ह्याचे भौगोलिक स्थान

महाराष्ट्र राज्यातील पूर्वेकडील जिल्हा म्हणजे गडचिरोली होय. गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती होण्याअगोदर हा भाग चंद्रपूर जिल्ह्याचा एक भाग होता. प्रशासनाच्या सोयीसाठी व या ठिकाणी असलेल्या आदिवासी लोकाचा व या भागांचा विकास करण्यासाठी २६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजनकडून गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. जिल्हा म्हणून निर्मिती अगोदर गडचिरोली तहसील म्हणून होती. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १४४१२ चौरस किलोमीटर असून गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या पूर्व विदर्भ या प्रदेशात येतो.



प्राचीन काकाळात या प्रदेशावर राष्ट्रकूट, चालुक्य ,देवगिरीचे यादव यांचे राज्य होते,परंतु सुलतान शाहीच्या काळात अल्लाउद्दिन खिलजी या सुलतानाने दक्षिण भारतावर स्वारी करून स्वारी करून यादव, काकतीय राज्य जिंकून घेतले. यानंतर गडचिरोलीच्या गोंड राज्यांनी राज्य केले तेराव्या शतकात खंडक्या बल्लाळशहा यांनी चंद्रपूर येथे गोंड राज्याची

स्थापना केली. १८५३ मध्ये बेरार हा चंद्रपूर( पूर्वीचा चांदा ) प्रदेशाचा भागब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आला. १८५४ मध्ये चंद्रपूर हा बेरार या प्रांताचा स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. ब्रिटिशांनी १९०५ मध्ये चंद्रपूर व ब्रह्मपुरी ची जमीनदारी व मालमत्ता हस्तांतरण करून गडचिरोली तहसिलची निर्मिती केली. राज्याची पुनर्रचना होण्याअगोदर हा भाग १९५६ पर्यंत केंद्रीय अधिपत्याखाली होता त्यानंतर राज्य पुनर्रचनेनुसार चंद्रपूर बॉम्बे स्टेट मध्ये समाविष्ट करण्यात आले १९६० मध्ये केंद्र सरकार ने महाराष्ट्र राज्याची स्थापना करून त्यामध्ये चंद्रपूर जिल्हा समाविष्ट करण्यात आले १९८२ मध्ये चंद्रपूरचे विभाजन करून ब्रह्मपुरी ऐवजी चंद्रपूर स्वतंत्र गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आला.

## गडचिरोलीचे भौगोलिक स्थान

महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली हा आदिवासी मागासलेला व घनदाट जंगलाने व्यक्त असून अविकसित समजला जातो. गडचिरोली हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर पूर्वेला असून हा जिल्हा १८.४३’ ते २१.५०’ उत्तर अक्षांश आणि ७९.४५’ ते८०.53’ पूर्व रेखांश यादरम्यान मोडतो. यामुळे या जिल्ह्याचा भाग डेक्कन प्लेट्स क्षेत्रात येतो. गडचिरोली जिल्हाच्या पूर्व सीमेला दुर्ग, राजनंदगाव हे छत्तीसगड राज्यातील जिल्हे,पश्चिमेला चंद्रपूर उत्तरेला भंडारा जिल्हा व दक्षिणेस आंध्र प्रदेश मधील आदिलाबाद, करीमनगर जिल्हे व



छत्तीसगड मधील जगदलपुर जिल्हे आहेत.

१४४१२ चौरस कि.मी. क्षेत्रफळ असलेला गडचिरोली जिल्हा हा आकाराने महाराष्ट्रात पाचव्या क्रमांकाचा जिल्हा असून महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४.७ % क्षेत्र या जिल्ह्याने व्यापलेला आहे. सदर जिल्ह्यात वैनगंगा,प्राणहिता पर्लकोटा इंद्रावती इ. ह्या मोठ्या नद्यांनी अनुक्रमे पश्चिम,दक्षिण व पूर्व दिशेने भिडलेला आहे.२०११ च्या जनगणनेनुसार या जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या ९,७०२९४ पैकी पुरुष - ४,९१,१०१ व स्त्रिया- ४,७९,१९३ आहेत. एकूण लोकसंख्येची घनता ६७ प्रति चौरस किलोमीटर आहे. हा जिल्हा अविकसित असून जास्तीत जास्त क्षेत्र जंगलाने वेढलेले आहे. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ७० टक्के भाग जंगलाने व्याप्त आहे. हा जिल्हा बांबूचे झाड तेंदूची पाने करिता प्रसिद्ध आहे, भात हे या जिल्ह्याचे प्रमुख पीक आहे या व्यतिरिक्त तूर, गहू, ज्वारी, सोयाबीन, जवस इत्यादी कृषी उत्पादने घेतली जातात, जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.

## वैरागड गावाची ऐतिहासिक माहिती

वैरागड हे गाव भारताच्या महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात आहे. वैरागड या गावाला ऐतिहासिक वारसा लाभलेले ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेले हे गाव जिल्हा मुख्यालयापासून ४० कि.मी. अंतरावर आहे. प्राचीन काळात विराट राजाच्या वास्तव्यामुळे वैरागड हे गाव विराट नगरी म्हणून प्रसिद्ध आहे. प्राचीन महाभारत कालीन विराट राजा येथे वास्तव्य करीत होता, वैरागड हे गाव गोंड राजा विराट याची राजधानी होती. प्राचीन काळात येथे पांडवांनी वास्तव्य केल्याची आख्यायिका आहे. द्वापायुगात येथे वैराचन राजा होऊन गेले व त्याच्या नावावरून त्याच्या राजधानीचे नाव वैरागड पडले असावे अशी एक चर्चा आहे. इ.स.पूर्व दुसऱ्या शतकातील हाथीगुंफा या शिलालीकात कलिंग सम्राट महामेधवाहत खारवेल याची राणी दुषित ही वजीरगड ची राजकन्या होती.

वजीरगड म्हणजे ऐतिहासिक वारसा लाभलेले असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केल्यामुळे या गावाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

# वैरागडची  भौगोलिक माहिती

वैरागड हे गाव महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यात आहे. हे उपजिल्हा मुख्यालय आरमोरी (तहसील कार्यालय ) पासून १५ कि.मी. अंतरावर आणि जिल्हा मुख्यालयापासून ४०  कि.मी. अंतरावर आहे.  हे गाव अक्षांश २०.१७४१६११  रेखांश ७९.९८८०२१९  असे पसरले आहे. २०११  च्या जनगणनेनुसार वैरागड गावाचा स्थान ५३५८५१  कोड आहे. २००९ च्या आकडेवारीनुसार वैरागड  ग्रामपंचायत आहे. या गावाचे क्षेत्रफळ सुमारे१०७९ हेक्टर आहे. वैरागडची एकूण ४,८६७ लोकसंख्या असून  त्यापैकी पुरुषांची२,४५४ लोकसंख्या आहे तर महिलांची २,४१३ लोकसंख्या आहे. वैरागड गावाचा साक्षरता दर७२.७६ % टक्के असून त्यापैकी ७८.६९ टक्के पुरुष आणि ६६.७२ टक्के महिला साक्षर आहेत.



## वैरागड किल्ल्याची पार्श्वभूमी

वैरागड जिल्ह्यातील किल्ल्या पैकी एक महत्वाच किल्ला असलेले वैरागडचा किल्ला आरमोरी तालुक्यापासून पूर्वेस १५ किमी अंतरावर खोब्रागडी व वैचरना या दोन नद्यांच्या संगमावर बसलेले आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेले ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. इसवी सन पंधराव्या शतकात येथे हिऱ्याची खाण होती. या गावचे मूळ नाव वजकार होते. संस्कृतीत वज्रकार म्हणजे हिऱ्याची खाण वाज्कार या शब्दाचा अपघात होऊन कालांतराने वैरागड झाले असावे

## किल्ल्याचा इतिहास

वैरागड किल्लाला प्राचीन इतिहास लाभलेला आहे . इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात हाती गुंफा या शिलालेखात या किल्ल्याविषयी माहिती सापडते. नवव्या शतकात वैरागड येथे नागवंशीय माना जमातीच्या राजांनी स्वतःच्या राज्य साम्राज्याची स्थापना केली. या राज्याचा पहिला राजा कुरुम प्रदोह याने गडबोरी व राजोली येथे किल्ले बांधले. त्याने वैरागड किल्ला बांधला पोरते नावाचा राजावंशाने वैरागड येथे नव्या शतकात आपल्या राज्याची स्थापना केली. त्याचे राज्याचे गोत्र चिन्ह भुजंग( नाग ) होते त्यामुळे या राजाने आपल्या गणराज्याचे राजचिन्ह नाग बनविले. कलांतराने ते नागवंशीय गोंदी गणाच्या नावाने प्रसिद्ध झाले.१२ व्या शतकापर्यंत माना जमातीच्या नागवंशी राजांची बरीच प्रस्थ होते हा संपूर्ण भूभाग नागवंशीय माना जमातीच्या राजाकडे होते. नंतर हा प्रदेश बुरहानपुर च्या गोड राजांच्या ताब्यात गेला.

इ.स.१४७१ मध्ये महमदशह बहामनी तिसरा याने सुलतान सेनापती युसुफ आदिल खान यांना वैरागड वर स्वारी करण्यास पाठविले. तेव्हा वैरागड येथे हिऱ्याची खाण सुरू होती, ही खाण काबीज करण्याच्या हेतूने युसुफ आदिल खान ने युद्ध केले, त्यांनी सतत सहा महिने हा लढा सुरू ठेवून हा किल्ला काबीज केला. व किल्ल्याची बरीच नासधूस केली, या लढाईत

मरण पावलेल्या मुसलमानांच्या सैनिकांच्या स्मरणार्थ इदगाह बांधलेला आहे. पुढे रतनपूर हैद्य वंशिय राजा कल्याण सहायने हा किल्ला बांधून आपले स्वामित्व प्रस्थापित केले ,त्यावेळी कर्णशहा हा त्याचा मांडलीक होता, कर्णशहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बाबाजी बल्लाळशहा इ.स.१५७२ मध्ये टिपागडचा राजा पुरणशहाच्या मदतीने हा किल्ला जिंकून घेतला. पुरामशहच्या मृत्यू झाल्यानंतर बाबाजी बल्लाळशहाने राजे पुरणशहाचा सेनापती हरिचंद्र गोड यांना वैरागडचा किल्लेदार म्हणून नियुक्ती केले. व या ठिकाणी किल्ल्याची सुधारणा करून तेथे भंडारेश्वर, नंदिकेश्वर, पाताळेश्वर, दुबळेश्वर, अंचलेश्वर, रामेश्वर व महाबळेश्वर या सप्तधामाची स्थापना केली.

पुढे इसवीसन १७९५ मध्ये वैरागडचा किल्ला भोसल्याच्या ताब्यात गेला, त्यावेळी बिरान पंडित हा तेथे सुभेदार होता. भोसले यांचा ब्रिटिशांनी पराभव केल्यानंतर हा प्रदेश ब्रिटीश सरकारच्या ताब्यात गेला.अश्याप्रकारे किल्ल्याबाबत बरीच चर्चा प्रचलित आहेत.

## किल्ल्याचे बांधकाम रचना

सोळाव्या शतकात बाजारपेठेचे गाव म्हणून प्रशिद्ध असणारा हा वैरागड या ठिकाणी सापडलेल्या हिऱ्याच्या खाणीच्या संरक्षणासाठी बाबाजी बल्लाळशहा यांनी किल्ल्यास व्यवस्थित केले. हा किल्ला ऐतिहासिक असून वैरागडच्या पूर्वेस असून अंदाजे दहा एकर क्षेत्रामध्ये एका गोलाकार तटबंदी युक्त किल्ला आहे. सभोवताल गोलखंदक किल्ल्याच्या भिंतीची उंची२५ ते ३० फुट असून किल्याचा प्रवेश व्दार दक्षिणेस आहे. किल्ल्यास तीन दरवाजे असून त्यापैकी दोन पडक्या अवस्थेत असल्याने बंद आहेत, किल्ल्याच्या आत एक गुप्त मार्ग असल्याचे दिसून येते, उजव्या बाजूला तटाच्या आधाराने बांधलेले केशवनाथांचे मंदिर आहे या मंदिराची स्थापना बाबाजी बल्लाळशहा या गोंड राजांनी केली असावी.प्रवेशद्वारापासून थोड्याच अंतरावर एक विस्तीर्ण व्यासपीठ असल्याचे दिसते, कदाचित

या किल्लेदाराचे घर असावे, किल्ल्याच्या भिंतीला लहान लहान खिळक्या आहेत, या किल्ल्यात आणि गावाच्या सीमावरती भागात घटनेच्या गोलाकार त्रिकोणी व चौकोनी पंचकोनी अष्टकोनी अशा आकाराच्या विहिरी आहेत, त्यातील पायऱ्यांची विहीर असून त्यातील बहुतांशी नष्ट झाल्या आहेत. या किल्ल्यातील पाणी व्यवस्था पूर्ण करीत असाव्यात,एकंदरीत किल्ल्याची बांधणी मजबूत असून हा किल्ला कित्येक वर्षापासून प्राचीन इतिहासाची साक्ष देत आहे हा किल्ला सध्या संरक्षित स्मारक असून पुरातत्व विभाकडे देखभाल सोपविलेली आहे

## भंडारेश्वर मंदिर

टिपागडचा राजा पुरणशहाच्या मृत्यूनंतर बाबाजी बल्लाळ शहने राजे पुरणशहाचा सेनापती हरिश्चंचंद्र गोंड यांनी वैरागडचा किल्लेदार म्हणून नियुक्त केले, त्याने ठिकाणी किल्ल्याची सुधारणा केली ,तेथे भंडारेश्वर नंदिकेश्वर, पाताळेश्व,र दुबळेश्वर, अंचलेश्वर, रामेश्वर व महाबळेश्वर या सप्तधामाची स्थापना केली ,यापैकी भंडारेश्वर देवस्थान विद्यमान आहे. तो वैरागड गावाच्या दक्षिणेस खोब्रागडी नदीच्या काठी उंच टेकडीवर बांधलेले आहे. या मंदिरावर हेमांडपंथी शैलींचा प्रभाव दिसते.सोबतच या मंदिराच्या भिंतीवर दिगपाल सुर सुंदरी चामरधारींनी या देवींच्या मुर्त्या कोरलेल्या आहेत. खोब्रागडी नदीच्या काठावर हे मंदिर असल्याने , निसर्गमय वातावरण अनुभवास येते. महाशिवरात्रिला या ठिकाणी यात्रा भरवली जाते. शिवभक्त नदीचे पाणी आणून शिवाला अर्पण करतात .शिवाय या मंदिराला विदर्भातील एक धाम मानतात. सरकार तर्फे संरक्षित स्मारक म्हणून त्याची निगा राखली

## गोरजाई माता मंदिर

गोरजाई माता मंदिर हे वैरागड किल्ल्याच्या दक्षिणेला आणि खोब्रागडी व वेनलोच्चा नद्यांच्या संगमा जवळील आहे. मंदिराची वास्तु शिल्पाची स्थिती विलक्षण स्थितीत आहे

आणि याची छत १८ खांबावर आहे वैरागड येथे असलेल्या दोन हेमांड पंती मंदिरांपैकी हे एक मंदिर आहे पण या मंदिराची सध्या दुरावस्था झाली आहे

## समाधी /कबर

१४७१ मध्ये मोहम्मद शहा बहामनी तिसरा याने सुलतान सेनापती युसुफ आदिल खान यांना वैरागड वर आक्रमण केले. ही लढाई सहा मध्ये चालू होती यात बरेच मुस्लिम सैन्य मारल्या गेले त्याच्या स्मरणार्थ खांडक्या बल्लाळशाह या गोंड राजाने एक इदगाह/ कबर बनवली. जंगलात ,किल्ल्यात बाहेर, गोंड राजकुमार दुर्गा याची समाधी आहे तिथून काही अंतरावर एका अज्ञात इंग्रज मुलीची कबर आहे ती इसवी सन १८१८ ते १८३० च्या दरम्यान सैन्य दलाला आदेश देणाऱ्या इंग्रजी अधिकाऱ्याच्या मुलीची कव्हर असावी असे सांगितले जाते.

## सध्याची स्थिती

प्राचीन काळाची, राजवैभवाची साक्ष देणारा वैरागड येथील किल्ला काळाच्या ओघात ढासळत चाललेला आहे, काही ठिकाणी केवळ अवशेष शिल्लक आहेत. ऐतिहासिक वारसा असलेल्या वैरागड किल्ल्याची सध्या कमालीची दुरावस्था झाली आहे, किल्ल्याचे चार बुजांचे बुरुज, तट झाडेझुडपाणी वेढलेली आहेत, शेकडो वर्षापासून वारा पाऊस झेलणाऱ्या तट व बुरुजांची कमालीची दुरावस्था आहे, मुख्य दरवाजाची स्थिती चांगली आहे.मात्रकिल्यातील आतील भाग, राजाचा महल ,किल्ला परिसरातील असलेली चौकोनी, पंचकोनी, अष्टकोनी व अशा विविध आकाराच्या विहिरी, भुयार या किल्ल्याबाहेर पडण्यासाठी असलेल्या मागच्या दरवाजाची पूर्ण पडझड झालेली आहे, काही ठिकाणी भिंती कोसळल्याने त्यांचे दगड अस्ताव्यस्त पसरलेली आहे आणि किल्याच्या परिसरात अतिक्रमण झालेली आहे

## निष्कर्ष

- गडचिरोली जिल्ह्यातील वैरागड या गावाला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे
- वैरागड किल्ल्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळू शकते
- ऐतिहासिक वारसा कायम टिकवून ठेवण्यासाठी किल्ल्याचे संवर्धन होणे आवश्यक आहे किल्ल्यामुळे जिल्ह्याला एक मानाचे स्थान आणि वेगळे स्थान प्राप्त झालेली आहे
- गडचिरोली जिल्ह्यातील प्राचीन काळाची विशेष साक्ष देणारा हा एक ऐतिहासिक किल्ला आहे वैरागड किल्ल्याचे संरक्षण व सवंरक्षण होणे आवश्यक झालेले आहे

## संदर्भ


**1.**लोकमत दैनिक दिनांक ३० नोव्हे २०२०
https://www.lokmat.com/gadchiroli/khasthahal-fort-vairagad-which-bears-witness-its-splendor-and-history-a329/

**2.**लोकमत दैनिक दिनांक २६नोव्हे २०१४
https://www.lokmat.com/gadchiroli/vairagad-fort-will-get-original-form/

3.चंद्रपूर. "द गॅझेटियर्स

4.चंद्रपुर गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व - रघुनाथ बोरकर

5.मध्ययुगीन विदर्भाचा इतिहास - रघुनाथ बोरकर

6.चंद्रपूरचा इतिहास - अण्णाजी जयराम राजूरकर

7.विदर्भातील किल्ले - चितळे

8.https://en.wikipedia.org/wiki/Vairagad_Fort access date 13/02/2024

# वैरागड किल्ल्याच्या फोटो


























2018-2-6 13:51



































